सोलापूर
Solapur Tarun Bharat
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, ३१ जुलै २०२४ | वर्ष दुसरे | अंक १३० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# केरळच्या भूस्खलनात ८८ जणांचा मृत्यु

वायनाड, ३० जुलै : केरळच्या वायनाड जिल्ह्यातील मेप्पडी, मुंडक्काई टाउन आणि चुरल माला येथे मुसळधार पावसामुळे आज, मंगळवारी सकाळी झालेल्या भूस्खलनात मोठी जीवित आणि मालमत्तेची हानी झाली आहे. वायनाड जिल्ह्यातील उंच गावांमध्ये शेकडो घरे जमीनदोस्त झाली आहेत. या भूस्खलनात आतापर्यंत ८८ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून १२२ जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. भूस्खलन अपघातातील मृतांचा आकडा सतत वाढत असून अनेक लोक अजूनही बेपत्ता आहेत.



मुंडक्काई शहरात पहाटे १ वाजता मुसळधार पावसात पहिला भूस्खलन झाला. बचावकार्य सुरू असतानाच पहाटे ४ वाजता चुरलमाला शाळेजवळ दुसरा दरड कोसळला. चुरमाला टाऊनमधील पूल कोसळल्यानंतर सुमारे ४०० कुटुंबे या परिसरात अडकून पडली आहेत. मुंडक्काई येथील अट्टमळा येथे जाण्यासाठी हा पूल एकमेव मार्ग असून तो कोसळल्याने बचाव कार्यावर वाईट परिणाम झाला आहे. केरळ सरकारने वायनाडमध्ये भूस्खलनात किमान ८८ लोकांचा मृत्यू झाल्यामुळे आज आणि उद्या राज्यात अधिकृत शोक जाहीर केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वायनाड येथील भूस्खलनात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. या दुर्घटनेबद्दल त्यांनी शोक व्यक्त केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांना केंद्राकडून सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे. एनडीआरएफ आणि लष्कर दोन्ही बचाव कार्यात गुंतले आहेत. दरड कोसळल्याने झाडे उन्मळून पडली आहेत. पाणी सतत वाहत असून अनेक घरे जमीनदोस्त झाली आहेत. शेकडो लोक अडकल्याची भीती आहे. केरळचे मुख्यमंत्री पी. विजयन म्हणाले की, सर्व सरकारी संस्था बचाव कार्यात सामील झाल्या आहेत आणि आरोग्य विभाग - राष्ट्रीय आरोग्य अभियानाने एक नियंत्रण कक्ष उघडला आहे.

आपत्कालीन मदतीसाठी हेल्पलाइन क्रमांक, ९६५६९३८६८९ आणि ८०८६०१०८३३ देखील जारी करण्यात आले आहेत. वायनाड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात भूस्खलनानंतर आपत्ती व्यवस्थापन आणि मदत कार्यांवर देखरेख करण्यासाठी सीराम सांबशिव राव यांची विशेष अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय लष्कराची तुकडी चुरलमला येथील भूस्खलनाच्या ठिकाणी पोहोचली आहे.

चुरलमळा येथील वॉर्ड क्रमांक १० मध्ये मदत आणि बचाव कार्य करण्यासाठी दोरीच्या सहाय्याने सैनिकांना नदीपलीकडे नेले जात आहे. बचाव कार्यात मदत करण्यासाठी लष्कराने संरक्षण सुरक्षा दलाचे २०० सैनिक आणि वैद्यकीय पथक तैनात केले आहे. याशिवाय, प्रयत्नांना मदत करण्यासाठी सुलूर येथील हवाई दलाच्या स्टेशनवरून दोन हेलिकॉप्टर पाठवण्यात आले आहेत.एनडीआरएफचे म्हणणे आहे की त्यांची टीम वायनाडमध्ये विविध ठिकाणी आहे. एनडीआरएफच्या ३ टीम आधीच वायनाडमध्ये आहेत. बचाव कार्य करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत. भूस्खलनग्रस्त भागाच्या आतील भागात पोहोचण्यात आम्हाला अडचणी येत आहेत.

# देशात स्थापणार राष्ट्रीय सहकार विद्यापीठ : अमित शहा

नवी दिल्ली, ३० जुलै : देशात लवकरच राष्ट्रीय सहकार विद्यापीठ उभारले जाणार आहे. यासंदर्भातील प्रस्तावावर सहकार मंत्रालय प्रयत्नरत असल्याची माहिती सहकार मंत्री अमित शहा यांनी लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात ही माहिती दिली.



सहकार मंत्रालय,या क्षेत्रातील तांत्रिक आणि व्यवस्थापन शिक्षण आणि प्रशिक्षण देण्यासाठी तसेच सहकारी संशोधन आणि विकासाला चालना देण्यासाठी आणि संलग्न संस्थांच्या जाळ्याद्वारे देशातील सहकारी चळवळ मजबूत करण्यासाठी, राष्ट्रीय स्तरावर सहकार विद्यापीठ स्थापन करण्याच्या प्रस्तावावर काम करत आहे. हा उद्देश साध्य करण्याच्या उद्देशाने प्रस्तावित विद्यापीठाची रूपरेषा विकसित करण्यासाठी केंद्रीय मंत्रालये आणि विभाग, राज्य सरकारे, राष्ट्रीय सहकारी आणि संघ, सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षण संस्था इत्यादींसह विविध भागधारकांशी विस्तृत सल्लामसलत करण्यात आली आहे.आपला खर्च भागवण्यासाठी हे विद्यापीठ स्वयंपूर्ण करण्याचे उद्दिष्ट देखील ठेवण्यात आले आहे. प्रस्तावित विद्यापीठ सहकार क्षेत्राशी समन्वय साधून काम करेल तसेच यामध्ये शिक्षण आणि प्रशिक्षणासाठी सर्वसमावेशक, एकात्मिक आणि प्रमाणित संरचना असेल जेणेकरून मंत्रालयाने हाती घेतलेल्या सहकार क्षेत्रातील विविध योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रशिक्षित मनुष्यबळाचा स्थिर, पुरेसा आणि दर्जेदार पुरवठा सुनिश्चित होईल. व्यावसायिक मनुष्यबळाचा पुरवठा आणि सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची क्षमता वर्धित करणे यामुळे सहकार क्षेत्र अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये मोठे योगदान देण्यास सक्षम होईल अशी अपेक्षा असल्याचे अमित शाह यांनी आपल्या उत्तरात नमूद केले आहे.

## झारखंडमध्ये मोठा रेल्वे अपघात, हावडा-मुंबई मेलचे १८ डबे रुळावरुन घसरले

झारखंड: झारखंडच्या चक्रधरपूर रेल्वे मंडळाच्या बाराबम्बो रेल्वे स्टेशनजवळ हावडा-मुंबई मेल एक्सप्रेसला अपघात झाला. रेल्वेचे १८ डबे रूळावरून घसरले. दरम्यान, या अपघातात ६ जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनास्थळी रेल्वे कर्मचाऱ्यांसोबत एआरएम, एडीआरएम आणि सीकेपीच्या टीम पोहोचल्या आहेत. जखमींना तातडीने रेस्क्यू केले जात आहे.

घटनेला दुजोरा देताना अधिकाऱ्याने सांगितले की १२८१० हावडा-सीएसएमटी एक्सप्रेस सकाळी पावणेचारच्या सुमारास चक्रधरपूर डिव्हीजनचे राजखरसवा वेस्ट आऊट आणि बाराबम्बो या दरम्यान चक्रधरपूरजवळ १८ डबे रूळावरून घसरल्याची सूचना मिळाली होती. SER च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले, मुंबई-हावडा मेलचे अनेक डब्बे बाराबम्बोच्या जवळ पटरीवर उतरले. या अपघातात सहा प्रवासी जखमी झालेत. त्यांच्यावर बाराबम्बोमध्ये प्राथमिक उपचार दिले जात आहेत.

## पॅरिस ऑलिम्पिक मध्ये मनू भाकर, सरबजोत सिंहची ऐतिहासिक कामगिरी

### भारताला मिळाले दुसरे कांस्य पदक

पॅरिस : मनू भाकरने दोन दिवसांपूर्वी पॅरिस ऑलिम्पिक २०२४ मध्ये १० मीटर एअर पिस्तूलच्या एकेरी प्रकारात कांस्य पदक पटकावले होते. पॅरिसमध्ये पहिल्या कांस्यपदकासह मनूने पदकतालिकेत भारताचे खाते उघडले. त्यानंतर आज पार पडलेल्या १० मीटर एअर पिस्तुलच्या मिश्र दुहेरी प्रकारात मनू भाकर व सरबजोत सिंह या नेमबाजांच्या जोडीने भारताला आणखी एक कांस्य पदक मिळवून दिले आहे. त्यामुळे पॅरिसमधील पहिल्या यशानंतर आता पुन्हा मनू भाकर हिने आणखी एक कांस्य पदक जिंकून इतिहास रचला आहे. तसेच भारताला एकाच ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदके मिळवून देणारी पहिलीच खेळाडू ठरली आहे.



मनू भाकर आणि सरबज्योत सिंग यांनी काल १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत कांस्यपदकासाठी पात्र ठरले होते. या दोघांनी पात्रता फेरीत २० अचूक शॉट्स करुन त्याद्वारे ५८० गुण मिळवले होते. या फेरीत सरबजोतने धिमी सुरुवात केली होती. पहिल्या फेरीत कोरियन संघाने २०.५ तर भारतीय संघाने १८.८ गुण मिळवले होते. मात्र त्यानंतर मनू व सरबजोतने आपला जोर जोर दाखवून दुसऱ्या फेरीत भारतीय जोडीने २१.२ तर कोरियाने १९.९ गुण मिळवले होते. त्यानंतर तिसऱ्या फेरीत भारताने पुन्हा आघाडीवर येत मनू-सरबजोत जोडीने २०.८ तर कोरियन संघाने १९.८ गुण मिळवले.

दरम्यान, पाचव्या फेरीत भारतीय संघ मागे पडला होता. परंतु त्या कालावधीत भारतीय संघ एकूण गुणांच्या बाबतीत पुढे निघून केला होता. अखेरपर्यंत भारतीय जोडीने आघाडी कायम राखून कांस्य पदकाला गवसणी घातली.

# रेशन धान्याचे ऑफलाईन पध्दतीने होणार वाटप; आ. वैभव नाईक यांनी केली होती मागणी

सिंधुदुर्ग, ३० जुलै : ऑनलाइन पध्दतीने रेशन धान्य वितरीत करताना अनेक अडचणी येतात. त्यामुळे सर्व सामान्य नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे धान्य वितरणाची ऑनलाईन प्रक्रिया सक्षमरित्या होत नसेल त्याठिकाणी ऑफलाईन पद्धतीने धान्य वितरण करण्यात यावे अशी लेखी मागणी आमदार वैभव नाईक यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी आणि जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे आज केली होती. ही मागणी मान्य करण्यात आली असून ऑफलाईन पध्दतीने रेशन धान्याचे वाटप केले जाणार आहे.तसेच जुलै महिन्याच्या धान्य वितरणास १० दिवसांची मुदतवाढ देखील मिळणार आहे. अशी माहिती आमदार वैभव नाईक यांनी दिली आहे.



शिवसेना शिष्टमंडळाने केलेल्या मागणीत म्हटले होते की, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रेशन धान्य दुकानांवर नागरिकांकडून मशीनवर थम लावून ऑनलाईन पद्धतीने धान्य वितरीत केले जाते. मात्र अलीकडे अनेक वेळा सर्व्हर डाउन असणे, नेटवर्क नसणे, लाईट नसणे अशा अनेक अडथळ्यांमुळे धान्य वितरणाची ऑनलाईन प्रक्रिया पुर्ण होत नाही तसेच एका व्यक्तीकडून ४ ते ५ वेळा थम लावल्या नंतरही ऑनलाईन प्रक्रिया पुर्ण होत नाही. त्यामुळे नागरिकांना रेशन धान्य दुकानांवर फेऱ्या माराव्या लागतात. त्यांना येण्या जाण्याचा भुर्दंड सोसावा लागतो. याचा सर्व सामान्य नागरिकांना नाहक त्रास होत आहे. त्यामुळे धान्य वितरणाची ऑनलाईन प्रक्रिया सक्षमरित्या होत नसेल त्याठिकाणी ऑफलाईन पद्धतीने धान्य वितरण करण्यात यावे. आणि जुलै महिन्याच्या धान्य वितरणास मुदतवाढ मिळावी अशी मागणी केली होती.जिल्हाधिकारी आणि जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी ही मागणी मान्य केली आहे.

यावेळी जिल्हाप्रमुख संदेश पारकर, जिल्हाप्रमुख संजय पडते, कणकवली विधानसभा प्रमुख सतीश सावंत, कणकवली विधानसभा संपर्कप्रमुख अतुल रावराणे,महिला जिल्हाप्रमुख नीलम पालव, युवासेना जिल्हाप्रमुख मंदार शिरसाट, युवासेना जिल्हाप्रमुख सुशांत नाईक,अमरसेन सावंत, बबन बोभाटे,सचिन कदम, बाळा कोरगावकर,कृष्णा धुरी,जयभारत पालव, दीपक आंगणे,वैदेही गुडेकर,संजना कोलते,माधवी दळवी,उत्तम लोके,विकास राऊळ रूपेश आमडोस्कर,आबा मुंज, नागेश ओरोसकर,राजू गवंडे, गुरू गडकर,राजू रावराणे आदीसह शिवसैनिक उपस्थित होते.

## लावणीचा लोकनाट्याच्या चळवळीत मोठा वाटा:बावनकुळे

मुंबई, ३० जुलै : पुणे : गीत, नृत्य, अभिनय या तिन्हींचा उत्तम संगम म्हणजे लावणी. गेल्या काही वर्षांपासून लावणीला जागतिक स्तरावर ओळख, मान -सन्मान मिळत आहे. महाराष्ट्राची ही लोककला एका वेगळ्या उंचीवर पोहोचलेली आहे. लावणीला लोककलेच्या क्षेत्रात मानाचे स्थान आहे. तसेच लावणीचा लोकनाट्याच्या चळवळीत मोठा वाटा आहे, असे मत भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले. भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक प्रकोष्ठ, महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने सांस्कृतिक कला व लावणी महोत्सवाचे आज आयोजन करण्यात आले होते. यावेळी बावनकुळे बोलत होते. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सभागृह,सातारा रोड, पद्मावती, येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला महामंत्री विक्रांत पाटील, आमदार सदाभाऊ खोत, आमदार अमित गोरखे, आमदार भीमराव तापकीर, भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष दिपकभाऊ मानकर,माजी आमदार जगदीश मुळीक, माजी नगरसेवक राजेंद्र शिळीमकर, श्रीनाथ भीमाले, वर्षा तापकीर ,अमृता मारणे, अ. भा. मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, अभिनेत्री सुरेखा कुडची, मेघा घाडगे, नितीन वाबळे, रूपाली धाडवे, महोत्सवाच्या आयोजक, भारतीय जनता पार्टी सांस्कृतिक प्रकोष्ठ, महाराष्ट्र प्रदेशच्या अध्यक्षा अभिनेत्री प्रिया बेर्डे स्वागतोस्तुक सोनू मारुती चव्हाण, महेश भांबीड, विद्या पोकळे पाटील, शहाराध्यक्ष जतीन पांडे, धनंजय वाठारकर आणि संस्कृतिक प्रकोष्ठ चे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

यसाका लिक्वीड औषधी
कारले,जांभूळ, कडुलिंब इत्यादि १२ वनौषधींचे सुयोग्य आयुर्वेदिक मिश्रण
यात आहे हळद आणि गुळवेल जे इम्युनिटी वाढवण्यास मदत करते

HELPLINE NO.: 7045355632
A quality product from Simandhar
To Order Scan Here
● ग्लुकोज मेटॅबॉलिजममध्ये मदत होते,
● थकवा कमी करते ● पचनक्रिया सुधारते
● प्रतिकार शक्ती वाढवते ● रक्त शुध्द करते
● जखम बरी होण्यास मदत करते
For more information log on to our website: www.simandharherbal.com

# पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील साहित्य जीवन गौरव पुरस्कार जाहिर

अहमदनगर : सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंती दिनानिमित्ताने दरवर्षी देण्यात येणाऱ्या साहित्य जीवन गौरव आणि कलागौरव पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, या वर्षीचे पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील साहित्य जीवन गौरव पुरस्कार जेष्ठ साहित्यीक डॉ.प्रेमानंद गज्वी, राज्यस्तरीय उत्कृष्ठ साहित्य पुरस्कार डॉ.समीर चव्हाण, राज्यस्तरीय विशेष साहित्य पुरस्कार प्रफुल्ल शिलेदार, अहमदनगर जिल्हा साहित्य पुरस्कार डॉ.श्रीनिवास हेमाडे, डॉ.विखे पाटील राज्यस्तरीय नाट्यसेवा पुरस्कार प्राजक्त देशमुख आणि राज्यस्तरीय कलागौरव पुरस्कार तमाशा कलावंत हसन शेख पाटेवाडीकर यांना देण्यात येणार असल्याची माहीती पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ.रावसाहेब कसबे यांनी दिली.



पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंती दिनाच्या निमित्ताने दरवर्षी या साहित्य आणि कलागौरव पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. यंदाचे हे ३४ वर्ष असून, डॉ.विखे पाटील यांच्या १२४ व्या जयंती दिना निमित्ताने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष रविंद्र शोभणे यांच्या हस्ते नारळी पोर्णीमेच्या दिवशी महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत या पुरस्कारांचे वितरण होणार असल्याचे पुरस्कार निवड समितीचे निमंत्रक डॉ.राजेंद्र सलालकर यांनी सांगितले.

डॉ.प्रेमानंद गज्वी (मुंबई) हे मराठी नाटककार, कवी, विचारवंत म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून जीवनभर त्यांनी लेखन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव हा त्यांच्या लेखणीतून कायम दिसून आला. त्यांच्या प्रत्येक नाटकात समाजातील एखाद्या समस्येवर प्रखर प्रकाश झोत टाकलेलाच दिसतो. वंचित, पिडीतांचा दबलेला आवाज मुखर करण्यासाठी जीवनभर प्रतस्तपणे काम करणाऱ्या साहित्य निष्ठेचा गौरव यंदाचा पद्मश्री डॉ.विखे पाटील साहित्य जीवन गौरव पुरस्कार देवून करण्यात येणार असून, स्मृतीचिन्ह, १ लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरुप असल्याचे डॉ.कसबे म्हणाले.

डॉ.विखे पाटील राज्यस्तरीय सर्वौत्कृष्ठ साहित्य पुरस्काराने गौरविण्यात आलेले डॉ.समीच चव्हाण (कानपुर) आय.आय. टीमध्ये गणिताचे प्राध्यापक असून, साहित्य हा त्यांच्या आवडीचा प्रांत आहे. संत तुकारामांच्या जीवनाचे विश्वदर्शन घडविण्यासाठी ‘अखई ते जाले’ हा ग्रंथ त्यांनी शब्दबध्द केला. या माध्यमातून संत तुकारामांना अधिक उंचीवर नेण्याचा केलेला यशस्वी प्रयत्नांची दखल पुरस्कार निवड समितीने घेतली असून, रुपये ५१ हजार आणि स्मृतीचिन्ह अशा विशेष साहित्य पुरस्काराने त्यांचा सन्मान केला जाणार आहे.

प्रफ्फुल शिलेदार (नागपुर) यांच्या ‘हरविलेल्या वस्तुंचे मिथक’ या कविता संग्राहास डॉ. विखे पाटील अहमदनगर जिल्हा साहित्य पुरस्कार जाहिर झाला असून, स्मृतीचिन्ह आणि २५ हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. प्रफ्फुल शिलेदार यांनी आपल्या कवितेच्या माध्यमातून मुंबई शहराचे रुपक घेवून मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा आलेख मांडण्याचा प्रयत्न आपल्या कवितांमधून केला आहे. त्यांची कविता मुशाफिरी व मानवी मनाला चिंतनशिल करणारी आहे. या कवितांचे वेगळेपण विचारात घेवून त्यांचा सन्मान करण्याचा निर्णय पुरस्कार निवड समितीने घेतला आहे.

पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अहमदनगर जिल्हा साहित्य पुरस्कार प्रा.डॉ. श्रीनिवास हेमाडे (संगमनेर) यांना घोषित झाला असून, ‘पेचामध्ये अडकलेल्या अडीच हजार वर्षातील तत्वज्ञानाचा प्रवास’ डॉ. हेमाडे यांनी अत्यंत सुलभ भाषेत लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. तत्वज्ञान हे जीवनाचे स्पष्टीकरण करणारे आणि त्याला दिशा देणारे शास्त्र आहे. त्याचा प्रभाव वर्तमान व सांस्कृतीक प्रवाहात टाळता येत नाही यासाठी त्यांनी शब्दबध्द केलेला तत्वभान ग्रंथ हा निश्चित उपयोगी पडेल असे समितीला वाटत त्यामुळेच त्यांचा सन्मान समितीने स्मृतीचिन्ह आणि १० हजार रुपये देवून करण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्ह्यातील नेवासा येथील प्रा.बाळासाहेब लबडे (नेवासा) यांचे ‘काळ मेकर लाइव्ह’ या कांदबरीला अहमदनगर जिल्हा विशेष साहित्य पुरस्कार देण्यात येणार असून, स्मृतीचिन्ह आणि २५ हजार रुपये देवून करण्यात येणार आहे. समाज माध्यमांव्दारे माहितीचा महापुर आल्यानंतर जे जीवनाचे भेसूर आणि अराजकीय वास्तव निर्माण झाले आहे. त्याचे नव्या तंत्रशैलित चिंत्रण करणारी ही कांदबरी असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले.

नाट्यलेख आणि दिगदर्शक प्राजक्त देशमुख (नाशिक) यांच्या ‘संगीत देवभाबळी’ या नाटकामुळे संगीत नाटकाला पुन्हा उर्जितावस्था मिळाली. एक अभिनेता म्हणूनही त्यांनी नाट्यक्षेत्रात आपले एक वेगळे वलय निर्माण केले. नव्या दमाचा, नव्या पिढीचा हा नाटककार मराठी नाट्य परंपरेला निश्चित पुढे नेईल असा विश्वास पुरस्कार निवड समितीला असल्यामुळे राज्यस्तरीय नाट्यगौरव पुरस्कार देवून त्यांचा सन्मान देवून स्मृतीचिन्ह आणि २५ हजार रुपये देवून सन्मानित करण्यात येणार आहे.

अहमदनगर जिल्ह्याचे सुपूत्र असलेले हसन शेख पोटेवाडीकर (कर्जत) यांना यंदाचा डॉ.विखे पाटील राज्यस्तरीय कलागौरव पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार असून, नाट्य कलावंत कांताबाई सातारकर, रघुवीर खेडकर यांच्या समवेत त्यांनी तमाशा मंडळात काम केले. वगनाट्या मध्ये स्वतंत्र महत्वाच्या भूमिका करुन त्यांनी तमाशा कलेमध्ये आपले वेगळेपण सिध्द केले आणि स्वत:चाच तमाशा फड सुरु केला. महाराष्ट्राची लोकधारा व लोकपरंपरा जपतानाच ग्रामीण महाराष्ट्राचे मनोरंजन व समाज प्रबोधन करण्याच्या कार्याची दखल घेवून पुरस्कार निवड समितीने यंदाचा राज्यस्तरीय कला गौरव पुरस्काराने सन्मानित करण्याचा निर्णय निवड समितीने घेतला असून, त्यांना स्मृतीचिन्ह आणि २५ हजार रुपये देवून सन्मानित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

या पुरस्कार निवड समितीमध्ये डॉ.रावसाहेब कसबे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ.एकनाथ पगार, डॉ.दिलीप धोंडगे व डॉ.राजेंद्र सलालकर यांचा समावेश होता.

विको विश्वसनीय आयुर्वेद १९५२ पासून
Go natural आयुर्वेदिक औषधी
विको नारायणी क्रीम
वेदना अनेक, उपाय एक
सर्दी खोकला
डोकेदुखी
स्नायुचे आखडणे
कंबरदुखी
सांधेदुखी
संपूर्ण स्वदेशी | सर्व मेडिकल स्टोअर्स मध्ये उपलब्ध | अधिक माहितीसाठी आणि खरेदीसाठी इथे स्कॅन करा
Follow us on @viccolabs • Like us on /ViccoLabs.
Shop online at https://viccolabs.com • Customer Care No.: 0712-2420890

## घर आणि घरकाम सांभाळत जितो लेडीज विंग चे सामाजिक कार्य वाखाण्याजोगे : रवी खिवंसरा



छत्रपती संभाजीनग - जितो लेडीज विंग मधील महिला आप - आपल्या घरातील सर्व कामे सांभाळत सामाजिक उपक्रमामध्ये सहभागी होत उत्कृष्ठ कार्य करत आहेत .महिलांचा हा सहभाग आणि त्यांच्या तर्फे संघटनेत करण्यात येणारे कामे वाखाणण्याजोगी आहेत असे जितो महाराष्ट्र चे उपाध्यक्ष रवी खिवंसरा म्हणाले ,ते लेडीज विंग उडाण प्रदर्शनाचे आयोजना संधर्भात पत्रकारांशी बोलत होते . या वेळी जितो चाप्टर संभाजीनगर चे चेअरमेन पारस ओस्तवाल, सचिव दिनेश मुखा, जितो लेडीज विंगच्या अध्यक्षा डिंपल पगारिया, चिफ सचिव प्रिया मुथा उपस्थित होत्या . पुढे बोलताना रवी खिवंसरा म्हणाले कि महिलांनी बनविलेल्या वस्तुंना चालना मिळावी या हेतुने दिनांक २ व ३ ऑगस्ट रोजी पाटीदार भवन जालना रोड येथे लेडीज विंग उडाण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे .दिनांक २ ऑगस्ट रोजी सामाजिक कार्य करणा-या महिलांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उदघाटन संगीता ललवाणी, वैशाली छाजेड, पुष्पाताईजी संदिपानजी भुमरे, अंजली अतुल सावे, वैशाली संजय केणेकर, देवयानी डोणगावकर, प्रियंका परमार, भारती बागरेचा, अंजली भागवत कराड, मनिषा भंसाली, राखी देसरडा, देवयानीजी पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन जितो महाराष्ट्राचे आअध्यक्ष रविजी खिवंसरा, पारस ओस्तवाल, दिनेश मुथा, पुखराज पगारिया, सुभाषजी नहार, गौतमचंद संचेती, झुंबरलाल पगारिया, मिठालालजी कांकरिया, अनिलमामा संचेती आदींचया प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या प्रदर्शनी मध्ये सर्व स्तरातील महिलांचा सहभाग राहणार आहे. या ट्रेड फेअरमध्ये गृहउपयोगी वस्तु तसेच राखी सनानिमीत महिलांनी घरी बनविलेल्या आकर्षक राखीचे सुध्दा प्रदर्शन येथे होणार आहे. त्याच प्रमाणे कपडे, ज्वेलरी, विविध प्रकारच्या राख्या, भेट वस्तु, बेलशीट, वास्तुकला तसेच वेगवेळ्या प्रकारच्या खादय पदार्थाचे स्टॉलसाडी ड?स, ज्वेलरी, आदीचे स्टॉल राहणार आहे. तसेच हाताने बनविलेले राखी, भिस्कीट, केक आदी पदार्थांचे स्टॉल येथे लावण्यात येणार आहे. हे या प्रदर्शनी मध्ये सकाळी १० ते रात्री ८ पर्यंत उघडे राहणार आहे. या प्रदर्शनीमध्ये अनाथआश्रम व मतीमंद अंध विदयालयातील मुलांनाही तयार केलेल्या विविध वस्तुंचे स्टॉलही लावण्यात येणार आहे. या प्रदर्शनासाठी जयपूर जोधपुर पुना मुंबई, गुजरात, नाशिक, जळगांव, धुळे, परभणी आदी ठिकाणाहुन सुध्दा ११० स्टॉल लावण्यात येणार आहे. तरी सर्व स्तरातील महिलांना मोफत प्रवेश ठेवण्यात आला आहे. सदर कार्यक्रम जितो लेडीज विंग या सतत वर्षभर विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम व जनकल्याणकारी योजना वेगवेगळ्या ठिकाणी करत असतात त्या अनुषंगाने महिलांनी घरी बर्नावलेले पदार्थाचा प्रचार व्हावा व महिलांना चालना मिळावी या हेतुने या ट्रेड फेअरचे आयोजन केले आहे. ती या प्रदर्शनीचा लाभ घ्यावा असे आवाहन जितो लेडीज विंग चे महाराष्ट्राचे वाईस चेअरमेन रवि खिवंसरा जितो चाप्टर संभाजीनगर चे चेअरमेन पारस ओस्तवाल, सचिव दिनेश मुथा, जितो लेडीज विंगच्या अध्यक्षा डिंपल पगारिया, चिफ सचिव प्रिया मुथ्था व सदस्य यांनी दिली.

## इन्फोगेनने मोहित भट्ट यांची चीफ डिलिव्हरी आणि इनोव्हेशन ऑफिसर म्हणून नियुक्ती केली

पुणे - इन्फोगेन , सिलिकॉन व्हॅलीमध्ये मुख्यालय असलेली डिजिटल ग्राहक अनुभव अभियांत्रिकी कंपनीने मोहित भट्ट यांची मुख्य वितरण आणि अभिनव अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.त्यांच्या भूमिकेत, मोहित इन्फोगेनच्या ग्राहकांसाठी सेवा वितरणाचे नेतृत्व करेल आणि त्यांना वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या लँडस्केपमध्ये मार्गदर्शन करण्यासाठी त्यांच्यासोबत भागीदारी करेल. मेंटॉरशिप आणि सखोल उद्योग समजून घेऊन, ते नाविन्यपूर्ण चार्टर चालवतील आणि विविध क्षेत्रातील ग्राहकांना त्यांच्या डिजिटल परिवर्तनाच्या प्रवासाला गती देण्यासाठी धोरणात्मक मार्गदर्शन प्रदान करतील. याव्यतिरिक्त, ते इन्फोजेनमध्ये नवीन तंत्रज्ञान क्षमतांच्या विकासाचे नेतृत्व करतील, सर्जनशील समस्या सोडवण्यास आणि अत्याधुनिक उपायांचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या संस्कृतीला प्रोत्साहन देतील.इन्फोगेनचे सीईओ दिनेश वेणुगोपाल म्हणाले, आम्हाला आमचा मुख्य डिलिव्हरी आणि इनोव्हेशन ऑफिसर म्हणून खूप आनंद होत आहे इन्फोगेनला नवीन उंचीवर नेईल, आमच्या डिजिटल क्षमता वाढवतील, नवनवीन उपाय तयार करेल आणि आमच्या ग्राहकांना तंत्रज्ञानाच्या आघाडीवर राहण्यासाठी त्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असेल.

## विश्वास वर्ल्ड टेक प्रायव्हेट लिमिटेडने विश्वस्पे प आणि विश्वास वर्ल्ड मार्ट ई-कॉमर्स लाँच केले

मुंबई - विश्वास वर्ल्ड टेक प्रायव्हेट लिमिटेड, बेंगळुरू स्थित नवीन उपक्रमाने दोन नवीन प्लॅटफॉर्म लाँच करून डिजिटल लँडस्केपमध्ये क्रांती केली आहे: विश्वासस्पे प आणि विश्वास वर्ल्ड मार्ट ई-कॉमर्स.२७ जुलै रोजी शेरेटन ग्रँड येथे श्री विनय गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली बहुप्रतिक्षित प्रक्षेपण कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला प्रसिद्ध अभिनेते प्रेम, रंजनी राघवन, कोमल कुमार आणि अनेक नामवंत व्यक्तीही उपस्थित होत्या.विश्वास वर्ल्ड टेक ची स्थापना महत्त्वाकांक्षी उद्योजक विश्वास एन यांनी केली आहे ज्याचा उद्देश ग्राहकांच्या अनुभवाचे आधुनिकीकरण करण्यासाठी अनन्य डिजिटल उपाय प्रदान करणे आहे. कंपनीने विश्वासपे प, एक अत्याधुनिक पेमेंट प्लॅटफॉर्म विकसित केले आहे जे अनेक वैशिष्ट्ये आणि सवलती ऑफर करण्यासाठी डिझाइन केलेले आहे आणि विश्वास वर्ल्ड मार्ट, एक ई-कॉमर्स डेस्टिनेशन जेथे ग्राहक उत्पादनांची विस्तृत श्रेणी शोधू शकतात आणि शोधू शकतात.या लॉन्चवर भाष्य करताना, विश्वास वर्ल्ड टेक प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक विश्वास एन म्हणाले, विश्वसपे प आणि विश्वास वर्ल्ड मार्ट ई-कॉमर्स हे ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करणाऱ्या अभिनव उपायांसह डिजिटल लँडस्केपमध्ये क्रांती घडवणे हे आमचे ध्येय आहे ही फक्त एक स्मार्ट, अधिक जोडलेल्या जगाकडे आमच्या प्रवासाची सुरुवात आहे.

## एच अँड एम ने नवीन स्टोअरसह आपले अस्तित्व केले मजबूत

मुंबई : टिकाऊ मार्गाने सर्वोत्तम किंमतीत फॅशन आणि गुणवत्तेसाठी प्रसिद्ध असलेली आंतरराष्ट्रीय रिटेल विक्रेते एच अँड एम इंडिया यांनी प्रसिद्ध के.एल व्हिक्टोरिया, वांद्रे येथील लिंकिंग रोड येथील मुंबईत आपल्या आठव्या स्टोअरच्या भव्य उद्धाटनाची अभिमानाने घोषणा केली. स्टोअरचे उद्धाटन आदित्य रॉय कपूर या सेलिब्रिटीकडून करण्यात आले. नवीन एच अँड एम स्टोअर, मुंबईच्या सर्वात गजबजलेल्या आणि फॅशनेबल परिसरात असून आपल्या सर्व ग्राहकांसाठी उत्तम खरेदीसाठी आश्वासन देते. २०२०.३६ चौरस मीटरमध्ये पसरलेल्या या स्टोअरमध्ये पुरुष, स्त्रिया आणि मुलांसाठी कपडे आणि क्सेसरीजची विस्तृत श्रेणी आहे, जी वैविध्यपूर्ण अभिरुची आणि प्राधान्ये पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेली आहे. त्यासोबत, महिलांच्या कलेक्शनमध्ये विशेष महिलांसाठी गोष्टी आहेत, ज्यात मैचिंग सेट, ऑफ-शोल्डर टॉप और टेलर्ड पीसेस आहेत, ज्याची किंमत १४९९ पासून सुरू होते. तरुण मुलींसाठी, बॅगी डेनिम आणि ग्राफिक टीज़ यांचे पर्याय असून यांची किंमत ९९९ पासून सुरू होत आहे. पुरुषांच्या ऑफरमध्ये ७९९ पासून सुरू होणारे फ्रेंच वर्कवेअर आणि ओव्हरशर्ट आणि प्लीटेड ट्राउझर्स सारख्या नॉटिकल शैलींचा समावेश आहे.

## विवो इंडिया ने १० वर्षे पूर्ण केली

पुणे- नाविन्यपूर्ण स्मार्टफोन ब्रँड विवो ने विवो टेक डे २०२४ च्या दुसऱ्या आवृत्तीचे आयोजन करून भारतात दहाव्या वर्धापन दिनाच्या सोहळ्याला सुरुवात केली. गेल्या दहा वर्षांत, विवो नावीन्यपूर्ण आणि उत्कृष्टतेचा समानार्थी बनला आहे, ज्याने भारतीय मोबाइल इकोसिस्टमच्या वाढीस महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. अनुभवात्मक इव्हेंटमध्ये, विवो ने ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्याच्या बाजारातील समजावर आधारित आपल्या नवीनतम तंत्रज्ञान ऑफरचे प्रदर्शन केले. एका अनोख्या एक्सप्लोरेटरी शोकेसमध्ये, विवोच्या संशोधन आणि विकास तज्ञांनी विविध तंत्रज्ञानाचा पडद्यामागचा अनोखा देखावा दाखवला. आंतरराष्ट्रीय आणि भारतीय प्रमुख भागीदारांच्या गटाने विवो स्मार्टफोन बनवणाऱ्या विविध तंत्रज्ञानाचे प्रदर्शन केले.

# पाणी संवर्धन काळाची गरज : प्रा.डॉ.प्रफुल्ल शिंदे

## जलसंवर्धन विषयावर दुधड येथे जनजागृतीपर कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. ३० : आपला भाग आवर्षण प्रवनक्षेत्रात येत असल्यामुळे तसेच वातावरणात होत असलेल्या बदलामुळे यापुढे पावसाचे प्रमाण कमीच राहणार आहे. आपण पडणारे पाणी तर वाढवू शकत नाही परंतु पडणाऱ्या प्रत्येक पाण्याचा थेंब जमिनीत कसा मुरेल आणि उपलब्ध पाण्याचा सुयोग्य वापर कसा करता येईल याकडे गांभीर्याने लक्ष देऊ शकतो. समकालीन काळामध्ये पाण्याचे संवर्धन करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन प्रा.डॉ.प्रफुल्ल शिंदे यांनी केले.



एमजीएम रेडिओ ९०.८ एफएम, स्मार्ट, युनिसेफ, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर, नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय गांधेली यांच्या संयुक्त विद्यमाने जलसंवर्धन या विषयावर दुधड येथे जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, एमजीएम विद्यापीठाचे भूवैज्ञानिक डॉ.प्रफुल्ल शिंदे यांनी उपस्थित नागरिकांशी संवाद साधला. या कार्यक्रमास सरपंच गंगासागर चौधरी, महिला बचत गटाच्या प्रतिनिधी, युवक मंडळाचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा.डॉ.शिंदे म्हणाले, सध्या उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याच्या काही सोप्या पद्धतीमध्ये गळके नळ, पाईपलाईन, पाण्याच्या टाक्या दुरुस्त करणे, दाढी करताना, ब्रश करताना, बेसिनचा नळ बंद करणे, धुणे - भांड्याच्या पाण्याचा पुनर्वापर करणे, शोष खड्डे आदींचा समावेश होतो.

या कार्यक्रमात पाणी बचतीवर यूनीसेफच्यावतीने तयार करण्यात आलेल्या प्ले स्टोअरवरील 'हू रींश' या पविषयी माहिती देऊन ते डाऊनलोड करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एमजीएम रेडिओचे केंद्रप्रमुख सुनील शिरसिकर यांनी केले तर सूत्रसंचालन आर.जे.मनीषा यांनी केले. कार्यक्रमाचे आभार ग्रामसेवक संतोष मर्मट यांनी मानले. हा जनजागृतीपर कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता आर. जे.अदनान, अश्विनी निटूरकर आणि ग्रामपंचायतच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या प्रसंगी जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## तिरंगा चौक लगतच्या नव्या कोरे रस्त्यावर शोरूमची मक्तेदारी

### नव्या कोऱ्या गाड्या रस्त्यावरच केल्या जातात पार्किंग

वाळूज महानगर -तिरंगा चौकालगतच्या नव्या कोऱ्या रस्त्याचा वापर या मार्गावर असलेल्या शोरूम चालक सर्रास वापर करत असून या रस्त्यावर नव्या गाड्या उतरवून अर्ध्या रस्त्यावर अस्तव्यस्त गाड्या उभ्या करून वाहतुकीला अडथळा निर्माण करीत आहे.या अस्ताव्यस्त वाहन पार्किंगमुळे हा मार्ग अपघातांचे केंद्र बनला आहे. अवैधपणे पार्किंग केलेल्या वाहनामुळे जवळपास अर्धा मुख्य रस्ता व्यापतात, त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो आणि अपघाताचा धोका वाढतो.



त्यामुळे दैनंदिन प्रवाशांची गैरसोय होत आहे. त्यांनी आपली नाराजी व्यक्त केली असून या समस्येवर त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे. रस्त्याच्या कडेला असलेल्या एका दुचाकीच्या शोरूम च्या मालकीच्या नव्या कोऱ्या विना पासिंग वाहनांमुळे ही गर्दी प्रामुख्याने होते.

या शोरूमच्या वाहनामुळे पादचाऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून दुचाकीस्वारांना पार्क केलेल्या दुचाकी मधून सुरक्षित मार्ग शोधण्यासाठी धडपड करावी लागते. सततची वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पार्किंग नियमांची कडक अंमलबजावणी करण्याची मागणी नागरिक करीत आहेत.

## ज्या देशाचा इतिहास बदलतो तो देश उध्वस्त होतो : डॉ. प्रा. प्रल्हाद लुलेकर

तभा वृत्तसेवा

पैठण दि ३० :- जीवनातल्या आकांक्षा आणि स्वप्न उत्तुंग ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या देशाचा इतिहास नीट समजून घेतला पाहिजे. पण सध्या आपल्या देशाचा इतिहास बदलला जाण्याचा प्रयत्न केला जातोय. पण ज्या देशाचा इतिहास बदलला जातो तो देश उद्धस्त होतो.' असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी व्यक्त केले. ते प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यवाह कै. भाऊरावजी पाटील शिसोदे स्मृतीदिनानिमित्त प्रतिष्ठान महाविद्यालयात बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री नारायणराव गोंडे पाटील हे होते.



संस्थेचे सचिव मा. राजेंद्र पाटील शिसोदे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेताना भाऊराव पाटलांच्या कार्याला उजाळा दिला. गोरगरीब शेतकर्यांच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी वस्तीगृह सुरू केले आणि त्यांच्या भोजनासाठी स्वत:च्या घरचे धान्य आणून द्यायचे अशा आठवणी त्यांनी सांगितल्या. या कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष मा. रविंद्र पा. शिसोदे, उपाध्यक्ष मा. अशोकराव पाटील निर्मळ, सुभाषराव पा. निर्मळ, महेंद्र शिसोदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस.जी. सोनकांबळे यांनी केले. सुत्रसंचलन डॉ. हंसराज जाधव यांनी तर आभार डॉ. मनिषा काळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य प्रा. वैजनाथ चाटे, प्रबंधक शेखर शिंदे ,इम्रान पठाण, स्टाफ सेक्रेटरी डॉ.रमाकांत तिडके, डॉ.राजेश करपे, डॉ. अर्जून मोरे, हिवराळे, रूपेकर यांनी प्रयत्न केले.

## मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या तालुकाध्यक्षपदी केतन काजे यांची नियुक्ती

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.३१ जुलै - शिवसेनेचे तालुका प्रमुख केतन काजे यांची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या कन्नड सोयगाव विधानसभेच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली आहे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,पालकमंत्री अब्दुल सत्तार,खासदार संदीपान भुमरे यांच्या आदेशानुसार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या तालुका अध्यक्षपदी तालुका प्रमुख केतन काजे यांची निवड करण्यात आली असून,मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कन्नड सोयगाव विधानसभेत गावोगावी पोहचविण्यासाठी कटिबद्ध असेल,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,पालकमंत्री



अब्दुल सत्तार खासदार संदीपान भुमरे यांनी जी जबाबदारी सोपविली आहे ती जबाबदारी प्रामाणिकपणाने पार पाडणार असल्याची ग्वाही तालुका प्रमुख केत काजे यांनी दिली. या निवडीबद्दल तहसीलदार विद्याचरण कडवकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## शेतकऱ्यांना पीक विमा द्या ! उद्योजक मनोज पवार यांची तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे मागणी

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.३१ जुलै - प्रधानमंत्री पीक विमा योजनेतंर्गत पीक विमा भरलेल्या व पिकांचे नुकसान झाल्याने पीक विमा कंपनीकडे तक्रार केलेल्या कन्नड तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक मनोज पवार यांनी तालुका कृषी अधिकारी बाळराजे मुळीक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

प्रधानमंत्री पीक योजना खरीफ हंगाम -२०२३ मध्ये कन्नड तालुक्यातील एकूण किती शेतकऱ्यांनी सहभाग घेतला व



त्यापैकी किती जणांनी पीक नुकसानीच्या तक्रारी पीक विमा कंपनीकडे केल्या आहेत?, तसेच नोव्हेंबर २०२३ मध्ये अवकाळी पावसामुळे कापूस, तूर आणि रब्बी पिकांचे नुकसान झाले होते, संबंधित शेतकऱ्यांनी पीक विमा कंपनीकडे तक्रार करूनही त्यांचा पंचनामा झालेला नाही, त्यांची माहिती द्यावी.

या सर्व वंचित शेतकऱ्यांचा पीक विमा लवकर मंजूर करून त्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करावी अशी मागणी मनोज पवार यांनी या निवेदनाद्वारे केली आहे. कृषी अधिकारी मुळीक यांना निवेदन देताना त्यांच्यासोबत मनोज देशमुख, पवन ठाकूर, अनिल खंबाट, आदींसह कार्यकर्ते, शेतकरी उपस्थित होते.

## सोयगाव - संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात करिअर कट्टा समन्वयक कार्यशाळा संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३० जुलै

येथील अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात आज तालुक्यातील वरीष्ठ महाविद्यालयीन करिअर कट्टा समन्वयक कार्यशाळा संपन्न झाली.महाराष्ट्र सरकारचा उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यात महाविद्यालयीन युवकांसाठी करिअर कट्टा उपक्रम मागील तीन वर्षांपासून सुरू आहे. या उपक्रमात सोयगाव तालुक्यातील विद्यार्थ्यांना सहभाग घेता यावा व त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी तालुक्यातील सर्व वरीष्ठ महाविद्यालय समन्वयक यांच्यासाठी कार्यशाळा आयोजित केली होती.कार्यशाळेच्या सुरुवातीला प्रा श्रीकृष्ण परिहार यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यशाळा आयोजना मागील भूमिका स्पष्ट केली तर समन्वयक डॉ.विनोद बारोटे यांनी उपस्थित प्राध्यापकाना पीपीटीच्या साहाय्याने सविस्तर मार्गदर्शन केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांच्या अध्यक्षीय समारोपाने कार्यशाळेची सांगता झाली. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे,करिअर कट्टा समन्वयक डॉ.ज्योती आधाने यांच्यासह तालुक्यातील विविध महाविद्यालयाचे समन्वयक उपस्थित होते.

**कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली, जि.हिंगोली**

फोन नं. (०२४५६) २२१७२७, फैक्स नं. (०२४५६) २२१७२७,
E-Mail-coud.hingoli@maharashtra.gov.in
विभाग :- बांधकाम विभाग, जा.क्र./न.पा./२३०८/२०२४-२५, दिनांक २९/७/२०२४

**ई-निविदा कार्यप्रणाली अंतर्गत निविदा सुचना सन २०२४-२५**

मुख्याधिकारी नगर परिषद हिंगोली तर्फे (दुरध्वनी क्र. ०२४५६-२२१७२७ ई-मेल coud.hingoli@maharashtra.gov.in नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन हिंगोली शहरामध्ये सी.सी. रस्त्याचे कामाकरिता ई-निविदा प्रणालीद्वारे दिनांक ६/०८/२०२४ रोजी दुपारी ५.०० वाजे पर्यत निविदा मागवित आहेत. निविदा विषयी तपशिल महाराष्ट्र शासनाच्या ई-टेंडरींग पोर्टल http://mahatenders.gov.inda दि. ३०/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून संपुर्ण माहिती व अटी व शर्तीसह पहावयास मिळेल.

नगर अभियंता
हिंगोली नगरपरिषद हिंगोली

मुख्याधिकारी
हिंगोली नगरपरिषद हिंगोली

**Ahmednagar Municipal Corporation, Ahmednagar**

**PM E-Bus Seva**

**Year 2024-2026/E-Tender Notice No.01 Year 2024-2025**
**E Tender No. NIC TID: 2024_ANMC_1061093_1**

E-Tender Notice No.01 for the PM- e-BusSeva Year 2024-2025-1 work has been bublished on the government website http://mahaetenders.gov.in for online bidding through e-tender mode.

However, the concerned should take note of this. (With approval of Honble Commissioner)

Sign/-
Head of Electric Department
Ahmednagar Municipal Corporation

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२३/२०२४ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : ३०-०७-२०२४

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, सविता रतन साखळे यांनी मोहल्ला अनुसयानगर वार्ड क्र १ सोयगांव स.नं. ----- मधील प्लॉट १३५९/१ त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

पूर्व : जागा नं. २३२ ची जागा पश्चिम : जागा नं. १८३ ची जागा
दक्षिण : जागा नं. १८४ उत्तर : जागा नं. १८६
आकार : पूर्व पश्चिम ६४५.६ दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

संचिका क्र.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.मू. नोंद/सी.आर/२०२४
दिनांक : २५/०७/२०२४.

**जाहीर प्रगटन**

अर्जदार :- श्री/श्रीमती नितीन शांतीलाल चनघटे रा पिपरखेडा ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- ग्राम पंचायत कार्यालय पिपरखेडा ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार स्वतः नामे नितीन शांतीलाल चनघटे यांचा जन्म दिनांक १७/०६/१९८७ रोजी मौजे पिपरखेडा ता. गंगापूर येथे झाला असून ग्राम पंचायत कार्यालय पिपरखेडाता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २५/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक: २५/०७/२०२४.

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

संचिका क्र.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.म.नोंद/सी.आर/२०२४
दिनांक :- २१/०७/२०२४.

**जाहीर प्रगटन**

अर्जदार :- श्री/श्रीमती गोरख गुलाब राजपुत रा. नेवरगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर,

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय नेवरगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अ/र्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांची मुलगी नामे सारीका गोरख राजपुत यांचा जन्म दिनांक ०६/०६/२०१७ रोजी मौजे नेवरगांव ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय नेवरगांव ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून १५ दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २१/०७/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक :- २१/०७/२०२४.

उपविभागीय अधिकारी, वैजापूर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकूल योजने अंतर्गत धनगर समाजासाठी जिल्ह्यात ६९४३ घरकुल मंजूर

## आ.बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नाला यश आल्याने धनगर समाजामध्ये आंनदाचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकूल योजना या धनगर समाजासाठी घरे बांधण्याच्या योजनेंतर्गत जिल्हाधिकारी, जालना यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने प्रशासकीय मान्यता दिलेल्या व सहायक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण, जालना यांनी संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये शासनास सादर केलेल्या एकूण ६९४३ वैयक्तिक लाभार्थ्यांच्या प्रस्तावास संबंधित शासन निर्णयातील अटी शर्तीच्या अधिन राहून शासनाची कार्योत्तर मंजूरी देण्यात आली असून महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या विशेष विशेष प्रयत्नाला यश आल्याने धनगर समाजात समाधानाचे वातावरण पसरले असून जालना जिल्ह्यातील अनेक धनगर समाज बांधव माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे आभार मानत आहे. धनगर



समाज बांधवांना त्यांची हक्काची घर मिळावी याकरिता आमदार बबनराव लोणीकर यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना अनेकदा भेटून पत्र देऊन जालना जिल्ह्यातील धनगर समाज बांधवांच्या घरकुलाचा प्रश्न सोडविण्याची विनंती केली होती. याबाबतीत जिल्हाधिकारी जालना यांच्या दालनातही आमदार बबनराव लोणीकर यांनी आढावा बैठक घेतली होती. जालना जिल्ह्यातील धनगर समाज बांधवांना प्रती लाभार्थी रू.१.२० लक्ष व ४ टक्के प्रशासकीय निधी प्रमाणे एकूण रु. ८६,६४,८६,४००/- (अक्षरी रुपये श्याऐंशी कोटी चौसष्ट लक्ष श्याऐंशी हजार चारशे फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदयस्थितीत विभागाकडे उपलब्ध निधी लक्षात घेता, एकूण निधीपैकी रु.६,०६,००,०००/- (अक्षरी रुपये सहा कोटी सहा लाख फक्त) इतका निधी वितरित करण्यात आला आहे. उर्वरित निधी या योजनेंतर्गत निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्यात येनार आहे.

दिव्यांगांसाठी पाचशे कोटींचे भागभांडवल

# एकही दिव्यांग व्यक्ती लाभापासून वंचित राहणार नाही याची काळजी घेणार -अर्जूनराव खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे हे अत्यंत दिलदार आणि संवेदनशील मुख्यमंत्री आहेत. राज्यातील अपंगांसाठी मिळणाऱ्या कर्जाची मर्यादा ५० हजारावरून तब्बल अडीच लाखापर्यंत करण्यात आली आहे. तसेच रोजगारासाठी रिक्षासह अन्य विविध सोयी सवलती उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जालना विधानसभा मतदारसंघातील सर्व दिव्यांगाना आपण मदत मिळवून देणार आहोत, अशी ठाम ग्वाही माजी राज्यमंत्री तथा शिवसेनेचे उपनेते अर्जुनराव खोतकर यांनी दिली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी आपल्या मनाचा मोठेपणा दाखवत आणि अत्यंत संवेदनशीलपणे दिव्यांग बांधवांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला आहे. दिव्यांग बांधवांसाठी सुमारे पाचशे कोटी रुपयांचे भाग भांडवल महामंडळास उपलब्ध करून दिले आहे. आणि महत्त्वाचे म्हणजे याआधी दिव्यांगांना केवळ ५० हजार रुपये कर्ज मिळत होते. ती मर्यादा पाच पटीने वाढविली असून आता अडीच लाख रुपये त्यांना मिळू शकणार आहेत. तसेच महानगरपालिका क्षेत्रात दिव्यांगांना प्रशिक्षण, वैद्यकीय सेवा व इतर सवलती दिल्या जाणार आहेत. तसेच अपंग व्यक्तींसाठी ६६७ रिक्षा वाटप केल्या जाणार आहेत. माझ्या मतदारसंघातील सर्व दिव्यांग, अपंग व्यक्तींची एकत्र माहिती केली जात असून सरकारने दिलेल्या या सोयी सवलती व लाभापासून एकही दिव्यांग व्यक्ती वंचित राहणार नाही याची आपण व्यक्तिशः काळजी घेणार आहोत. दिव्यांगाचे दुःख फक्त त्यांनाच ठाऊक आहे. त्यामुळे आपण काळजीपूर्वक लक्ष घालणार आहोत, असेही अर्जुनराव खोतकर यांनी म्हटले असून मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे याबद्दल विशेष आभारही व्यक्त केले आहेत.

## संक्षिप्त

### निर्णय देण्यास विलंब : जालना जिल्हाधिकाऱ्यांना १०१ रुपयांचा दंड

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

ग्रामपंचायत संदर्भात तक्रार अर्जावर सुनावणी होऊन सहा महिन्यांचा कालावधी उलटल्यानंतरही राखीव ठेवलेला निर्णय देण्यास विलंब करणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांना चांगलेच महागात पडले असून उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जिल्हाधिकाऱ्यांना १०१ रु.दंड ठोठावला आहे.

पांगरी खुर्द ता .मंठा येथील शेतकरी नारायण काळे यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ७ आणि ३६ अंतर्गत ग्रामपंचायतीच्या निष्क्रिय कारभारासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केली होती.जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने सुनावणी घेण्यात येऊन निकाल राखीव ठेवण्यात आला .निर्णयाची प्रत मिळण्यासाठी नारायण काळे यांनी वेळोवेळी मागणी केली.तसेच ३० जानेवारी २०२४ ते २८ जून २०२४ या कालावधीत निवेदने सुध्दा दिली. मात्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने हताश झालेल्या नारायण काळे यांनी ड. प्रशांत बोराडे यांच्या मार्फत उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली. जालना जिल्हाधिकारी यांनी निकाल राखून ठेवत केलेल्या निष्काळजीपणाबाबत ड. बोराडे यांनी पुराव्यासह जोरदार युक्तिवाद केला. उच्च न्यायालय खंडपीठातील न्या.रवींद्र घुगे,न्या.वाय.जी. खोब्रागडे यांच्या पीठाने जालना जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांना १०१रु. दंड ठोठावला असून तीस दिवसात न्यायालयात जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

### दडपशाहिच्या राजकारणाला कंटाळून भोगगावचे तरुण भाजपात

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

३० जुलै अंबड घनसावंगी भोगगाव येथील असंख्य युवकांनी आपल्या गावच्या रखडलेल्या विकासासाठी प्रस्थापितांच्या दडपशाहिच्या राजकारणाला कंटाळून आज भाजपात प्रवेश केला. घाटगे साहेबांमुळे आम्ही जागरूक झाले असून आता आम्ही दडपशाहीचे राजकारण संपवू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शाखा अध्यक्ष राजेंद्र मुळे (तालुका कोषाध्यक्ष), बूथ प्रमुख सचिन मुळे, भारत मुळे, ईश्वर मुळे अमित जाधव,व धीरज मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व युवकांनी सतीश घाटगे यांच्या हस्ते पक्ष प्रवेश केला.सर्व युवकांचे सतीश घाटगे यांनी पक्षात स्वागत करून सत्कार केला. त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्याचा शब्द दिला. तसेच लवकरच या युवकांमधील शिक्षिताना रोजगार देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले. यावेळी विष्णू जाधव, विकास वाघमारे, भीमराव आवटे, रंगनाथ जंगले, बालाजी कचरे ,बाबासाहेब पंडूरे, प्रदीप सोनवणे, अमीर पठाण, सुमित तूपसौंदर, राहुल तूपसौंदर, योगेश कचरे, राहुल खरात, अनिरुद्ध खरात, किरण विठोरे, विकास बर्डे, अंगद साबळे, यांनी प्रवेश केला.

### बेकायदेशीर कृत्य केल्यास गुन्हा नोंदवणार -सचिन खामगळ

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी / प्रतिनिधी**



टेंभुर्णी पोलिस ठाणे हद्दीत कुठल्याही प्रकारचे बेकायदेशीर कृत्य केल्यास त्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांनी दिली.

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी हद्दीतील सातेफळ या गावात शासकीय जमिन गट क्रमांक १४ या ठिकाणी दि २८ रोजी विनापरवाना साहित्य रत्न आण्णाभाऊ साठे यांचा अनधिकृत रित्या पुतळा उभारण्यात आला आहे. सदर प्रकरणामध्ये सातेफळ येथील तलाठी यांच्या तक्रारीवरून कायदेशीररित्या गुन्हा दाखल करण्यात आला असून तो तपास पोलीस उपनिरीक्षक श्री देशमाने करत आहेत.

खामगळ म्हणाले की राष्ट्रपुरुषांचा आदर व्यक्त करण्यासाठी त्यांचे पुतळे उभे करण्यात येते ,मात्र या पुतळ्याचे देखभाल व दुरुस्ती अभावी विटंबना होऊन समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्य शासनाने पुतळ्याची उभारणी व त्यांचे पावित्र राखण्यासंदर्भात काही नियम केले आहे ,मात्र या नियमाचे उल्लंघन करून जबाबदारीने वागण्यात येत नसल्याने अनुसूचित प्रकाराला चालना मिळून सामाजिक वातावरण ठवळण्यास सुरवात होते. त्यामुळे टेंभुर्णी पोलीस ठाणे हद्दीतील सर्व नागरिकांनी जबाबदारीने वागून पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे .

# जालना जिल्ह्यात उद्योग उभारणीसाठी उद्योजकांना जिल्हा प्रशासनाचे सर्व सहकार्य -जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

नवउद्योजकांना उद्योग उभारणीसाठी जालना जिल्ह्यात पोषक वातावरण आहे. प्रमुख शहरांना जोडणारे रस्ते, रेल्वे मार्ग, समृध्दी महामार्ग यासारख्या वाहतुकीच्या सुविधांसह इतर पायाभूत सुविधा जिल्हयात उपलब्ध असल्याने उद्योजकांनी आपला उद्योग या जिल्ह्यात अवश्य उभारावा, यासाठी जिल्हा प्रशासनाचे उद्योजकांना सर्व सहकार्य राहिल, अशी ग्वाही जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.



सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग (चडचए) क्षेत्रासंदर्भात राज्य व केंद्र शासनाची धोरणे व उपक्रम याबाबत जागरुकता वाढविण्यासाठी उद्योजक व निर्यातदार यांच्याकरीता आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवन येथे इग्नाइट महाराष्ट्र कार्यशाळा (खत्रछखढए च-क-ठ-डक्कठ--२०२४) संपन्न झाली. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते.

कार्यशाळेस अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार, छत्रपती संभाजीनगर विभागाचे उद्योग सहसंचालक बी.टी. यशवंते, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक योगेश सारणीकर, सिंगल विंडोचे (मैत्री) अधिकारी प्रदीप दळवी, सिडबीचे व्यवस्थापकीय अधिकारी मनोज कुमार सहयोगी, जालन्याचे पोस्टमास्टर संदिप महाजन, आयडीबीयचे उपव्यवस्थापक मिलिंद काळे, निर्यात तज्ञ अमोल मोहिते, विमा सल्लागार आनंद अमृतकर आदी उपस्थित होते. यावेळी उद्योजक, औद्योगिक संघटनेचे पदाधिकारी, नवउद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, जालना हा कृषी प्रधान जिल्हा आहे. यासह हा जिल्हा स्टील, बियाणे उद्योगांसाठी प्रसिध्द आहे. आता हा जिल्हा रेशीम उद्योगासाठीही नावारुपाला येत आहे. एकंदरीत जिल्ह्यात उद्योगासाठी अतिशय सकारात्मक पोषक वातावरण असल्याने नवउद्योजकांसाठी उद्योग उभारणीकरीता येथे चांगली संधी आहे. उद्योजकांना जिल्हा प्रशासनाचे संपूर्ण सहकार्य राहिल. उद्योग विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा उद्योजकांना प्राधान्याने लाभ दिला जाईल. सध्या जालन्याचा औद्योगिक विकास पाहता येत्या काळात हे शहर मोठे औद्योगिक शहर म्हणून नक्कीच ओळखले जाईल.

श्रीमती मेत्रेवार यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेबद्दल माहिती दिली. या योजनेच्या माध्यमातून बेरोजगार युवक-युवतींना विविध आस्थापनेवर प्रशिक्षणाची संधी मिळणार असल्याने योजनेत सहभागी होण्यासाठी उमेदवारांनी नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

श्री. बी.टी. यशवंते यांनी सूक्ष्म लघु व मध्यम उद्योग क्षेत्रासंदर्भात राज्य व केंद्र शासनाची धोरणे व उपक्रम तसेच उद्योग विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. श्री. दळवी यांनी उद्योग उभारणीसाठी लागणाऱ्या विविध परवानग्या कशा मिळवाव्यात त्यासाठी असणाऱ्या सिंगल विंडो (मैत्री) पध्दतीतबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. श्री. काळे यांनी बँकिंग फायनान्स, श्री. मोहिते यांनी निर्यात, श्री. अमृतकर यांनी उद्योगासाठी असणारा विमा, श्री. सहयोगी यांनी सिडबीचे कार्य तर श्री. महाजन यांनी टपाल कार्यालयामार्फत करण्यात येणाऱ्या मालाचे वाहतूक व्यवस्थापन याविषयी आणि श्री. सारणीकर यांनी जालना जिल्हयातील औद्योगिक विकास व सुविधांबद्दल सादरकरणाव्दारे माहिती दिली.

# सावंगी अवघडराव येथे आढळला डेंग्यूचा १ रुग्ण



**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील सावंगी अवघडराव येथे डेंग्यू चा १ आढळले असून त्याच्यावर औरंगाबाद संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयामध्ये सध्या उपचार सुरू आहे.प्राथमिक आरोग्य केंद्र व सावंगी अवघडराव ग्रामपंचायत यांनी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

सावंगी अवघडराव येथील अमान सलमान शहा वय ९ वर्ष या लहान मुलाला डेंग्यूचे लक्षण आढळल्याने त्याला ऊपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दोन दिवसांपूर्वी तापाची चढ-उतार लक्षात घेता त्यांची रक्ताची तपासणी केल्यानंतर डेंग्यूची रिपोर्ट पॉझिटिव्ह आली असून. अमान शहा याच्यावर औरंगाबाद संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात सध्या उपचार सुरू आहेत. गावात आणखीन काही जणांना लक्षणे दिसून येत असल्याने पूर्ण गावाचे आरोग्य विभागाने सर्वेक्षण करण्याची मागणी होत आहे. गावात डेंगीचे रुग्ण आढळून आल्यानंतर वावी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.अहमद अलकसेरी, डॉ.विनोद सांवगीकर यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय पथकाने गावात सर्वेक्षणास प्रारंभ केला आहे. आशा सेविकांचे पथके या सर्वेक्षणात सहभागी झाले आहे. डास प्रतिबंधात्मक धुराळणीसाठी ग्रामपंचायत प्रशासनाला वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पत्र दिले आहे.काही ठिकाणी गवत मोठ्या प्रमाणात उगवल्यामुळे डासांना पोषक परिस्थिती निर्माण झाली आहे. रुग्णांची संख्या आणखी वाढू नये, यासाठी संपूर्ण गावात सर्वेक्षणासह प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# सातेफळ जिल्हा परिषद शाळेत घुसले राजकारण

**तभा वृत्तसेवा**
**टेंभुर्णी प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यातील सातेफळ येथील जिल्हा परिषदेच्या शाळेचे शालेय पोषण आहाराचे प्रकरण पूर्ण जिल्हात गाजत असतांना गावातील काही मोजक्या लोकांनी गेल्या आठवड्यात संबधित शिक्षकाची तक्रार केली होती.

त्या तक्रारीच्या अनुषंगाने जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुनावणी लावून या प्रकरणात तथ्य नसल्याचे नमूद केले असल्याचे शिक्षण समितीच्या अध्यक्षा यांच्या सांगण्यावरून कळाले. त्या नंतर सातेफळ येथील तक्रारदारांनी सातेफळ येथील शाळेचे मुख्याध्यापक श्री सोसे यांनी अनेकवेळा गैरव्यवहार केला असल्याचा ठपका ठेवत जालना जिल्हा परिषदे समोर आमरण उपोषणा ला सुरवात करून मुख्यध्यापक जो पर्यंत निलंबित होत नाही तो पर्यत आमरण उपोषण करू अशी अट ठेवली. हे संबधित उपोषण पूर्णपणे खोटे असून संबधित उपोषण कर्त्यांनी मला पैशाची मागणी केली असल्याचे मुख्यध्यापक श्री सोसे यांनी वरिष्ठांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. सातेफळ येथील जिल्हा परिषद शाळा ही अतिशय उत्कृष्ट असून शाळेच्या शालेय शिक्षण समितीच्या निवडणूकित पराभव झाल्याने संबधित उपोषणकर्ते जाणून बुजून शिक्षकांना त्रास देत राजकारण करत असल्याचा आरोप गावकऱ्यांनी करून संबंधित उत्कृष्ट शिक्षकांवर कार्यवाही झाली तर गावकरी आमरण उपोषण करणार असल्याचे मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केला आहे. गावकऱ्यांनी या निवेदनात म्हटले आहे की, मुख्यध्यापक श्री सोसे यांच्यामुळे शाळेची गुणवत्ता सुधारली असून यावर्षी शाळेतील १७ विद्यार्थी एन एम एम एस मध्ये पास होऊन दोन विद्यार्थी शिष्यवृत्ती साठी पात्र ठरले असून दैनंदिन नित्यनेमाने मुख्यध्यापक यांच्याकडून ताजा भाजीपाला आणला जातो, ज्या दिवशी व्हिडिओ व्हायरल झाला त्या दिवशी भाजीपाला निवडुन शुद्ध करणे सुरू होता. तो शालेय पोषण आहारात टाकला नव्हता ,उग शिक्षकांना बदनाम करण्याचा मानस या उपोषणकर्त्यांचा आहे. संबधित मुख्यध्यापक यांच्यावर कुठलेही कार्यवाही करण्यात येऊ नये अन्यथा आमच्याकडून आपल्या कार्यलया समोर आम्ही खालील गावकरी आमरण उपोषणास सुरवात करू.या निवेदनावर शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष मारोती बनकर,सदस्य रंजना खंदारे, कुशिवरता बनकर,वर्षा घाडगे ,राहुल जाधव, उमाजी बनकर, रेखा राऊत तसेच गावकरी म्हणून बालाजी बनकर, अनंत बनकर,दत्ता बनकर,रामदास बनकर,अनिल माळी, विलास बनकर,प्रभाकर खंदारे, गणेश खंदारे,प्रकाश बनकर,अर्जुन बनकर,अमोल बनकर,योगेश बनकर,राजू बनकर,राधकीसन माळी, धर्मा घाडगे, आदी गावकऱ्यांनी स्वाक्षऱ्या आहेत

# शाळेतून घरी जाणाऱ्या मायलेकीसह चौघांना आयशरची धडक, तिघांचा दुर्दैवी अंत, चालक फरार

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



येथील मंठा शहरातून भीषण अपघाताची घटना समोर येत आहे. शाळेतून घरी जाणाऱ्या मायलेकीसह, सह वर्षीय मुलगी आणि एका ज्येष्ठ नागरिकाला भरधाव वेगाने जाणाऱ्या आयशर ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात तिघांचा मृत्यू झाला आहे. तर चार वर्षीय चिमुकली जखमी झाली आहे. मंठा येथील देवी रोडवर ही घटना घडली आहे. अपघातानंतर आयशर चालक फरार झाला असून पोलीस चालकाचा शोध घेत आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, मंठा शहरातील देवी रोडवर शाळेतून घरी जाणाऱ्या मायलेकीसह, सहा वर्षीय मुलगी आणि एका ज्येष्ठ नागरिकाला भरधाव वेगाने जाणाऱ्या आयशर ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात सहा वर्षीय मुलगी, महिला आणि एका ज्येष्ठ नागरिकाचा उपचारादरम्यान दुर्दैवी अंत झाला आहे. सीमा चव्हाण (२४), मारिया पठाण (६) आणि रूपला राठोड वय ६५ वर्ष असे मृतांचे नावे आहेत. तर या घटनेत इशिका चव्हाण ही चार वर्षाची चिमुकली मुलगी देखील जखमी झाली आहे. या घटनेनेनंतर आयशर चालक फरार झाला आहे. अपघातानंतर स्थानिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले. भीषण अपघातात तीन निष्पाप लोकांचा बळी गेल्याने मंठा शहरासह परिसरामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. अपघातानंतर चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. पोलिसांनी चालकाला ताब्यात घेऊन कडक शिक्षा करावी अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

# गावातील सिमेंट रस्त्यानंतर सरपंचपुत्र गिरीने पांदन रस्त्यावर टोपलभर मुरूम न टाकता उचलले लाखोंची बिले!

## ग्रामसेविका धरत सह जेईएचा वाटा- आधा तुम्हारा आधा मेरा, रोजगार हमी योजना आहेच त्यासाठी?

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



परतुर तालुक्यातील मौजे वैजोडा गावात सरपंच पुत्राने ४ किमी अंतराचे बोगस ग्रामपंचायतीचा ठराव संमत करून मातोश्री पांदन रस्ता मंजुरी करूण आणला यात सर्व गावकरी आनंदी होते मात्र सरपंच पुत्र अनेक महिणे शांत झाल्याचे दिसून येते नंतर अचानक रोजगार हमी मार्फत बोगस लाभार्थ्यांच्या नावावर त्या पानंद रस्त्यांचे लाखोंच्या घरात पेमेंट ग्रामसेविका तसेच जेई , एई यांना हाताशी धरुन उचलले असल्याचे रोहयो कार्यालयीन कर्मचारी एआएओ जाधव यांनी एका माहिती पत्रकाद्वारे दिले होते. त्यात अनेक वयोवृद्ध तसेच सासरी नांदत असणाऱ्या गावातील लेकी बाळी यांचेही नावे असल्याचे दिसून येते अश्या करामती सरपंच पुत्राला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी लगाम घालण्यासाठी सरसावतील का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे . तसेच



या रस्त्यासाठी संबंधीत गावातील ग्रामसेविका धरत मॅडम यांनी बोगस ठराव पत्रक तयार करूण दिला तसेच जेई यांनी गावात कधी पायच न ठेवल्याने तसेच कागदी घोडे नाचवून तया कामावर रोजगार हमी योजनेअंतर्गत लेबर पेमेंट लाखो रुपयांची बोगस लाभार्थ्यांना लाभ दिला . लाभ दिला तर दिला ठिक आहे पण चार महिणे होऊनही या नालायक सरपंच पुत्राने या पांदन रस्त्यावर टोपलभर मुरुमही अद्यापही टाकलेला नाही यावर परतुर पंचायत समितीचे नव्याने रुजु झालेले बिडीओ चौकशी करतीलच असे वाटते.



सरपंचपुत्र रामप्रसाद गिरी अधिकाऱ्यांचे अश्याप्रकारे लाड पुरवून उचलतो बोगस कामांचे बिले.

## अग्रलेख...

# आरोग्याला आव्हान

तीन वर्षांपूर्वी, सन २०२१ मध्ये उभे जग जेव्हा कोविड महामारीच्या भयाने ग्रस्त झाले होते, भविष्याच्या आणि आरोग्य सुविधांच्या काळजीने चिंतित झाले होते, तेव्हा फेब्रुवारी २०२१ मध्ये संसदेत त्या वर्षीचा देशाचा अर्थसंकल्प मांडताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी संपूर्ण देशाला एक दिलासा दिला होता. केवळ भौतिक सुविधांचा विकास म्हणजे देशाचा विकास नाही, तर आरोग्यसंपन्न समाज ही देशाच्या विकासाची पहिली गरज आहे आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठी जी काही सहा तत्त्वे सरकारने अंगीकारली आहेत, त्यामध्ये आरोग्य सुविधांचा विकास हे महत्त्वाचे तत्त्व आहे, असे त्या भाषणात त्यांनी जाहीर केले होते. कोविडच्या काळात देशाच्या औषध निर्मिती क्षेत्रातील प्रगतीचे पुरावे पाहून जगाचे डोळे दिपले. भारतात तयार झालेली कोविड प्रतिबंधक लस जगातील अनेक देशांमधील भयभीत जनतेच्या जीवरक्षणाकरिता साह्यभूत ठरली. औषधांच्या जागतिक बाजारपेठेत भारताचे स्थान उंचावले आणि भारत ही औषध निर्मिती क्षेत्रातील तिसऱ्या क्रमांकाची शक्ती म्हणून ओळखली जाऊ लागली. त्याच वेळी देशातील आरोग्य सुविधांच्या क्षेत्रातील असंख्य त्रुटी किंवा कमतरतादेखील उजेडात आल्या आणि सामाजिक आरोग्यास आव्हान देणारी महामारीसारखी संकटे उभी राहिल्यास त्यांना तोंड देण्याकरिता सक्षम ठरेल अशी सर्वंगीण परिपूर्ण आरोग्य व्यवस्था निर्माण करण्याचा संकल्पही केंद्र व वेगवेगळ्या राज्य सरकारांनी सोडला. केंद्र सरकारने त्या वर्षीच्या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने आत्मनिर्भर स्वस्थ भारत योजना जाहीर केली आणि पुढच्या सहा वर्षांसाठी, म्हणजे सन २०२७-२८ पर्यंतच्या कालावधीकरिता ६४ हजार १८४ कोटी रुपयांची तरतूदही प्रस्तावित केली. देशातील सुमारे २८ हजार ग्रामीण व शहरी आरोग्य केंद्रांना अधिक सुविधा देऊन सक्षम बनविण्याचा संकल्प सोडला गेला. आता भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा औषध उत्पादक देश बनला आहे, जेनेरिक औषधांच्या रूपाने स्वस्त आणि दर्जेदार औषधे जगाला पुरविणारा देश अशी भारताची नवी ओळख जगभर प्रस्थापित होऊ लागली आहे. जगात देशाची प्रतिष्ठा वाढत असतानाच, त्याला गालबोट लावणारे काही अप्रिय असे धंदेही उघडकीस येऊ लागले आहेत. जनतेच्या आरोग्यास सर्वोच्च प्राधान्य देण्याचा संकल्प सोडणाऱ्या या देशात बनावट, हलक्या दर्जाची आणि भेसळयुक्त औषधे निर्माण करून जनतेच्या आरोग्याशी खेळण्याचे उद्योग आता समोर येऊ लागले असून भारताच्या जागतिक प्रतिष्ठेला एक आव्हान उभे राहण्याची भीती यातून समोर येत आहे. यामुळे देशातील जनतेच्या आरोग्याशी खेळ होतोच; पण औषधांच्या जागतिक बाजारपेठेतील भारतीय औषधांच्या दर्जाविषयी प्रश्नचिन्हे उमटून या क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेवरही विपरीत परिणाम होत असल्याने, भेसळयुक्त, बनावट किंवा हलक्या दर्जाच्या औषधांच्या उद्योगांवर कठोर कारवाया करून या उद्योगाच्या मुसक्या आवळण्याची वेळ आली आहे. दोन वर्षांपूर्वी हरयाणातील एका भारतीय कंपनीने उत्पादित केलेल्या काही औषधांतील दूषित घटकांमुळे गाम्बियात ६६ बालकांचा मृत्यू झाल्याच्या बातमीने औषधनिर्माण क्षेत्रात खळबळ माजली होती. उझबेकिस्तानातही असाच प्रकार झाल्याची तक्रार पुढे आल्यानंतर भारतीय औषधांच्या विश्वासार्हतेवर उमटलेले प्रश्नचिन्ह पुसून टाकण्याचे नवेच आव्हान या क्षेत्रासमोर उभे राहिले होते. पुढे गाम्बियाने यासंदर्भातील शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला आणि भारतीय औषधांच्या सेवनामुळे मृत्यू झाल्याच्या शंकेस पुष्टी मिळत नसल्याचेही स्पष्टीकरण केले, पण अशा घटना देशातील औषध निर्मितीच्या दर्जाविषयी शंका उमटविण्यास कारणीभूत ठरतच राहतात.

गेल्या आठवड्यात संसदेच्या कामकाजातील प्रश्नोत्तराच्या तासातील चर्चेवरून औषधांचा दर्जा, गुणवत्ता आणि या उद्योगातील अनैतिकता अशा बाबी अधिक ठळकपणे अधोरेखित झाल्या. देशातील वेगवेगळी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सन २०२२-२३ च्या वर्षात तीन हजारांहून अधिक औषधे हलक्या दर्जाची असल्याचे आढळून आले होते, तर सव्वाचारशे औषधे बनावट किंवा भेसळयुक्त असल्याची बाब समोर आली होती. कोविड महामारीच्या संकटातून बाहेर पडण्याच्या आश्वासक काळात जेव्हा केंद्र आणि राज्य सरकारे जनतेच्या आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या आणाभाका घेत होते, त्याच काळात देशात बनावट, भेसळयुक्त किंवा हलक्या दर्जाच्या औषधांनी बाजारपेठेत शिरकाव केल्याचे स्पष्ट होत होते. मानवी जिवाशी सुरू झालेला हा खेळ थांबविण्यासाठी देशातील आरोग्यरक्षक यंत्रणा सतर्क झाल्या, जवळपास ४०० औषधनिर्मिती कंपन्यांच्या उत्पादनांच्या दर्जाचे फेरनिरीक्षण करण्यात आले, सुमारे ३०० कंपन्यांवर नोटिसा बजावण्यात आल्या, काही कंपन्यांच्या उत्पादनांची विक्री थांबविण्याचा आदेश देण्यात आला तर काही कंपन्यांचे परवानेही रद्द करण्यात आले. आता बनावट, भेसळयुक्त किंवा हलक्या दर्जाच्या औषधांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांना चाप लावण्याकरिता संबंधित कायद्यात दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत, असे संसदेत सरकारतर्फे सांगण्यात आले.

दिलासा देणारे काही आश्वासक असे घडत असल्याच्या जाणिवा जाग्या होत असतानाच, आपल्या महाराष्ट्रातच बनावट औषधांच्या धंद्याची पाळेमुळे रुजल्याचे काही धागेदोरे समोर येऊ लागले आहेत. बनावट औषधांच्या खरेदी-विक्री धंद्यात एक मोठे रॅकेट महाराष्ट्रात सक्रिय असून तेलंगणा आणि गुजरातमध्ये त्याची पाळेमुळे रुजल्याचा जुलैच्या पहिल्या आठवड्यात महाराष्ट्राच्या विधान परिषदेत राज्य सरकारकडून कबूल करण्यात आला आहे. राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने एप्रिल ते ऑक्टोबर २०२३ या जेमतेम सात महिन्यांत राज्यातून सुमारे तीन कोटी रुपयांची बनावट औषधे जप्त केली आहेत. तेलंगणातील एका औषध उत्पादकाच्या या बनावट औषधाचा साठा जप्त करण्यात आला, पण त्याच दरम्यानच्या काही दिवसांतच पुन्हा एकदा बनावट औषधांच्या धंद्याची आणखी एक काळी बाजू महाराष्ट्रातच उघडकीस आली. मुंबईशेजारच्या वसई येथील एका औषध उत्पादक कंपनीवर अन्न-औषध प्रशासनाने घातलेल्या धाडीत १ कोटी ४० लाख रुपयांची बनावट औषधे आणि अन्य मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या कंपनीच्या औषध निर्मिती परवान्याची मुदत संपली असतानादेखील कंपनीची औषध निर्मिती बिनबोभाट सुरूच असल्याचे स्पष्ट झाले होते.

कोविड महामारीच्या जबर फटक्यानंतर देशाच्या आणि राज्याच्या आरोग्य क्षेत्रातील अनेक त्रुटी उघड झाल्या होत्या. आरोग्य सेवांमध्ये प्रचंड प्रमाणात सुधारणा करण्याची गरजही स्पष्ट झाली होती. या महामारीने काढता पाय घेण्यास सुरुवात केली, जगाने सुटकेचा काहीसा निःश्वास सोडला, तेव्हा आरोग्य क्षेत्राला नवा पुनर्जन्म देण्याचे संकल्प जारी होऊ लागले होते. महाराष्ट्रात तेव्हा उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडीचे सरकार होते. २०२१-२२ चा अर्थसंकल्प मांडताना तेव्हाचे अर्थमंत्री असलेले अजित पवार यांनी या संकल्पाचा पुनरुच्चार केला होता. राज्यातील जनतेला उत्तम दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी ७ हजार ५०० कोटींचा एक महाप्रकल्प राज्य सरकारने तयार केला असून पुढील चार वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करून त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात येईल, असे अजित पवार यांनी जाहीर केले होते. नागरी क्षेत्रांतील आरोग्य सेवांच्या पायाभूत सुविधांची श्रेणीवाढ करून दर्जेदार आरोग्य सेवा जनतेला उपलब्ध करून देण्याकरिता ५०० कोटींचा पंचवार्षिक आराखडाही तयार करण्यात आला होता. त्यानुसार पुढील दोन वर्षांत या संकल्पाची आणि आराखड्याची अंमलबजावणी अपेक्षित असताना देशातील बनावट, भेसळयुक्त औषधांच्या धंद्याने राज्यात हातपाय पसरले असतील, तर त्याची पाळेमुळे खणून काढावयास हवीत. अन्यथा, आरोग्य सेवांची श्रेणीवाढ करताना आरोग्य रक्षणासाठी आवश्यक असलेल्या औषधांचाच अडसर उभा राहून प्रयत्नांवर पाणी फेरले जाण्याची शक्यता अधिक आहे. ते टाळायला हवे.

## आंतरराष्ट्रीय

# चार ठार, चार जखमी

**वसंत गणेश काणे**

इतर देशांत हल्ले करून किंवा हल्ले घडवून आपल्याला नको असलेल्या व्यक्तींचा नायनाट करणे, हे कृत्य अमेरिकेसाठी नवीन नाही. त्याच अमेरिकेत माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला आणि जगभर खळबळ उडाली. अधिकृत आकड्यानुसार अमेरिकेची लोकसंख्या ३३ कोटी असून जनतेजवळच्या बंदुकांची संख्या मात्र ४० कोटी आहे. अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी बंदुकांच्या सर्रास वापरावर प्रतिबंध लावण्यासाठी एक कायदा केला होता खरा; पण त्याचा नाममात्र परिणामही दिसून येत नाही. गोळीबाराच्या घटना कमी झालेल्या नाहीत, भविष्यातही कमी होण्याची शक्यता नाही. शाळेसकट सर्व सार्वजनिक ठिकाणी झालेल्या बेछूट गोळीबारात गेल्या ५० वर्षांत काही लाख नागरिक मृत्युमुखी पडले आहेत.

**बंदूक संस्कृतीचे बळी ठरलेले अध्यक्ष** : अध्यक्ष ज्यो बायडेन यांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध केला आणि अमेरिकी लोकशाहीत हिंसाचारास स्थान नाही, असे म्हटले. पण ते वस्तुस्थितीचे निदर्शक नाही. या देशाच्या चार अध्यक्षांचे प्राण हिंसाचारात गेलेले आहेत आणि तेवढेच जखमी झाले आहेत. अमेरिकेचे माजी अध्यक्ष असलेल्या डोनाल्ड ट्रम्प यांच्यावरील हल्ल्याच्या निमित्ताने अमेरिकेत राजकीय नेत्यांच्या हत्या आणि त्यांच्या हत्येचा प्रयत्नांचा आढावा हा असा आहे.

१) अमेरिकच्या डेमोक्रॅट पक्षाच्या जॉन एफ. केनेडी या सर्वात तरुण अध्यक्षावर १९६३ च्या नोव्हेंबरच्या २२ तारखेला हल्ला झाला होता. ते टेक्सास प्रांतातील डल्लास शहरी कारमधून जात असताना त्यांच्यावर गोळीबार झाला आणि ते मृत्युमुखी पडले. २) या अगोदर रिपब्लिकन पक्षाचे विल्यम मॅकिन्ले यांची हत्या ६ सप्टेंबर १९०१ ला न्यूयॉर्कमध्ये झाली. ते उपस्थितांबरोबर हस्तांदोलन करीत असताना हल्लेखोराने त्यांच्यावर दोन गोळ्या झाडल्या होत्या. ३) रिपब्लिकन पक्षाचे जेम्स गारफिल्ड यांच्यावर वॉशिंग्टन येथे २ जुलै १८८१ रोजी हल्लेखोराने गोळीबार केला होता. त्यानंतर काही आठवड्यांनी त्यांचा मृत्यू झाला. ४) रिपब्लिकन पक्षाचे अब्राहम लिंकन हे अमेरिकेच्या इतिहासातले हत्या झालेले पहिले अध्यक्ष होत. त्यांची १४ एप्रिल १८६५ ला वॉशिंग्टनमधील फोर्ड थिएटर येथील एका कार्यक्रमात ते पत्नीसह सहभागी झालेले असताना हल्लेखोराने त्यांच्यावर गोळीबार केला होता. दुसऱ्या दिवशी त्यांचा मृत्यू झाला.

**जखमी झालेले अध्यक्ष** : १) रिपब्लिकन पक्षाचे जॉर्ज बुश यांच्यावर २००५ मध्ये हल्लेखोरांनी हॅण्ड ग्रेनेड फेकले होते. ग्रेनेडचा स्फोट न झाल्याने अध्यक्ष बुश बचावले. २) रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांच्या हत्येचा प्रयत्न मार्च १९८१ मध्ये झाला होता. त्यांच्यावर गोळीबार झाला, पण त्यातून ते बचावले. ३) तत्कालीन रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष गेराल्ड फोर्ड यांची हत्या करण्याचे प्रयत्न १९७५ मध्ये दोन वेळा झाले होते. ४) माजी अध्यक्ष हॅरी दुमन यांच्या हत्येचा प्रयत्न नोव्हेंबर १९५० मध्ये झाला होता.

रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षपदाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळीबार झाल्यानंतर ट्रम्प यांनी विजयाच्या दिशेने मोठीच मजल मारली आहे. गोळी कानाला चाटून गेल्यावर चेहऱ्यावर, कपड्यावर रक्ताचे थेंब असताना ट्रम्प उठून उभे राहिले आणि मूठ आवळून त्यांनी ‘फाईट-फाईट’ असे शब्द उच्चारून त्यांनी आपले लढवय्येपण अमेरिकन जनतेला दाखवून दिले आहे. मतदार वैचारिक आवाहनापेक्षा भावनिक आवाहनाला अधिक दाद देत असतो. तसेही पहिल्या जाहीर डिबेटमध्ये अध्यक्ष बायडेन यांच्यावर ट्रम्प यांनी मात केली होतीच.

१५ जुलैला सुरू झालेल्या रिपब्लिकन पक्षाच्या अधिवेशनप्रसंगी ट्रम्प यांचे एकेकाळचे अतिप्रखर टीकाकार, कट्टर प्रतिस्पर्धी, त्यांना सतत पाण्यात पाहणारे ओहिओ राज्याचे ३९ वर्षीय सिनेटर असलेले जे. डी. व्हॅन्स यांनी यू-टर्न घेत ट्रम्प यांची प्रशंसा केली. त्यांनी पूर्वी ट्रम्प यांना हिटलरची उपमा दिली होती. रात्रीतून हृदयपरिवर्तन झालेल्या व्हॅन्स यांना ट्रम्प यांनीही आपले उपाध्यक्षपदाचे साथीदार उमेदवार म्हणून स्वीकारले आहे. २०२८ च्या निवडणुकीतील अध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. एवढा मान त्यांना रिपब्लिकन पक्षात आहे. येत्या २०२४ च्या निवडणुकीतही पेनसिल्व्हॅनिया, मिशिगन, विस्कॉन्सिन, ओहायो, मिनेसोटा ही राज्ये स्विंग स्टेट्स ठरतील. ही राज्ये निवडणुकीच्या निकालाला कलाटणी देणारी मानली जातात. इतर राज्यांचे कल तसे बरेचसे निश्चित आणि कायम असतात. सिलिकॉन व्हॅलीमध्येही व्हॅन्स यांच्यामुळे ट्रम्प यांना बळ मिळू शकेल. सिलिकॉन व्हॅली हा अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्यातील एक प्रदेश आहे. सान होजे ते सान फ्रान्सिस्को व आसपासच्या भाग सिलिकॉन व्हॅली म्हणून ओळखला जातो. येथे फेसबुक, गुगल, सिस्को, इंटेल आणि इतर अनेक मोठ्या तंत्रज्ञान कंपन्याची आवारे आहेत. व्हॅन्स यांची कायदेतज्ज्ञ तेलगू पत्नी उषा चिलुकुरी ही उद्या ट्रम्प आणि व्हॅन्स ही जोडी जिंकली तर अमेरिकेच्या उपाध्यक्षाची पत्नी या नात्याने सेकंड लेडी ठरेल. तसे खुद्द व्हॅन्स आंध्राचे जावई आहेतच. अनेकदा फासे उलटे पडतात, हे ऐकले होते. पण कधी कधी ते इतके सुलटेही पडतात, तर! व्हॅन्स यांनी परराष्ट्र व्यवहार, मंदी आणि अर्थकारण, रोजगार क्षेत्राच्या समस्या यावर ट्रम्प यांची येती राजवट लक्ष केंद्रित करील, असे घोषित केले आहे.

**निष्फळ झाले बाण** : फौजदारी खटल्यांचा ससेमिरा, संसदेवर हल्ला केल्याचा आरोप, गोपनीय कागदपत्रांची अवैध हाताळणी, जॉर्जियातील निवडणूक प्रक्रियेत ढवळाढवळ, पोर्नस्टारशी संबंध, विधिनिषेधांचा अभाव असलेला, खोटारडा, भामटा, बलात्कारी असे डेमोक्रॅट पक्षाच्या भात्यातील डोनाल्ड ट्रम्पवर सोडलेले बाण आज एकदम असे कसे निष्फळ आणि परिमाणशून्य झाले, ते डेमोक्रॅट पक्षाला कळेनासे झाले आहे. ७८ वर्षीय आणि त्यातही आक्रस्ताळी ट्रम्प यांचा कडवी झुंज देण्यासाठीचा आक्रमक पवित्रा व आत्मविश्वासपूर्ण शैली आणि ८१ वर्षीय बायडेन यांची थकलेली देहबोली, मुखदुर्बळता, विस्मृती, असंबद्ध बडबड व बचावात्मक भूमिका यातील फरक डेमोक्रॅट पक्षीयांना दिवसेंदिवस ठळकपणे जाणवू लागला होता. इतका की, शेवटी विद्यमान अध्यक्ष ज्यो बायडेन यांना निवडणुकीला केवळ साडेतीन महिने उरले असताना नामुष्की पत्करत आपली उमेदवारी स्पर्धेतून परत घ्यावी लागली आणि कमला हॅरिस यांचा पुरस्कार करावा लागला. युक्रेन आणि नाटो सदस्य देश यांच्यावर ट्रम्प यांची खपा मर्जी आहे. तर, पुतिन यांच्याविषयी त्यांना विशेष आपलेपणा आहे. मेक्सिको, आफ्रिका, चीन, कांगो या देशांतून होणारे बेकायदा स्थलांतर आजच्या अमेरिकेपुढच्या अनेक समस्यांचे एक प्रमुख कारण आहे, असे ट्रम्प मानतात. कमला हॅरिस विजयी झाल्या तर गर्भपाताच्या अधिकाराच्या खंद्या पुरस्कर्त्या असलेल्या, कारणे दूर झाल्याशिवाय स्थलांतर थांबणार नाही, अशी ठासून जाणीव करून देणाऱ्या, पुनर्नवीकरणीय (रिन्युएबल) अक्षय ऊर्जास्रोतावर भर देणाऱ्या, स्वतःला लोकशाहीवादी आणि नाहीरे (हॅव नॉट्स) घटकांच्या कैवारी म्हणवणाऱ्या, हमास घातक पण इस्रायलने गाझापट्टीतील कारवाई थांबवावी असा आग्रह धरणाऱ्या, मानवीय चेहऱ्याच्या पोलिस कायद्याची आवश्यकता मानणाऱ्या, भारतीय वंशाच्या पण मुस्लिम आणि पाकिस्तानधार्जिण्या महिला नेत्या अमेरिकेच्या अध्यक्षपदी प्रथमच निवडून येऊ शकतात. हे सर्व बघितले की, नवीन प्रतिस्पर्ध्याला म्हणजे बहुदा कमला हॅरिस यांना ट्रम्प कशी टक्कर देतात ते पाहणे रंजक ठरेल. पण आंतरराष्ट्रीय राजकारणाला कूस बदलायला तर एक आठवडाही लागत नाही. म्हणून ५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत काहीही अंदाज न वर्तवण्यातच शहाणपणा आहे, नाही का?

९४२२८०४४३०

## वेध

**नितीन शिरसाट**

# वृक्ष कटाईने निसर्गाचा असमतोल

‘वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे’ असे आमच्या संतांनी फार पूर्वीपासूनच सांगून ठेवले आहे. आपल्या कृषिप्रधान संस्कृतीत पूर्वजांनी वड, पिंपळ, तुळस, आंबा, लिंब अशा असंख्य झाडांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. या देशी झाडांचे रोपण करून त्यांचे जर का योग्यरीत्या संवर्धन केले तर या झाडांमुळे योग्य प्रमाणात पाऊस पडू शकतो. त्यामुळे मुबलक पाणी मिळते, सावली मिळते, बाष्प टिकून राहते, ऑक्सिजन मिळतो आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे भूजल पातळी वाढते. त्यामुळे आपोआप तापमानात घट होते. लोकसंख्या वाढली की, त्या लोकांच्या हाताला काम देण्यासाठी नवीन निवासी वस्त्या, नवीन कारखानदारी यासाठी अधिक जागेची पूर्तता करण्यासाठी तेथील वनसंपदा माणूस नष्ट करत आहे. आधुनिक युगातला माणूस सध्या फक्त आपले सुख, संपदा आणि स्वार्थ पाहत आहे. आधुनिकीकरणाच्या स्मार्ट सिटीच्या नावाखाली निसर्गातील अनेक नैसर्गिक साधनसंपत्तीवर घाला घालून आपली हौस पूर्ण करतो आहे, पण हे सगळे करताना आपल्यामुळे निसर्गाच्या संतुलित जीवनचक्राचा असमतोल वाढत आहे. वृक्ष लागवडीतून पर्यावरण रक्षण होत असल्याने सजीवांच्या निरोगी आयुष्यासाठी ही बाब महत्त्वाची आहे. वृक्षाच्छादन तसेच रोजगार उत्पन्न वृद्धीही अपेक्षित आहे. याच भावनेतून राज्य सरकारने तीन वर्षांपूर्वी वनेतर क्षेत्रातही वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेतला. जंगलतोड, वन्य अग्निशामक, शेती साफ करणे, पशुधन पाळणे आणि इमारती लाकूड यासाठी याचा बऱ्याच प्रकारात समावेश होतो. पृथ्वीवरील जमिनीच्या क्षेत्राच्या ३१ टक्के क्षेत्रे जंगले व्यापतात आणि दरवर्षी १८.७ दशलक्ष एकर जंगलाचे नुकसान होते. जंगलतोडीसाठी महत्त्वाचा घटक म्हणजे लाकूड उद्योग हा होय. जवळपास ४ दशलक्ष हेक्टर लाकडाची दरवर्षी कटाई केली जाते. चंदन, साग, वनौषधीयुक्त झाडांची मोठ्या प्रमाणात लाकूड तस्कर वृक्षतोड करीत आहेत. विकास कामांसाठी हजारोंच्या संख्येने वृक्ष कटाई झाली आहे. वृक्षाच्छादनाचे ३३ टक्के राष्ट्रीय उद्दिष्ट गाठण्यासाठी राज्यात ४०० कोटी झाडांची गरज आहे. सध्या राज्यात फक्त १६ टक्के वनराई आहे. या पृष्ठभूमीवर लक्ष्य गाठण्यासाठी मागील वर्षी २.८३ कोटी वृक्षांची लागवड करण्यात आली. त्यानंतर आता या पावसाळ्यात ४ कोटी वृक्ष लागवड केली जाणार आहे. येत्या तीन वर्षांत वन तसेच अन्य विभाग मिळून ३८ कोटी तसेच ग्राम पंचायतींच्या साहाय्याने ५० कोटी वृक्ष लागवडीचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. राज्यात वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ३३ कोटी वृक्ष लागवडीची महत्त्वाकांक्षी मोहीम घोषित केली होती. कालांतराने यामध्ये मोठा घोटाळा झाल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सुधीर मुनगंटीवारांवर केला होता. परिणामी या प्रकरणाची गंभीर दखल घेत या वृक्ष लागवडीच्या चौकशीसाठी समितीची घोषणा विधानसभेत केली होती. या समितीने केलेल्या सखोल चौकशीअंती सादर केलेल्या अहवालात कोणतीही अनियमितता किंवा गैरव्यवहार झाला नसल्याचा निष्कर्ष मांडण्यात आला आहे. ३३ कोटी वृक्ष लागवड प्रकरणात सुधीर मुनगंटीवार यांना क्लीन चिट देण्यात आली असून त्यांच्यावर करण्यात आलेले सर्व आरोप खोडून काढण्यात आले आहेत. वनसंवर्धनाच्या चांगल्या कामात पुढाकार घेऊन काम करणाऱ्या लोकप्रतिनिधी, निसर्ग मित्र, पर्यावरण मित्र यासारख्या अनेकांनी आपले योगदान दिले आहे. केवळ विरोध करण्यासाठी विरोधकांना एखादे नाममात्र कारण पाहिजे असते, हे यातून सिद्ध झाले आहे. पृथ्वीचे आरोग्य राखण्यामध्ये वने अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत असतात. एक मोठे झाड छोट्या-छोट्या वनस्पती, कीटक, प्राणी-पक्षी यांना आसरा देते. विषारी कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेऊन जागतिक तापमानवाढ कमी करते आणि प्राणवायू असलेल्या ऑक्सिजनचे उत्सर्जन करते. वनांमुळे जमिनीची धूप रोखली जाते. जमिनीत पाणी मुरते व पूर-दुष्काळ यासारख्या आपत्ती रोखण्यास मदत होते. तसेच वनांपासून फळे-फुले, औषधे, मसाले, रंग, जनावरांसाठी चारा, निरनिराळ्या वस्तू बनविण्यासाठी आणि घरबांधणीसाठी लाकूड मिळते. अशा प्रकारची जवळपास ५० हजार कोटी रुपयांची साधनसंपत्ती भारतातील वने दरवर्षी आपल्याला दरवर्षी उपलब्ध करून देतात. गेल्या १० वर्षांत पृथ्वीच्या तापमानात वाढ झाली आहे. आपण ज्या ज्या वेळी वाहनांचा व ऊर्जेचा अतिरेकी वापर करत असतो, त्या त्या वेळी खनिज इंधने जाळून कार्बन डाय ऑक्साईडची निर्मिती करत जागतिक तापमानवाढीला हातभार लावत असतो. त्यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण आणि वनसंवर्धन करणे काळाची गरज झाली आहे.

९८८१७१७८२८

## विशेष

# जीवनरक्षण व्रताचे कटिबद्ध पुरस्कर्ते

**पराग जोशी**

संपूर्ण देशात रस्ते अपघातात लाखो निरपराध मृत्युमुखी पडतात. त्याची कारणे अनेक असली तरी मनुष्यहानी होते व ती थांबविण्यासाठी आजवर सरकारी खाक्याप्रमाणे चर्चा, परिसंवाद, परिषदा, समित्यांची नियुक्ती झाली, त्यांचे अहवाल आले. सरकारने अनेकदा ते नाकारले आणि काही थंडबस्त्यात गेले; पण मूळ समस्येपासून सुटका झाल्याचे ऐकिवात नाही. नेमका हाच धागा पकडून प्रत्येक व्यक्ती हा शिवाचा अंश आहे आणि त्याचे रक्षण होणे आवश्यक आहे, या विचारातून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांच्याकडे असलेल्या रस्ते व महामार्ग विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून अपघातमुक्त रस्ते अभियान प्रारंभ केले. मागील १० ते १५ वर्षांपासून त्यांचा हा उपक्रम सातत्याने सुरू आहे. त्यामुळे ते जीवनरक्षण व्रताचे कट्टर पुरस्कर्ते असल्याचे दिसून येते. देशातील प्रत्येक रस्ता अपघातमुक्त असावा हा त्यांचा कटाक्ष आहे. त्यादृष्टीने त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. या प्रयत्नांना यश आले असून, त्याचा हा विचार पटल्याने अनेक जनाक्रोश, आयरास्ते, सेव्ह लाईफ फाऊंडेशन आदी एनजीओ पुढे आल्या आणि त्यांनी स्वत:ला या कामात झोकून दिले आहे. मुळात आजवर रस्ते विकासाचे धोरणच नव्हते. रस्ता हा विकासाचा महामार्ग आहे, ही बाब गडकरींनी या मंत्रालयाचा पदभार स्वीकारल्यानंतर अनुभवास आला. तोपर्यंत महामार्गांची स्थिती कशी होती त्याची कल्पनाच न केलेली बरी. आज गडकरींना रस्ते विकासासाठी ओळखले जाते. मुख्य म्हणजे केवळ रस्ते बांधकाम करून ते मोकळे होत नाहीत, तर या मार्गावर सोयीसुविधा, हॉटेल्स, शौचालये, दवाखाने, रुग्णवाहिका, पोलिस मदत केंद्र, त्यासाठी स्थानिक दवाखान्यांसोबत सहकार्य करार, वाहन दुरुस्ती केंद्र, अपघात झाल्यास प्रथमोपचार केंद्र, निवारा केंद्र, अत्याधुनिक उपकरणे असलेल्या रुग्णवाहिका, अपघातात वाहन क्षतिग्रस्त झाल्यास त्यातून प्रवाशांचा बचाव करण्यासाठी मदत पथक, पेट्रोल पंप, वाहन दुरुस्तीसाठी मेकॅनिक, आदी निरनिराळ्या पैलूंवर विचार करून त्यांनी रस्त्यांचा विकास करण्याचा चंग बांधला आहे.

रस्ते बांधकाम करतानाच त्यांनी पर्यावरणाचादेखील विचार केला. महामार्गावर फळझाडांची लागवड सुरू करण्याचे अभियान वनविभागाच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे. मुख्य म्हणजे यात स्थानिक नागरिक तसेच शेतकऱ्यांचा सहभाग वाढावा यासाठी या झाडांचे रक्षण आणि त्यापासून मिळणाऱ्या फळांची विक्री करण्याचे अधिकार स्थानिक गरजूंना बहाल केले आहेत. नागपुरात तर त्यांनी आगामी ५० वर्षांत रस्ता बांधण्याची गरज भासू नये यासाठी सिमेंट रस्ते बांधकामाचा निर्धार केला आहे.



आज नागपूरच्या गल्ली-बोळा सिमेंटच्या झाल्या आहेत. शहरातील मोठे रस्ते त्याठिकाणी दुभाजकांवर फुलझाडे, फुटपाथ नंतर हिरवळ, निवांत बसण्याची व्यवस्था आदी विकास कामे सुरू आहेत. काही कामे पूर्णत्वास गेली आहेत. ही सर्व कामे करण्याचा उद्देश म्हणजे रस्त्यावर चालणे, नियम पाळणे, वाहनचालकाने स्वत:सोबत इतर प्रवाशांचा विचार करावा व त्यातून सामंजस्यातून रस्त्यावरील अंतर कापणे कंटाळवाणे न होता ते सुसह्य व्हावे हा यामागील हेतू आहे. रस्ते उत्तम झाल्यानंतर वाहनांची गती वाढणे स्वाभाविक आहे. त्यातून अपघात होण्याचा संभव आहे आणि अनेक ठिकाणी मोठे अपघात झालेदेखील आहेत. त्याची कारणे शोधून त्यात दुरुस्ती करण्यासाठी मंत्रालयातर्फे काम सुरू आहे. देशातील किंवा राज्यातील काही रस्ते आणि पुलांच्या संरचनेत बदल करणे, वारंवार अपघात होणाऱ्या ठिकाणांचा शोध घेणे, अपघाताची कारणमीमांसा जाणून घेणे, त्यावर तांत्रिक व संरचनात्मक बदल करून त्यातून दिलासा देण्याचे काम अनेक ठिकाणी करण्यात आले. अशी कामे शास्त्रीय पद्धतीने करणे, त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे काम नितीन गडकरी कटिबद्धतेने करीत आहेत. रस्ते अपघातमुक्त व्हावे यासाठी गडकरींनी केंद्र स्तरावर आणि जिल्हा स्तरावर रस्ता सुरक्षा समित्या स्थापन केल्या असून, त्यात स्थानिक स्वराज्य संस्था, पोलिसांचा वाहतूक विभाग, एनजीओ यांचा समावेश आहे. या समित्या स्थापन करून गडकरी थांबले नाहीत, तर त्यांची नियमित आढावा बैठक घेऊन विविध सरकारी विभागांनी समन्वयातून रस्ते विकासाची कामे करावी, असे निर्देश देत असतात. मुख्य म्हणजे केवळ निर्देश न देता स्वत: अनेक उपाययोजना सुचवितात आणि पाठपुरावा करून अधिकाऱ्यांकडून ही कामे करवून घेतात. मुख्य म्हणजे अपघातमुक्त रस्ते हा त्यांच्या जिव्हाळ्याचा आणि आत्मीयतेचा विषय असल्याने तज्ज्ञांची मदत घेत तसेच स्वयंप्रेरणेने अनेक सूचना करून अनुभवाच्या आधारे रस्त्यांच्या जडणघडणीत तांत्रिक बदल सांगतात. त्यांच्या कल्पनांचा विचार केल्यास एखाद्या अभियंत्यालादेखील सुचणार नाहीत, असे बदल त्यांनी रस्त्यांच्या संरचनेत केले आहेत. मुख्य म्हणजे यातून अनेकांना दिलासा मिळाला आणि अपघातांची समस्या कमी किंवा अनेक ठिकाणी ती शून्यावर आली आहे.

यासंदर्भात नुकतीच रविभवन सभागृहात झीरो फॅटलिटी डिस्ट्रिक्ट रिव्ह्यू आणि जिल्हा रस्ते सुरक्षा समितीची बैठक पार पडली. त्यात रस्त्यावर पार्क होणारी वाहने, फुटपाथवरील अतिक्रमणांचा सफाया करून फुटपाथ मोकळे करणे, महामार्गावर दिवसभर उभी राहणारी वाहने, रात्रीच्या वेळेस रस्ते मोकळे असणे, अडचणींच्या अपघातप्रवण स्थळी फूट ओव्हरब्रिज बांधणे, सदोष ट्रॅफिक आयलंड बदलून त्याची नव्याने रचना करणे आदी उपाययोजना गडकरींनी स्वत:च्या अनुभवातून सांगितल्या. पार्किंगच्या नियमांची धास्ती लोकांना वाटावी याकरिता नो-पार्किंग झोनमध्ये लावलेल्या वाहनांवर कारवाई करण्याचा उपाय सांगण्यात आले. मंत्री या नात्याने गडकरी वाहतुकीच्या निरनिराळ्या साधनांद्वारे प्रवास करीत असतात, पण त्यांची शोधक आणि वेधक नजर मात्र सतत नावीन्य आणि दिलासादायक कृतींचा शोध घेत असते. यातूनच त्यांना प्रत्येक क्षेत्रात निरनिराळ्या संकल्पना गवसतात, हे मात्र खरे. निवडणूक प्रचारादरम्यान काही दिवसांपूर्वी ते गुजरातमधील सुरत येथे गेले. त्याठिकाणी रस्ते वाहतुकीचे संचालन व नियंत्रण एनजीओचे सदस्य करीत असल्याचे त्यांना दिसले. आता ही संकल्पना प्रायोगिक तत्त्वावर नागपुरात राबविण्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. मुख्य म्हणजे अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय समिती आता सुरतचा दौरा करणार आहे. या संकल्पनेतून वाहतूक पोलिस विभागावर असलेला ताण कमी करण्याचा त्यांचा हेतू आहे. एकूणच गडकरींचे सर्वसमावेशक रस्ते सुरक्षा अभियान सर्व घटकांसाठी लाभदायी ठरत आहे.

९८८१७१७८०५

### ‘राजा भिकारी, माझी टोपी घेतली’

लहान मुलांना आपण राजा व उंदराची गोष्ट सांगत होतो. उंदराला चिंधी सापडते. तो शिंप्याला धमकी देऊन टोपी शिवून घेतो. त्याला गोंडा लावून घेतो. नंतर राजाकडे जाऊन माझी टोपी तुझ्या टोपीपेक्षा किती छान आहे, अशी फुशारकी मारतो. राजाला राग येतो. तो टोपी हिसकतो. तेव्हा ‘राजा भिकारी, माझी टोपी घेतली.’ राजा रागाने टोपी भिरकावून परत करतो. तेव्हा राजा घाबरला. माझी टोपी परत दिली. अशा पद्धतीने पडलो तरी नाक वर, अशा तऱ्हेने फुशारकी मारणारे उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत डोळ्यासमोर दिसतात. आपल्याला सर्वच विषयांचे सर्व काही कळते, असा त्यांचा तोरा. साधे नगरसेवक म्हणूनदेखील निवडून येण्याची त्यांची क्षमता नाही. परंतु उबाठाच्या चाकरीमुळे राज्यसभेत जाऊन बसले. आज तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पावसाळ्यात उगवणारी छत्री अशी उपमा दिली त्यांनी, याला काय म्हणावे? लोकसभा निवडणुकीत संविधान धोक्यात आहे, असा खोटा प्रचार करून महाराष्ट्रात मविआला अनपेक्षित जागा मिळाल्या. त्यामुळे यांच्या डोळ्यासमोर पुन्हा एकदा उबाठाला मुख्यमंत्र्यांचे खुर्चीवर बसविण्याचे स्वप्न पडत आहे. त्यासाठी मुस्लिमांचे लांगूनचालन करतात. दुसरीकडे कथित शंकराचार्यांची आपल्या घरी पाद्यपूजा करून त्यांच्या मुख्यमंत्रिपदासाठी आशीर्वाद घेतात; हा दुटप्पीपणा नव्हे तर काय? शिंदे सरकार घटनाबाह्य आहे तर उद्धव ठाकरेंचे मविआचे सरकार काय लोकांनी निवडून दिले होते काय? या सर्व गोष्टींवर विचार करून येत्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदारांनी सुज्ञपणे मतदान करून मविआला त्याची जागा दाखवून देण्याची गरज आहे.

**प्रदीप खर्डेनवीस**/नागपूर

●● ●●

## वाचक पत्रे

### सेवानिवृत्त वेतन आणि उत्पन्न कर

सेवानिवृत्त वेतन म्हणजे पेन्शनवर केंद्र सरकार उत्पन्न कर आकारत असते. परंतु हा कर आकारताना कर देय शक्ती विचारात घेणे गरजेचे असते. वास्तविक पाहता निवृत्त मोबदला (पेन्शन) हा वेतन या श्रेणीत बसत नाही. कामाचा मोबदला म्हणजे वेतन होय. काम करून निश्चित वय झाल्यावर निवृत्त झाल्यावर सरकारतर्फे पेन्शन प्राप्त होते. त्यामुळे हा मोबदला वेतन या श्रेणीत कसा बसू शकेल? त्यामुळे वेतन प्राप्त होणाऱ्या व्यक्तीवर ज्या नियमाने उत्पन्न कर आकारला जातो त्याच नियमाने सेवानिवृत्त व्यक्तीवर उत्पन्न कर आकारणे योग्य कसे ठरेल? कार्य शक्ती असलेल्या व्यक्तीवर आणि वय झाले असलेल्या व्यक्तीवर एकाच मापाने कर कसा आकारता येईल? कारण पेन्शन म्हणजे काम करून निवृत्त झालेल्या लोकांना त्याचे म्हातारपण चांगले जावे यासाठी सरकारने दिलेले अनुदान आहे. त्यामुळे त्यावर असा कर आकारणे योग्य ठरेल का? त्याच्यावर उत्पन्न कर आकारताना त्याच्या मर्यादा निश्चित केल्या पाहिजे. त्याकरिता त्याची उत्पन्न कर देण्याची शक्ती योग्यरीतीने मापली पाहिजे; नाही तर हा कर त्यांच्यासाठी अन्यायपूर्ण ठरू शकतो. कर आकारण्याच्या नवीन पद्धतीप्रमाणे नोकरी करणारा आणि निवृत्तांना तीन लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीवर उत्पन्न कर आकारले जात नाही; परंतु ही मर्यादा सेवानिवृत्त पेन्शनधारकासाठी किमान सहा लाख रुपयांपेक्षा जास्त पाहिजे होती. दोन्ही प्रकारांच्या व्यक्तींना प्रमाणित वजावट ७५ हजार रुपये आहे; ती ज्येष्ठ आणि पेन्शनप्राप्त व्यक्तीसाठी किमान १ लाख रुपये पाहिजे होती. पेन्शनधारकाचे कर माफ उत्पन्नापेक्षा जास्त पेन्शन उत्पन्न असेल त्या वर एकाच किमान दराने कर आकारला पाहिजे. सर्व निवृत्त ज्येष्ठांचे भावी जीवन सुखासमाधानने होईल, असे पेन्शन सरकार प्रदान करू शकत नाही का?

**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

●● ●●

### शहरी विकास शाप की वरदान

शासनाने शहरी विकासाची अनेक कामे हाती घेतली आहेत. नुकत्याच नागपूरला झालेल्या पावसाने विकास कामांची पोल उघडी पडल्यासारखे झाले आहे. ठिकठिकाणी सिमेंट रस्ते बांधण्यात आले असून काही रस्त्यांचे बांधकाम निर्माणाधीन आहेत. सिमेंट रस्ते जरूरीपेक्षा जास्त उंच बांधण्यात आल्यामुळे लोकांच्या वसाहतीमध्ये पावसाचे पाणी शिरले आणि पूरसदृश स्थिती निर्माण झाली. त्यामुळे लोकांचे आणि आजूबाजूला असलेल्या दुकानदारांचे खूप नुकसान झालेले आढळून आले. जुन्या डांबरी रस्त्यांवर दर दोन वर्षांनी तीन इंचाचे लेयर टाकण्यात येत असल्यामुळे जी घरे काही वर्षांपूर्वी उंचावर होती ती तीन फुटांनी खाली गेली आहेत. मुळात जुन्या ड्रेनेज लाईनला इतरांनीही आपल्या ड्रेनेज लाईन जोडल्यामुळे त्या काम करेनासे झाल्या आहेत. रस्त्यांवरील पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी प्रभावी यंत्रणा/व्यवस्था करण्यात आलेली दिसत नाही. त्याचप्रमाणे नद्या-नाल्यांच्या पाणलोट (कॅचमेंट एरिया) क्षेत्रात करण्यात येत असलेल्या अनधिकृत बांधकामांमुळेसुद्धा पूरस्थिती निर्माण होऊ शकते. शासनाने कठोर कारवाई करून निर्बंध घालावयास पाहिजे. त्यात भरीस भर म्हणून नियोजनाच्या अभावी रस्ते दुरुस्तीच्या नावाखाली तोडफोडीचे काम सतत सुरू राहात असल्यामुळे त्यामुळे अपघातांना आमंत्रण दिल्यासारखे होऊन बसले आहे. विकासाच्या कामांचे नियोजन करीत असताना नजिकच्या भविष्यात विकास कामांबरोबर उद्‌भवणाऱ्या त्रासदायक अडचणी यांचा सर्वांगीण विचार होणे अत्यावश्यक आहे. शासनाजवळ तशी यंत्रणा उपलब्ध आहे. परंतु ती सक्षमतेने राबविण्याच्या इच्छाशक्तीचा अभाव आढळून येतो. ती सक्षमतेने अंमलात आणली गेली तर नगर विकासाची कामे समाजाकरिता शाप ठरण्यापेक्षा वरदानच ठरेल.

**शुचिता देशपांडे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



## बाहेती बिहाणी इंग्लिश शाळेच्या स्वराज काकडे यांची राज्यस्तरीय योगासन स्पर्धेसाठी निवड

**सेलू,/प्रतिनिधी:** महाराष्ट्र योगासन स्पोर्ट असोसिएशन संलग्नित योगासन स्पोर्ट्स असोसिएशन परभणी यांच्यावतीने जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा २७ जुलै रोजी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सेलू येथील बाहेती बिहाणी नूतन इंग्लिश स्कूलच्या स्वराज शंभूराजे काकडे या विद्यार्थ्यांने उत्कृष्ट योगासन सादर करीत ज्युनिअर गटात द्वितीय क्रमांक मिळविला. दि १६ ते १८ ऑगस्ट दरम्यान संगमनेर येथे आयोजित राज्यस्तरीय योगासन स्पर्धेसाठी स्वराज याची निवड झाली आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस.एम. लोया, उपाध्यक्ष डी. के. देशपांडे, चिटणीस प्राचार्य डॉ. विनायकराव कोठेकर, सहचिटणीस जयप्रकाश बिहाणी तसेच नंदकिशोर बाहेती, सीताराम मंत्री, मकरंद दिग्रसकर, दत्तराव पावडे, प्राचार्य पाटील, भुजंग देऊळ गावकर आदींनी अभिनंदन केले आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### गव्हाणे यांचा पदाधिकाऱ्यांशी संवाद

**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील हे पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यानिमित्ताने जिल्हाध्यक्ष ॲड.गव्हाणे यांचा जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघात दौरा आयोजित करण्यात आला आहे. बुधवारी त्यांनी पुर्णा, पालम, गंगाखेड, सोनपेठ येथे भेटी दिल्या. तसेच गुरूवारी (दि.२५) मानवत येथे सकाळी ११ वाजता, पाथरी येथे दुपारी १ वाजता, सेलू येथे दुपारी ३ वाजता आणि जिंतूर येथे सायंकाळी ५ वाजता पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भेटी घेवून मार्गदर्शन करणार आहेत. तसेच परभणी विधानसभा ग्रामीण आणि शहरी पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांना दि. २६ जुलै रोजी ॲड.गव्हाणे हे मार्गदर्शन करणार आहेत. या जिल्हा दौऱ्यात आजी, माजी आमदार, तालुकाध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, सर्व सेलचे पदाधिकारी, महिला, युवक आदींनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा सरचिटणीस रमाकांत कुलकर्णी यांनी केले आहे.

### ओबीसी अधिकारी-कर्मचारी संघाचे राज्य अधिवेशन- ११ ऑगस्ट रोजी आयोजन : विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार

**परभणी,/प्रतिनिधी :** मंडल दिवसाचे औचित्या साधुन ११ ऑगस्ट रोजी ओबीसी अधिकारी-कर्मचारी संघाचे राज्य अधिवेशन व एकदिवसीय चिंतन शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

नवी मुंबईतील एमटीडीसी सभागृहात आयोजित केलेल्या या अधिवेशनाचे अध्यक्ष माजी आमदार व मंडल स्तंभाचे निर्माते डॉ. नारायणराव मुंढे, कार्यक्रमाचे उदघाटक व वक्ते म्हणून ओबिसी आंदोलनाचे अभ्यासक, भारतीय राजकीय सिद्धांतकार व लेखक प्रा. डॉ. कांचा इलैया तसेच प्रमुख वक्ते म्हणून संशोधक विद्यार्थी टीस, मुंबईचे यशवंत झगडे हे राहणार आहेत. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून ओबीसी अधिकारी-कर्मचारी संघाचे संस्थापक अध्यक्ष व उपजिल्हाधिकारी सुनिल शेळके हे असणार आहेत.

# भागवत पंथ व धर्माचा उगम भगवान बुध्दाच्या विचारातूनच- पू.भंन्ते डॉ.उपगुप्त महाथेरो

**जिंतूर,/प्रतिनिधी :** आम्रवन देवगाव फाटा येथे दि.२९ जुलै रोजी ठीक ११:३० वा. वर्षावास प्रारंभ तथा आषाढ पौर्णिमेचे औचित्या साधून आम्रवन महाविहार देवगाव (फाटा) येथे तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचे भव्य पायाभरणीचे व धम्म देसना कार्यक्रमाचे थाटात उदघाटन संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जिंतूर- सेलू मतदार संघाच्या आमदार सौ.मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांची उपस्थिती होती. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून भदंत-शरणानंद महाथेरो, डॉ. उपगुप्त महाथेरो,( कार्याध्यक्ष अखिल भारतीय भिकू महासंघ)भदंत पय्यरत थेरो,भदंत मुदीतानंद थेरो,भदंत पय्या बोधी थेरो,भदंत शिलरत थेरो,भदंत शिवली शाक्य पुत्र,भदंत रेवत बोधी,भंते पय्यावंश,भंते संघरत आदींची उपस्थिती होती. या थाटात संपन्न झालेल्या कार्यक्रमाची प्रस्तावना पू.भंते संघरत यांनी केली.आपल्या भाषणात त्यांनी महाआम्रवन येथे आ.मेघना बोर्डीकरांच्या संकल्पनेतून व माजी आ.रामप्रसास बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनात येथे उभारण्यात येत असलेल्या बुद्ध मूर्ती व सर्व परिसराच्या विकासाची सविस्तर माहिती त्यांनी दिली. डॉ.उपगुप्त महाथेरो यांनी तथागत बुद्धीच्या महिमेची व त्यांच्या धम्माची महत्ती त्यांनी विशद करत भागवत धर्म व पंथाची निर्मिती ही बुद्धाच्या विचारधारेतूनच निर्माण झाल्याची माहिती त्यांनी दिली संपूर्ण आशिया खंडात तथागतांच्या विचाराचा पायंडा पडला असून देशाच्या प्रत्योक ठिकाणी भव्य अश्या बुद्धाच्या मुत्यार्ा उभा राहत असल्याचे सांगून जपान मध्ये चारशे फूट उंचीची मूर्ती थाटात उभी असून संपूर्ण जगाला या मुत्यार्ा शांतीचा,करुणेचा अहिंसेचा संदेश देत सबंध मानव जातीच्या कल्याणासाठी प्रेरणाच देत असल्याचे सांगले. कित्योक दिवसा पासून पावसाची रिपरिप सुरू आहे.पण आ.मेघना बोर्डीकरांच्या नावातच मेघ असल्याने कार्यक्रमात मेघ गर्जला पण बरसला नाही.अशी कौतुकाची थाप त्यांनी आ.मेघना बोर्डीकरना दिली.या कामासाठी पू.भंते संघरत यांनी या उभारणीच्या कामासाठी घेतलेल्या पुढाकाराचे त्यांनी कौतुक केले. आ.मेघना बोर्डीकरांनी ही महाविहार आम्रवनाचे हे पवित्र स्थळ भविष्यात सर्वच समाज बांधवासाठी सर्वांना शांतीचा,समृद्धीचा संदेश देणारे केंद्र म्हणून नावारूपास येईल व या पूर्ण जागेच्या विकाससाठी बोर्डीकर परिवार कमी पडणार नाही अशी ग्वाही दिली. साहेबांनी पूर्ण मतदारसंघात गावोगावी डॉ.बाबासाहेबांचे पुतळे उभारण्याचे काम या साठी केले.ल की आपली भावी पिढी त्यांच्या कडे पाहून शिका संघटित व्हा व संघर्ष करा अशी प्रेरणा घेत राहील असे सांगितले. आपली दीदी आपल्या सर्वांगीण विकासासाठी सदैव पाठीशी उभी असून आपणही मला पाठबळ द्यावे असे आव्हान या वेळी केले. या माजी आ.रामप्रसाद बोर्डीकरांनी उपस्थितांना असे सांगितले की लवकरच या बुद्ध मूर्तीचा लोकार्पण सोहळा संपन्न होईल,या पसरीसरा सह जवळच असलेल्या खंडोबा मंदिराच्या परिसराचे सुशोभिकरण करण्यास सुद्धा बोर्डीकर परिवार वचनबद्ध असून सर्वच परिसराचा चौफेर विकास केला जाईल असे सांगले.बोर्डीकराने गेली २५ वर्षे आमदारकी भोगली पण एक खंत सलते ती खंत म्हणजे मंत्री पदाची उपस्थितांनी दिदींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून आगामी निवडणुकीत लेकीला बळ देऊन दीदी मंत्रिमंडळात जावी ही राहिलेली बापाची इच्छा पूर्ण करावी अशी साद घातली.येणाऱ्या विधानसभे दरम्यान तथागताचे आशीर्वाद घेऊनच दीदी आपला विधानसभेचा फॉर्म भरेल असे सांगितले. या कार्यक्रमास उपासक व उपासीकेची मोठ्या प्रमानावर उपस्थिती होती.मंचावरील सर्व पूज्य भंतेचा रामप्रसाद बोर्डीकर व आ.मेघना बोर्डीकरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला अनुसूचित जाती जमाती मोर्चाच्या वतीने रामप्रसाद बोर्डीकरांचा व पंचशील महिला मंडळ व सावित्रीबाई फुले महिला मंडळाच्या वतीने दिदिचाही सत्कार करण्यात आला. डॉ.पंडित दराडे,प्रमोद चव्हाण,गोपाल रोकडे,गोविंद थिटे, विलास भंडारे, यांचाही सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रवीण वाकळे यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी अनु जाती जमाती या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनुसूचित जाती मोर्चा तालुकाध्यक्ष विजयकुमार वाकळे,सुमेध सूर्यवंशी (जिल्हा सरचिटणीस) विकास अण्णा मोरे गुणीरत वाकोडे,युवराज घनसावध,अक्षय सूर्यवंशी,विजय खंदारे,संदेश भालेराव,रविकिरण गजभारे, भगवान साळवे,अरुण गजभारे,बंडू गायकवाड,रोहिदास खंदारे,प्रतीक खिल्लारे,मुकुंद काळे, रमेश चव्हाण,सिद्धार्थ वाकळे,अमोल वाघ,राहुल शिंदे,शिवाजी वाकळे, यासह असंख्य भीमसैनिकानी परिश्रम घेतले.



## शेतकऱ्याच्या माथी खराब सोलार प्लेट

**सेलू,/प्रतिनिधी:-** तालूक्यातील गूगळी धामणगाव येथील शेतक-याच्या शेतात फूटलेले सोलार प्लेट बसवण्याचा प्रताप सोलार कंपनीचा ठेकेदार मनोज शिंदे याने केला असून सदरिल सोलार प्लेट बदलण्यात येणार नसल्याची आरेरावी ठेकेदार शेतक-यावर करत असल्याची तक्रार शेतक-याने महावितरणच्या अधिक्षक अभियंत्याकडे केली आहे.

तालूक्यातीलगूगळीधामणगाव येथील शेतकरी गणेश हरिशचंद्र साडेगावकर यांचे गट क्रमांक १६८ मध्ये शेत असून प्रधानमंत्री कूसूम सोलार योजनेअंतर्गत त्यांनी अर्ज करून ५ एच.पी. च्या सोलार पंपाची मागणी केली. त्यानूसार जि.के. एनर्जी मार्केटेड प्राव्हेट लिमिटेड या कंपनीची निवड करून शासनाच्या निर्देशानूसार दोन टप्प्यामध्ये रकमेचा भरणा केला त्यामध्ये सूरूवातीस १ मार्च २०२४ रोजी ११हजार ६४३ रूपये व दूस-यांदा ८ मार्च रोजी २१ हजार ८६५ रूपये भरणा केला.जि.के.एनर्जी मार्केटेड प्राव्हेट लिमिटेड कंपनी कडून गणेश साडेगावकर यांच्या शेतात सोलार पंप बसविण्यासाठी सेलू तालूक्यासाठी नियूक्त केलेल्या ठेकेदारांने तब्बल दोन महिने त्यांना आज उद्या असे म्हणत ताटगळत ठेवले.शेतकरी गणेश साडेगावकर यांच्या शेतात उशिरा सोलार पंप बसविण्यासाठी ठेकेदाराने शासनाच्या नियमानूसार लागणारे साहित्या देणे अपेक्षीत होते मात्र सदरिल ठेकेदाराने अर्धवट साहित्या आणले व त्यातील सोलार प्लेट फूटलेली असतांना शेतक-याच्या शेतात सोलार पंप बसविला नंतर साहित्या व माझे बिल निघल्यानंतर तूम्हाला नविन सोलार प्लेट बसवून देतो असे म्हणून वेळ मारून नेली व शेतक-यानी विरोध करून सूद्धा सोलार पंप त्यांच्या शेतात बसवला मागील तीन चार महिन्याचा कालावधी उलटून सूद्धा फूटलेली सोलार प्लेट बदलून दिली नाही. उलट महावितरणच्या अधिकायांनी पंचनामा केल्यानंतरच प्लेट बदलून देवू असे आरमूठे धोरण संबधित ठेकेदाराने स्विकारले आहे.दरम्यान शेतकरी गणेश साडेगावकर यांनी त्यांना सांगीतले की,ही तूमची चूक आहे तूम्हीच फूटलेली सोलार प्लेट बसविलेली असून कूठल्याही नैसर्गीक आपत्तीने ती खराब झाली नाही तर महावितरणचे अभियंता कसा पंचनामा करतील? तर ठेकेदाराने पंचनामा केल्या शिवाय तूम्हाला प्लेट मिळणार नाही असा सजग दम दिला असून संबधित ठेकेदार हे नैसर्गिक आपत्तीच्या नावाखाली खोटे बिले काढून शासनाच्या निधीचा अपहार करण्याचा उद्देश आहे असे संबधित शेतक-याचे म्हणणे आहे.



## सोनपेठ तालुक्यातील जवान राष्ट्रपती पदकाने सन्मानीत

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** काश्मीर येथील पुलवामा घाटीत लपून बसलेल्या आतंकवाद्यांना हुसकावून लावण्यासाठी झालेल्या चकमकीत चौघांना कंठस्नान घालण्यात यश मिळवलेल्या सोनपेठ तालुक्यातील लोहिग्राम येथील जवान रमेश साहेबराव राठोड यास दि .२७ जुलै २०२४ रोजी दिल्ली येथील एका कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू पोलीस विरता पदक देऊन सन्मानित करण्यात आले. २९ जानेवारी २०२२ रोजी कश्मिरी घाटी मधील पुलवामा जिल्ह्यातील नैरा गावं येथे चार आतंकवादी लपून बसल्याची माहिती मिळाली. त्यावेळी सोनपेठ तालुक्यातील खरपी तांडा येथील सीआरपीएफ जवान रमेश साहेबराव राठोड व त्यांच्या सहकाऱ्यांनी आतंकवाद्यांसोबत झालेल्या चकमकीत चारही आतंकवाद्यांना ठार केले. त्यांच्या या धाडशी कामगिरी बद्दल त्यांना दिल्ली येथे, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु पोलीस विरता पदक देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या या कामगीरी बद्दल तालुक्यातील त्यांचे वर्गमित्र तानाजी भोळे, ज्ञानेश्वर चव्हाण, विठ्ठल राठोड, भाऊसाहेब भोळे, नवनाथ राठोड,यांनी जवान रमेश साहेबराव राठोड यांचे अभिनंदन केले आहे.



## कोथाळा, कोल्हा, राजुरा रस्ता मंजूरी भाजपमुळेच राष्ट्रीय काँग्रेसचा श्रेय लाटण्याचा केवीलवाणा प्रयत्न- डॉ.देशमुख

**मानवत,/प्रतिनिधी:** तालुक्यातील कोथाळा कोल्हा ते राजुरा या मंजूर सिमेंट रस्ता कामासह अन्य १३ रस्तकामे व पूल बांधण्याची मंजुरी भाजपच्या सततच्या पाठपुराव्याने डिसेंबर २२ मध्येच मिळाली असून काँग्रेस श्रेय लाटायचा प्रयत करीत आहे. काँग्रेस उद्घाटन करीत असलेल्या ५ ऑगस्ट च्या आधीच या रस्ताकामाचे उदघाटन भाजपच्या आमदार मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती सोमवारी ता २९ भाजपचे प्रदेश प्रवक्ते डॉ उमेश देशमुख यांनी पत्राकार परिषदेत दिली.

शहरातील भाजपच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या पत्रकार परिषदेला भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेश चिटणीस अनंत गोलाईत तालूका अध्यक्ष मगर यांच्या सह पदाधिकारी भाजपाच्या पत्राकार परिषदेला उपस्थित होते . मानवत तालूका भारतीय जनता पार्टीच्या कार्यालया मध्ये घेण्यात आलेल्या नामवंत वर्तमानपत्रांच्या पत्राकारांच्या पत्राकार परिषदे मध्ये भाजपाचे प्रदेश प्रवक्ते डॉ. उमेद देशमूख हे बोलत होते. मानवत तालूक्यातील कोल्हा ते राजूरा व कोथळा या रस्त्यांचे उदघाटन करण्याची लगीन घाई कॉंग्रेसने चालविली असून सदरील रस्ता हा भाजपाच्या ओबीसी सेलचे प्राचार्य अनंत गोलाईत यांनी मा. गिरिषजी महाजन साहेबाकडे वेळो वेळी पाठपूरावा करून मंजूर करून घेतला असून जिल्हातील राष्ट्रीय कॉंग्रेसने उदघाटनाची घोषणा करून श्रेय लाटण्याचा केवील वाणा प्रयत चालविला असल्याची खंत यावेळी देशमूख यांनी व्यक्त केली. या वेळी भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश चिटणीस प्राचार्य अनंत गोलाईत, प्राध्यापक शिवराज नाईक, तालूका अध्यक्ष मगर ,यांच्या सह पदाधिकारी उपस्थित होते.



## पाण्यासाठी परभणी, मानवतचे शेतकरी आक्रमक

### जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना निवेदन सादर

**परभणी,/प्रतिनिधी-** पाथरी विधानसभेतील परभणी व मानवत तालुक्यातील ६० गाव हे निम्न दुधना व जायकवाडी प्रकल्पा पासून वंचित आहेत. त्यामुळे या सर्व गावांना पाण्याचे नियोजन कारणच्या मागणीचे निवेदन जिलाधिकारी याच्या मार्फत २४ जुलै रोजी देण्यात आले आहे.

दरम्यान या बबिकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलचा ईशरा शेतकऱ्यांनी दिला आहे.

परभणी शहरातील अशा सर्व गाव गावच्या प्रमुख शेत कऱ्यांची बैठक हॉटेल जैन गार्डन, परभणी येथे पार पडली.

मानवत व परभणी तालुक्यांतील ६० गावाची बहुतांश शेतकरी हे कोरडवाहू शेती करत असल्याने शेतीचे उत्पादन अत्याल्प आहे. या शेकऱ्यांना कुठलाही नाय मिळाला नाही. पाण्या पासून वंचित सर्व गावच्या शेतकर्यांनी बैठकीत निर्णय केला की जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन सरकारने तात्काळ म्हणजे ५ऑगस्ट पर्यंत काय करत आहेत ते कळवावे अन्यथा दिनांक ९ ऑगस्ट क्रांती दिनी शेतकरी आपल्या गुरांसह रस्त्यावर उतरून आंदोलन करत मागणी मार्गी लागेपर्यंत आंदोलन स्थगित करणार नाही असा इशारा शेतकऱ्यानी दिला आहे.



**पाणी मिळत नाही तोपर्यंत आंदोलन - सोळंके**

मानवत व परभणी तालुक्यातील काही गाव जायकवाडी व निम्न दुधना प्रकल्पा पासून वंचित शेतकरी आक्रमक झाला असून जो पर्यंत हक्काच पाणी मिळत नाही तो पर्यंत आंदोलन स्थगित नाहीच असे प्रतिपादन भाजपा किसान युवा मोर्चाचे सरचिटणीस रंगनाथ सोळंके यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

## शेवटपर्यंत जनतेचा सेवक म्हणून काम करणार- आ.डॉ.रत्नाकर गुट्टे

**पूर्णा,/प्रतिनिधी :** राज्यातील महायुतीचे सरकार जनसामान्यांच्या हिताचे निर्णय घेवून पारदर्शक काम करीत आहे. केवळ अर्थसंकल्पात नव्हे तर, मंत्रिमंडळ बैठकीत सुध्दा लोकहिताचे निर्णय घेवून विकासाचा अजेंडा अधिक सक्षम करीत आहे. त्याच सरकारच्या घटक पक्षाचा सदस्य म्हणून मला पर्यायाने आपल्या मतदारसंघाला सातत्याने भरघोस निधी मिळाला आहे. त्यातून अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत व भविष्यात सुध्दा हाच स्ट्राईक रेट सुरू राहील. कारण, विकासासाठी शेवटपर्यंत जनतेचा सेवक म्हणून काम करीत राहणार आहे, अशी ग्वाही गंगाखेड विधानसभेचे आ.डॉ.रताकर गुट्टे यांनी दिली.

शहरातील राजाराम बापू सभागृह येथे ३६२ बांधकाम कामगारांना आ.डॉ. गुट्टे यांच्या हस्ते गृहउपयोगी वस्तु संचाचे वाटप करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार मंडळ आणि आ.डॉ.रताकर गुट्टे संचलित शासकीय योजना मदत केंद्राच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र परिश्रम करणारे कामगार जीव मुठीत घेवून काम करीत असतात. त्यामुळे त्यांना त्यांच्या कौटुंबिक जबाबदाऱ्यात मदत व्हावी, या हेतूने संसारोपयोगी साहित्या देण्याचा निर्णय अतिशय योग्य आहे. त्यामुळे कामगारांना आधार मिळत आहे. त्यांच्या अडीअडचणी समजून घेत शासनाने इतरही योजना आणि निर्णय घेतले आहेत. परिणामी, इमारत व बांधकाम कल्याणकारी मंडळ आधार देणारी संस्था ठरत आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी म्हटले.

बांधकाम कामगारांच्या हितासाठी आयोजित या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिद्धेश्वर फड आणि सूत्रसंचालन रताकर सूर्यवंशी यांनी केले. तर आभार अभिजीत चक्के यांनी मानले. यावेळी मित्रमंडळाचे तालुकाध्यक्ष गणेश कदम, प्रभारी सुभाष देसाई, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गीतराम देसाई, सरपंच उत्तमराव ढोणे, युवक तालुकाध्यक्ष मारोती मोहिते, ऋषीकेश सकनुर, नाना अवरगंड, प्रशांत कापसे, बळीराम कदम, मारोती मोहिते महागावकर, इस्माईल शेख, दत्तराव पौळ, अस्लम पठाण, विश्वनाथ होळकर, बालाजी काळबाडे, रताकर सूर्यवंशी,पत्रकार यांच्यासह शहरातील प्रतिष्ठीत व्यापारी, लाभार्थी, माता भगिनी व कामगार बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### पूर्णा येथे गृहपयोगी वस्तु वाटप : अनेक कामगारांना मिळाला लाभ



# सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी पाच हजार रुपये मिळणार–धनंजय मुंडे

## अर्थसंकल्पातील घोषणेनंतर कृषी विभागाचा शासन आदेश जारी; कापूस व सोयाबीन मिळून सुमारे ४१९४ कोटी ६८ लाख रुपये अनुदान वितरणास मान्यता



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जुलै**

सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसंकल्पात केलेल्या घोषणेप्रमाणे प्रति हेक्टरी ५ हजार रुपये अर्थसहाय्य देण्याचा निर्णय आज कृषी विभागाने घेतला असल्याची माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय कृषी विभागाने निर्गमित केला आहे.

सन २०२३ मध्ये बहुतांश भागात पावसाचे प्रमाण कमी असल्याने त्याचबरोबर कापूस व सोयाबीनचे भाव पडल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले होते. मात्र महायुती सरकारने या शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याची घोषणा लोकसभा निवडणुकीच्या आधीच केली होती. त्याचबरोबर त्याची अधिकृत घोषणा नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पातही करण्यात आली होती. या निर्णयाची कृषी विभागाने कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात तातडीने अंमलबजावणी केली आहे. राज्यातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना किमान १००० रुपये तर २ हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी ५ हजार रुपये या प्रमाणे अर्थसहाय्य देण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली आहे.कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी एकूण १५४८ कोटी ३४ लाख रुपये इतका तर सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी २६४६ कोटी ३४ लाख रुपये असा एकूण ४१९२ कोटी ६८ लाख रुपये इतक्या निधी खर्चास मान्यता देण्यात आली आहे. सदर अनुदानासाठी ई पीक पाहणी पोर्टल द्वारे पिकांची नोंदणी केलेले शेतकरी अनुदानास पात्र ठरणार असून, डीबीटीद्वारे थेट शेतकऱ्यांच्या संलग्न बँक खात्यात ही रक्कम वर्ग केली जाणार आहे. या निर्णयामुळे राज्यात मागील वर्षी आर्थिक नुकसान सहन करावे लागलेल्या लाखो शेतकऱ्यांना लाभ मिळणार असून, महायुती सरकारने आपला शब्द पाळला आहे. या निर्णयासह तातडीने निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

# आरटीई प्रवेश देण्यास शाळांचा नाकार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जुलै**

शासनाने न्यायालयाच्या आदेशा नंतर आरटीई प्रवेश देण्यास सुरुवात केली आहे. जिल्ह्यामध्ये २ हजार २६ विद्यार्थ्यांची निवड आरटीई प्रवेशासाठी झाली असून यात ४७१ प्रवेश निश्चित झाले आहेत. मात्र जिल्ह्यातील काही शाळा प्रवेश देण्यास नकार देत असल्यामुळे आरटीई प्रवेश मिळून देखील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. शाळांना तंबी देत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी शिक्षण विभागाची असताना शिक्षण विभाग बघायची भूमिका घेत असून यामुळे पालक हवालदिल झाला आहे. आज सर्व पालक एकत्र येत जिल्हा परिषद येथे मोठी घोषणाबाजी करत आमच्या मुलांना न्याय द्या, आमच्या मुलांना प्रवेश द्या, या घोषणा देत शिक्षणाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निवेदन सादर केले. यावेळी न्यायालयाच्या आदेशाने आणि कायद्याने शाळा आणि प्रशासनाला आरटीई प्रवेश द्यावेच लागतील, जर का शाळा प्रवेश देणार नसतील तर आरटीई कायद्यानुसार त्या शाळेंवर कारवाई करून त्यांची मान्यता रद्द करण्यात यावी अशी मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत दुर्बल व वंचित घटकातील मुलांसाठी स्वयं अर्थसहाय्य शाळांमध्ये २५ टक्के कोटा हा मोफत प्रवेशासाठी राखीव ठेवण्याची तरतूद आहे. या प्रवेश प्रक्रिये संदर्भात राज्य सरकारने नवीन नियम करत नियमबाह्य अध्यादेश काढला यामुळे ही प्रक्रिया रखडली आणि न्यायप्रविष्ट झाली यात उच्च न्यायालयाने पालकांच्या बाजूने निकाल देत जुन्या पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवत आरटीई प्रवेश देणे सरकार आणि शाळांना अनिवार्य असल्याचे सांगितले त्यानुसार ही प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यात निवड समितीमार्फत विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत मात्र शाळांनी प्रवेश न देण्याची मनमानी भूमिका घेतल्यामुळे आधीच उशिरा प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येत आहे शाळा सुरू होऊन महिना लोटला तरी या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळणे दुरापास्त झाले आहे. यामुळे संतृप्त पालकांनी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन देत आमच्या मुलांना प्रवेश न देणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करा आणि आम्हाला तात्काळ प्रवेश मिळवून द्या अशी मागणी यावेळी केली.

# निराधारांना तात्काळ अनुदान सुरु करा

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३० जुलै**

संजय गांधी निराधार अनुदान योजना यासह विविध निराधार योजनेत हजारो प्रस्ताव गेवराई तहसिल कार्यालयात मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे पात्र निराधारांवर उपासमारीची वेळ येत आहे. त्यामुळे तात्काळ पात्र निराधारांना नियमित अनुदान सुरु करण्याची कार्यवाही करावी अशी मागणी बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी केली आहे. निष्क्रीय विरोधकांकडून निराधारांच्या प्रश्नांबाबत होत असलेली दिशाभूल आणि अपप्रचार थांबविण्याचे आवाहन सुध्दा त्यांनी केले आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी हजारो पात्र लाभार्थ्यांनी गेवराई तहसिल कार्यालयात परिपूर्ण प्रस्ताव दाखल केलेले आहेत. निराधारांच्या प्रस्तावाबाबत प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर दिरंगाई होत आहे. हजारो पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव केवळ प्रशासनाने वेळेवर कार्यवाही न केल्यामुळे अनुदानापासून वंचित आहेत. पात्र लाभार्थ्यांना तात्काळ अनुदान मंजुर करावे अशी मागणी बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांनी केली आहे. गेवराई तालुक्यात मोठ्या प्रमाणावर निराधारांकडून अनुदान मंजुरीसाठी पैसे घेण्याचे काम काही दलालींनी केले आहे. हेच दलाल राजकीय स्वार्थासाठी माझ्या नावाचा गैरवापर करत असल्याचा आरोप विजयसिंह पंडित यांनी केला आहे. निराधारांच्या प्रश्नासाठी आपण सदैव तत्पर असून पात्र लाभार्थ्यांना शासन अनुदानाची रक्कम मिळाली पाहिजे यासाठी वेळोवेळी संघर्षाची भुमिका आपण घेतली असल्याचे विजयसिंह पंडित यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे सांगितले आहे.पुढे बोलताना विजयसिंह पंडित म्हणाले की, तहसिल कार्यालयाकडे प्राप्त प्रस्तावावर विहित मुदतीत निर्णय घेवून पात्र लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्याची जबाबदारी समितीची होती, मात्र समितीने कर्तव्यात कसुर केल्यामुळे हजारो लाभार्थी रास्त अनुदानापासून वंचित आहेत. नाकर्ते लोक आता माझ्या नावाचा गैरवापर करून निराधारांमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे पात्र लाभार्थ्यांना तात्काळ शासन अनुदानाची रक्कम वितरीत करण्याची मागणी तहसिलदारांकडे केली असल्याचे शेवटी त्यांनी सांगितले.

# सिने अभिनेते सयाजी शिंदे व सुप्रसिद्ध सिनेलेखक अरविंद जगताप यांच्या उपस्थितीत प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने दि ५ ऑगस्ट रोजी वृक्षारोपण व भव्य वृक्षदिंडीचे आयोजन

## सयाजी शिंदे करणार विद्यार्थ्यांसोबत वृक्षसंवाद व बीजसंस्कार

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३० जुलै**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळ व सह्याद्री देवराई यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सुप्रसिद्ध सिनेअभिनेते तथा वृक्षमित्र सयाजी शिंदे त्याचबरोबर सुप्रसिद्ध सिने लेखक अरविंद जगताप यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये जागतिक पर्यावरण दिनी म्हणजेच दि ५ ऑगस्ट रोजी अंबाजोगाई शहरात भव्य अशा वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.पर्यावरण दिनानिमित्त सिनेअभिनेते सयाजी शिंदे हे शहरातील विद्यार्थ्यांसोबत वृक्षसंवाद साधत विद्यार्थ्यांवर बीजसंस्कार करत विविध वृक्षांची ओळख त्यांना करुन देणार आहेत.आज देशात ३३% जंगलाची आवश्यकता असतांना केवळ ३%जंगल किंवा वृक्ष आहेत त्यामुळेच निसर्गात ग्लोबल वॉर्मिंग होऊन पर्जन्यमान मोठया प्रमाणावर घटले असल्याचे प्रसिद्धी




पत्रकात राजकिशोर मोदी यांनी सांगितले. वृक्ष वाढले तरच निसर्गाचा समतोल राखला जाईल. जल ही जीवन हें यामुळे सर्वांनी वृक्षारोपण करावे तसेच अंबाजोगाई शहरातील सर्व शाळा,महाविद्यालये,स्वयंसेवी संस्था यांनी सहभागी व्हावे असे अवाहन देखील राजकिशोर मोदी यांनी केले.

भारत देश हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जात असला तरी सर्वात कमी वृक्षांचा देश म्हणून देखील भारत देशाची ओळख निर्माण होऊ लागली आहे. ही ओळख पुसून टाकण्यासाठी आज देशात अनेक जण पुढाकार घेताना दिसतात. याच वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कार्यक्रमात राज्यात सिने अभिनेते सयाजी शिंदे यांचे नाव अग्रस्थानी घेतले जाते. त्यांनी राज्यात विविध ठिकाणी हजारो वृक्षांची लागवड करत त्यांचे संवर्धन देखील केले आहे. सयाजी शिंदे यांच्या सह्याद्री देवराई अंतर्गत व प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने भव्य वृक्ष दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे.

या वृक्षदिंडीमध्ये अंबाजोगाई शहरातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांना घेऊन वृक्षदिंडी निघणार आहे. या वृक्षदिंडीमध्ये सुमारे ४० हजार वृक्ष तथा वृक्षांच्या बिया देण्यात येणार आहेत. या बीजांचे बीजारोपण विद्यार्थ्यांसह प्रत्येकांनी आपापल्या घरी करावयाचे आहे. या बिजातून उगवलेल्या झाडाचे संवर्धन व संगोपन करण्यासाठी त्यांना जागरुक करण्यात येणार आहे. देशतील तसेच राज्यातील कमी वृक्षांचे परिणाम आपण सर्वजण भोगत असल्याचे सयाजी शिंदे हे आपल्या वृक्षारोपण कार्यक्रमात वेळोवेळी पटवून देत आहेत. अंबाजोगाई शहर हे प्राचीन संस्कृतीचे शहर, शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. यामुळेच सयाजी शिंदे यांनी राजकिशोर मोदी यांच्या सहकार्याने अंबाजोगाई शहरात भव्य अशा वृक्षदिंडीचे आयोजन केले आहे.जागतिक पर्यावरण दिनी दि ५ ऑगस्ट रोजी सकाळी ९:३० ते दुपारी २ वाजेपर्यंत या वृक्षदिंडीचे आयोजन केले जाणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर सामावून घेऊन त्यांच्याशी वृक्षसंवाद साधून त्यांच्यासोबत बीजसंस्कार केले जाणार आहेत. या कार्यक्रमासाठी वृक्षमित्र तथा सिनेअभिनेते सयाजी शिंदे , सिने लेखक तथा चला हवा येऊ द्या फेम अरविंद जगताप , राजकिशोर मोदी, सह्याद्री देवराईचे जिल्हा समन्वयक कृषिभूषण शिवराम घोडके यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याचे राजकिशोर मोदी, दिनकर जोशी, संकेत मोदी, प्रा चंद्रकांत गायकवाड, विशाल जगताप, सचिन जाधव यांच्या वतीने जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी उमेदवारांना सहा महिन्याचा वाढीव कालावधी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जुलै**

राज्यात सध्या सुरु असलेल्या सन २०२४-२५ मधील विविध शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी ( अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन सदर शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायीक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासुन सहा महिन्यांचा कालावधी देण्यात येत आहे. सदर सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये संबंधित उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. अन्यथा अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द होतील व त्याबाबत संबंधित उमेदवार जबाबदार राहतील. याची खबरदारी घ्यावी त्याप्रमाणे लवकरात लवकर जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन उपायुक्त तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सदस्य एस आर मकरंद यांनी केले आहे

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाने दिनांक २० फेब्रुवारी, २०२४ रोजी विशेष अधिवेशन घेऊन महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ (एसईबीसी आरक्षण अधिनियम २०२४) एकमताने संमत केला आहे. दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ पासून सदर अधिनियम अंमलात आला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ५ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्या मागासवर्गासाठी राज्यातील शैक्षणिक संस्थामधील प्रवेशामध्ये तसेच राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय व निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १० % टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

राज्यात सध्या विविध महाविद्यालयांत सुरु असलेल्या शैक्षणिक संस्थामधील प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्यास उमेदवारांना अडचणी येत असल्याबाबत काही लोकप्रतिनिधी तसेच उमेदवारांकडून निवेदने प्राप्त झालेली आहेत. त्यानुसार शासनाने ही बाब लक्षात घेऊन सहा महिन्याचा कालावधी वाढविला आहे.

# आदित्य अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्याची SBI बँकेमध्ये स्केल १ अधिकारी म्हणून निवड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जुलै**

शहरातील नामवंत आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचा विद्यार्थी अनिकेत बाभुळकर याची SBI बँकेच्या उच्चपदी (Scale 1 Officer) म्हणून निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्था ही विद्यार्थ्यांना घडवणारी संस्था म्हणून नावारुपाला आलेली आहे. येथील विद्यार्थी भारतासह परदेशात मोठ-मोठ्या पदावर कार्यरत आहेत. आदित्य अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या एका विद्यार्थ्याने पुन्हा यशाची पताका फडकवली आहे. SBI या नामांकित बँकेच्या उच्चपदी (Scale 1 Officer) पदी निवड झाली आहे. या निवडीबद्दल अनिकेत बाभुळकर याचे आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्यासह वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्य तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी अभिनंदन करत पुढील वाटचाली शुभेच्छा दिल्या.बीडच्या आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळत असल्यामुळे तेथील विद्यार्थी पुढे जावून चांगल्या पदावर दिसतात. अनिकेत बाभुळकर यांची SBI बँकेच्या उच्चपदी (Scale 1 Officer) म्हणून निवड झाली. या यशाबद्दल आदित्य अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, उपप्राचार्य ए.यु. सोळंके, प्रा.जी.एम. गुजर, प्रा. पी.एस. राठोड, प्रा. एम.ए. पुंडे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

आदित्य शिक्षण संस्थेत मिळालेल्या मार्गदर्शनामुळे इथपर्यंत आलो. मी आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयात सन २०१९ मध्ये पदवी पूर्ण केली. येथे पदवीचे शिक्षण घेत असताना आदित्य शिक्षण संस्थेत सर्व गुरुजणांकडून ज्ञानार्जनाबरोबर सामाजीक जिवन जगण्याची मिळालेली शिदोरी मला इथपर्यंत घेवून आली. आदित्य शिक्षण संस्थेत मिळालेल्या मार्गदर्शनामुळेच आज मी डइख बँकेमध्ये स्केल १ अधिकारी झालो आहे.

–अनिकेत बाभुळकर



पुर्णावादी बँकेच्या अध्यक्षपदी डॉ.सुभाष जोशी यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करतांना महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे शिक्षक नेते नंदकुमार झरीकर, मराठवाडा विभाग अध्यक्ष बाळासाहेब साळवे, मराठवाडा विभाग महिला आघाडी प्रमुख ज्योतीताई महाजन, बीड जिल्हा अध्यक्ष भगवान चाटे, बीड जिल्हा सहकार्यवाह दिनेश घोळवे, राजेंद्र खेडकर, रविंद्र वांगीकर

# राष्ट्रसंत भगवानबाबांनी अनिष्ट रूढी प्रथांचे निर्मूलन केले–पो.नि.संजय लोहकरे

## संतांनी समाजात मानवता रुजवली – ए. तु कराड

## राष्ट्रसंत भगवानबाबांची जयंती पत्रकार भवनात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३० जुलै**

राष्ट्रसंत भगवानबाबांनी अनिष्ट रूढी प्रथांचे निर्मूलन केले असे प्रतिपादन परळी शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय लोहकरे यांनी

राष्ट्रसंत भगवानबाबा महाराज यांची १२८ वी जयंती निमित्ताने लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे केले.परळी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित चर्चासत्राचे उद्घाटकीय भाषणात ते बोलत होते .

या वेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून लेखक ए. तू. कराड, पत्रकार धनंजय अरबुने, संपादक राजेश साबणे, संपादन आत्मलिंग शेटे, संपादक महादेव गित्ते उपस्थित होते.पुढे बोलताना संजय लोहकरे म्हणाले कि, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. यात संत नामदेव,

संत नरहरी महाराज, संत तुकाराम महाराज ,संत सावतामाळी, संत चोखामेळा, संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज, अशाच संतांच्या शृंखलेत बीड जिल्ह्यातील राष्ट्रसंत भगवानबाबा महाराज यांचेही सामाजिक शैक्षणिक कार्य महत्वाची भूमिका बजावली.



राष्ट्रसंत भगवान बाबांनी पशुहत्या, अनिष्ट रूढी प्रथांना आळा घातला. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते लेखक ए. तु कराड यांनी राष्ट्रसंत भगवानबाबा महाराज यांचे सामाजिक-शैक्षणिक विचार आणि आजचे वास्तव्य या विषयवार सखोल मार्गदर्शन केले. या परिसरात मोठ्या प्रमाणात अज्ञान, अंधश्रद्धा, सामाजिक द्वेष, विषमता व गुलामीत राहणाऱ्या लोकांना समता, स्वातंत्र्य आणि बंधुभावाने राहण्याची शिकवण कीर्तनातून दिली. समाजात मानवतावाद रुजवला. देशात महात्मा बसवेश्वर, छ. शिवाजी महाराज आणि राष्ट्रसंत भगवानबाबा महाराज यांची जयंती/ जन्मोत्सव दोन वेळेस होत असल्याचीही त्यांनी माहिती दिली. आज राष्ट्रसंत भगवानबाबांची जयंती आपण तारखे प्रमाणे साजरी करत असल्याचे ते म्हणाले. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात दै. अतुल्य महाराष्ट्राचे संपादक नितीन ढाकणे म्हणाले कि,राष्ट्रसंत भगवान बाबांनी दऱ्या डोंगरात राहणाऱ्या समाजाला कीर्तनातून प्रबोधन केले. भगवानगडावर बहुजनांचे प्रेरणास्रोत विठ्ठल-रुकमाईच्या मूर्तीची स्थापना भगवानबाबांनी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन भगवान साकसमुद्रे यांनी केले. सम्राट गित्ते यांनी उपस्थितांचे आभार मानले.या कार्यक्रमास जेष्ठ पत्रकार रानबा गायकवाड, संपादक बाळासाहेब फड, पोलीस विष्णू फड ,विकास वाघमारे, बाबा शेख, श्रीमंत खांडेकर, परमेश्वर मुंडे, अजय फड, हरिभाऊ आगलावे आदींची उपस्थिती होती.

# संत भगवानबाबा जयंती निमित्त संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय बागपिंपळगाव शाळेत विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व दप्तर वाटप

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३० जुलै**

श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालय जायकवाडी वसाहत बागपिंपळगाव शाळेत ऐश्वर्यसंपन्न राष्ट्रसंत संत भगवानबाबा यांच्या जयंतीचे औचित्य साधून शाळेतील पाचवी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सोमवार (दि.२९) रोजी मोफत शालेय गणवेश व दप्तर वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी व विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी पाचवी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दर वर्षी शाळेतुन विद्यार्थ्यांना दप्तर व शालेय गणवेश वाटप करण्यात येते. या ही वर्षी शाळेतील पाचवी वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ऐश्वर्यसंपन्न राष्ट्रसंत संत भगवानबाबा यांच्या जयंतीचे औचित्य साधून सोमवार दि.२९ रोजी शालेय गणवेश व दप्तर वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सहशिक्षक भागवत सोळुंके, अंजली माने, मुक्ताबाई मोटे आदींची उपस्थिती होती. यावेळी या सर्व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पाचवी वर्गातील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व दप्तर वाटप करण्यात आले. यावेळी हरीभाऊ आघाव, नवनाथ घुगे आदींनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष समोर करताना शाळेचे मुख्याध्यापक बापुराव घुले म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत असताना शाळेतील शिक्षकांकडून मिळणारे न्याय आत्मसात करावे. शाळेतील ज्ञान हे भविष्य येणाऱ्या कार्यास कामाला येते. विद्यार्थीच्या अंगी नेहमी नम्रता व सुजन शिलता असावे असे त्यांनी सांगून. राष्ट्रसंत संत भगवानबाबा यांच्या जीवन चरित्राला उजाळा देत त्यांनी सांगितले की, राष्ट्रसंत भगवानबाबांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कीर्तनाच्या माध्यमातून शैक्षणिक, सामाजिक, नैतिक व सांस्कृतिक प्रबोधन केले. आपल्या कीर्तनांतून ते जातिभेद, धर्मभेद, अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी-परंपरा यांच्यावर प्रहार करीत. प्रबोधनकार्यासाठी त्यांनी मराठवाडा, विदर्भ , तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटकातील काही भाग व पश्चिम महाराष्ट्रासह उभा महाराष्ट्र पिंजून काढला. विठूनामाचा प्रचार करतानाच त्यांनी समता, बंधुता, एकता, मानवता यांसारख्या आधुनिक विचारांचा आयुष्यभर प्रचार केला. त्यामुळेच वारकरी धर्माला आधुनिक रूप देणारे संत म्हणून त्यांना ओळखले जाते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन मयुर येवलेकर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती वर्षा कांडेकर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भागवत सोळुंके, अंजली माने, मुक्ताबाई मोटे, हरिभाऊ आघाव, नवनाथ घुगे, योगेश म्हैसनवाड, वर्षा कांडेकर, प्रसाद कुलकर्णी, शिवाजी पवार, गोरख साकळे, बाबासाहेब कांबळे, ज्ञानेश्वर बास्टे आदी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

CHANGE OF NAME

I have change my name from INAMDAR ZAKIUDDIN NASIRUDDIN to INAMDAR JAKIYODDIN NASIRODDIN Hence for this declaration in future I will use this name INAMDAR JAKIYODDIN NASIRODDIN This name will be used by my Husband/wife and Children.

OLD NAME : INAMDAR ZAKIUDDIN NASIRUDDIN

NEW NAME : INAMDAR JAKIYODDIN NASIRODDIN

Address : C/O Inamdar Nasiroddin, Roza Mohalla Kaij, Post Kaij Taluka Kaij, Kaij PO Kaij Dist Beed Maharashtra - 431123

# कळमनुरी तालुक्यातील सुकळी वळण येथील तरूण शेतकऱ्याची आत्महत्या

## सेवानिवृत्त मंडळ अधिकाऱ्यासह तिघांवर गुन्हा दाखल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जुलै**

कळमनुरी तालुक्यातील सुकळी वळण येथील एका २८ वर्षीय तरूण शेतकऱ्याच्या आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी शेतकऱ्याने तहसीलमधल्या वरिष्ठ अधिकारी तसेच सेवानिवृत्त मंडळ अधिकारी यांच्यासह इतर आत्महत्येस जबाबदार असल्याचा व्हीडीओ बनवला होता. या प्रकरणाची प्रशासनाने गंभीर दखल घेत आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून सेवानिवृत्त तलाठ्यासह तिघांवर कळमनुरी पोलिस ठाण्यात दि २९ जुलै रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर गावकऱ्यांनी पोलिस ठाण्यातून काढता पाय घेतला.

कळमनुरी तालुक्यातील सुकळी वळण येथील चंद्रवंशी कुटुंबाची जमीन इसापूर धरणासाठी संपादीत करण्यात आली होती. सदर जमीन गाळपेऱ्यासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी चंद्रवंशी कुटुंबियांनी केली होती. सन २००९ पासून चंद्रवंशी कुटुंबियांनी प्रशासनाचे उंबरठे झिजवले मात्र त्यांच्या अर्जाकडे कोणीही लक्ष दिले नाही. त्यानंतर सेवानिवृत्त मंडळ अधिकाऱ्याने जमीन त्यांच्या नावावर करून घेतल्याचा आरोप कृष्णा अंबादास चंद्रवंशी वय २८ यांनी केला. या प्रकरणात महसुलचे वरिष्ठ अधिकारी तसेच सेवानिवत्त मंडळ अधिकारी आणि अन्य काहीजण जबाबदार असल्याचा आरोप करणारा व्हीडीओ कृष्णा यांनी स्वत: च्या शेतात जाऊन तयार केला. कृष्णा चंद्रवंशी यांच्या वडिलांची चार एकर शेती इसापूर धरणामध्ये सरकारने अधिग्रहीत केली. ती शेती धरणातील पाणी ओसरल्यानंतर गाळपेरा करण्यासाठी मुळ मालक असलेल्या चंद्रवंशी यांना किंवा त्यांच्या वारसदारांना द्यावी अशी मागणी कृष्णा चंद्रवंशी यांनी केली होती. परंतु तहसीलदार यांनी गाळपेऱ्यासाठी जमीन मागण्याच्या कारणावरून वारंवार खोटे गुन्हे दाखल केले. सोबतच तहसीलमध्ये बोलावून आर्थिक व मानसिक त्रास दिला, असा आरोपी व्हीडीओमध्ये करण्यात आला आहे.



कृष्णाने आत्महत्या केल्यानंतर त्यांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या तहसीलदार आणि निवृत्त तलाठी यांची पत्नीसह आणि मुलगा यांच्यावर गुन्हा दाखल करा जोपर्यंत गुन्हा दाखल होणार नाही, तोपर्यंत आम्ही मृतदेह ताब्यात घेणार नाही, असा पवित्रा कृष्णाच्या नातेवाईकांनी घेतला. यावेळी ठिय्या आंदोलन केले.

दरम्यान, दुपारी तीन वाजल्यापासून पोलिस निरीक्षक मोहन भोसले, उपनिरीक्षक सतीश ठेंगे यांनी गावकऱ्यांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला. तर उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांनीही पोलिस ठाण्यात येऊन गावकऱ्यांशी संवाद साधला. त्यानंतर रात्री दहा वाजता तोडगा निघाला.

याप्रकरणी देवानंद चंद्रवंशी यांच्या तक्रारीवरून कळमनुरी पोलिसांनी सेवानिवृत्त मंडळ अधिकारी शेषराव पवार, महेश शेषराव पवार व अन्य एकाने गाळपेऱ्याची जमीन मिळू दिली नाही तसेच ते कृष्णा यांना मानसिक त्रास देत होते. त्यांच्या त्रासाला कंटाळून कृष्णा यांनी आत्महत्या केल्याचे तक्रारीत नमुद केले आहे. यावरून पोलिसांनी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. उपनिरीक्षक एस पी इंगळे पुढील तपास करीत आहेत.

# शहरातील वीज पुरवठा सुरळीत करण्याची भाजपची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जुलै**

मागील काही दिवसांपासून शहरातील अनेक भागातील वीज पुरवठा वारंवार खंडीत होत आहे. त्यामुळे नागरिकांसह व्यापाऱ्यांना याचा मोठा फटका बसत आहे. यासंदर्भात भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना भेट देऊन तत्काळ वीज पुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.

शहरातील वीज पुरवठा वारंवार खंडीत होत आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. वारंवार वीज खंडीत होत असल्यामुळे मंगळवार दि ३० जुलै रोजी भाजपच्या शिष्टमंडळाने महावितरणच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी कार्यकारी अभियंता मुंगारे यांनी पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर लवकरच वीज पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. तसेच आपल्या विभागाच्या काही समस्या असेल तर आम्हाला सांगा आम्ही शासन दरबारी त्याचा पाठपुरावा करून त्या निश्चितपणे सोडवू. शहरासाठी विविध प्रभागात महावितरणचे हेल्पलाइन नंबर सुद्धा कार्यान्वित करण्याबाबत त्यांना सूचित करण्यात आले. मुख्यतः हिंगोली शहराच्या पाणीपुरवठ्याच्या लाईनवर विशेष लक्ष देऊन कोणत्याही प्रकारची नागरिकांची गैरसोय होऊ नये याबाबत दक्षता घेण्याचे सांगितले.

यावेळभ येत्या पाच दिवसात विद्युत पुरवठा सुरळीत करा अन्यथा शहर भाजपाच्यावतीने तीव्र प्रकारचे आंदोलन उभे करण्यात येईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी संबंधितास दूरध्वनी द्वारे या प्रश्नाचे त्वरित निराकरण करण्याच्या सूचनाही दिल्या. शिष्टमंडळात माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, शहराध्यक्ष कैलासचंद्र काबरा, बाबा घुगे, मनोज शर्मा, हमीद प्यारेवाले, प्रशांत सोनी, राजेश गोटे, रजनीश पुरोहित, आशिष जयस्वाल, सुमंत नायक, शशांक बुर्से, अलका लोखंडे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# १४ ऑगस्टनंतर आरोग्य सेविकांचा कामबंदचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जुलै**



जिल्हा परिषदेतल आरोग्य सेविका आणि आरोग्य सहाय्यक, सेवक यांची मागील चार वर्षापासून पदोन्नती रखडली आहे. तसेच १०, २०, ३० ची कालबध्द आश्वासीत योजनेअंतर्गत पदोन्नतीचे निकाल त्वरीत न लावल्यास दि १४ ऑगस्टपासून कामबंद आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

जिल्हा परिषद नर्सेस संघटनेकडून कामबंद आंदोलनाची नोटीस देण्यात आली आहे. जिल्ह्यातील आरोग्य सेविका व सेवक तसेच आरोग्य सहाय्यीका यांच्या पदोन्नती बाबतचे प्रस्ताव मागील चार वर्षापासून रखडलेले आहेत. तसेच १०, २०, ३० ची कालबध्द पदोन्नतीचे प्रस्ताव काही वर्षापासून प्रलंबीत आहेत. आरोग्य विभागाकडून सदरील प्रस्तावाची फाईल सामान्य प्रशासन विभागात सादर करण्यात आलेली आहे. परंतु त्यावर सामान्य प्रशासनाकडून अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. संघटनेकडून अनेक निवेदने यापूर्वी दिलेली असून प्रत्येकवेळी केवळ आश्वासने दिली जात आहेत. तथापी मागण्यांसंदर्भात प्रत्यक्ष कार्यवाही झालेली नाही. एलएचव्ही पदे रिक्त असल्याने सदर पदभार एएनएम यांच्याकडे असल्याने इतर उपकेंद्रांचा पदभार सांभाळावा लागत आहे. परिणामी आरोग्य सेविकांना प्रचंड मानसिक त्रासाचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे आरोग्य सेविका आणि सेवक तसेच आरोग्य सहाय्यीका यांच्यात संताप व्यक्त होत आहे. दि १४ ऑगस्टपर्यंत पदोन्नती प्रक्रिया पूर्ण न झाल्यास कामबंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर संघटनेच्या अध्यक्ष ज्योती बांगर, सचिव किर्ती सीताबराव, माया खेरे, सरिता मस्के, सुजात मठपती, अनिता चव्हाण, मुक्ता मुंढे, पूनम चाटसे, अंकीता सोनाळे, कविता गांधीले, नंदा चव्हाण, मिनाक्षी विशेनाथवार, वासंती रावते, अनिता जावळे यांच्या स्वक्षऱ्या आहेत.



**हिंगोली– कामिका एकादशीनिमित्त संत नामदेव महाराज यांची जन्मभूमी असलेल्या नर्सी नामदेव येथे बुधवारी परतवारीसाठी लाखो भाविक दर्शनासाठी दाखल होणार आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाच्यावतीने चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात येत आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतनचे बॅडमिंटनमध्ये यश



हिंगोली– हिंगोली येथील अॅड ग्यानबाराव शिरसाट सेवाभावी संस्थेचे राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन मधील विद्यार्थ्यांनी जिल्हा क्रीडा कार्यालय आयोजित बॅडमिंटन स्पर्धेमध्ये याही वर्षी घवघवीत यश संपादन केले. शाळेने दि २९ जिल्हा रोजी जिल्हा क्रीडा कार्यालय लिंबाळा मक्ता या ठिकाणी पार पडलेल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये १४ वर्षे वयोगटातील मुलांनी जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून त्यांची विभागीय स्तरावर निवड झाली या घवघवीत विषयाबद्दल शाळेच्यावतीने स्पर्धक विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी राजे संभाजी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य उमेश शेळके तसेच मुख्याध्यापक एस के डोलारे, क्रीडा शिक्षक सुधाकर बल्लाळ, तसेच शाळा व महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या विषयाबद्दल संस्थेच्यावतीने सर्व पदाधिकारी यांनी विजेते विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

### मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या संयोजकपदी भाजपच्या रजनी पाटील यांची निवड



हिंगोली– भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि यांच्या आदेशान्वये व भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांच्या सूचनेनुसार भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा तर्फे हिंगोली येथील सौ रजनी पाटील (प्रदेश सचिव ओबीसी मोर्चा सौ रजनी पाटील प्रदेश सचिव भाजपा ओबीसी मोर्चा यांची मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या अभियानाकरिता महाराष्ट्र प्रदेश संयोजिकापदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश स्तरावरील जबाबदारी म्हणजे पक्षाने माझ्यावर टाकलेला विश्वास असून मी आतापर्यंत केलेल्या पक्षकार्याची पावतीच आहे. महाराष्ट्रातील सर्व पात्र महिलांना या योजनेचा लाभ मिळवून देणार असल्याची प्रतिक्रिया रजनी पाओील यांनी दिली. महिलांनी लवकरात लवकर ३१ ऑगस्टपर्यंत जास्तीत जास्त नोदणी करुन या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पाटील यांनी केले आहे.

# राज्यस्तरीय डान्स स्पर्धेचे बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जुलै**

शहरातील स्व.शिवाजीराव देशमुख सभागृहात नटराज युवक मंडळ व शिवज्योत फाऊंडेशन, हिंगोली यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एकदिवसीय राज्यस्तरीय भव्य डान्स स्पर्धेचे बक्षीस वितरण मोठ्या उत्साहात करण्यात आले.

या स्पर्धेत जवळपास तब्बल ७० समुहाने सहभाग घेतला. बाल गटात (सोलो) प्रथम पारितोषिक ईश्वरी आखरे (नांदेड) ५००० रु.रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक विभागुन देण्यात आले यामध्ये धुन लोखंडे (हिंगोली) व अर्णव बिडवे (वाशिम), रोख रक्कम ३००० रु. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, प्रौढ गटातील (सोलो) प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक विभागुन देण्यात आले, या मध्ये प्रथम पारितोषिक प्रियंका अवचार (गंगाखेड) व रोहित कांबळे (वाशिम) रोख रक्कम ७००० रु. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक–सागर दास (नांदेड) व निकीता धुळे यांना रोख रक्कम ५००० रु.सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.तृतीय पारितोषिक– यश गजभारे व निकीता खिल्लारे यांना रोख रक्कम ३००० रु. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.समुह नृत्यामध्ये पारितोषिक प्रि भुषण कडमी (गंगाखेड) रोख रक्कम १५,००० रु. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. द्वितीय पारितोषिक विभागुन देण्यात आले यामध्ये आयुष डान्स कडमी (परभणी) व डि ईफेक्ट डान्स कडमी (हिंगोली) रोख रक्कम ७००० रु. सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

तृतीय पारितोषिक विभागुन देण्यात आले यामध्ये ज्युनियर कॉलेज (हिंगोली) व स्विस इंग्लिश (हिंगोली) रोख रक्कम ५००० रु.सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. डान्स स्पर्धेचे बक्षीस वितरण जगजितराज खुराणा, रामदास पाटील सुमठाणकर, सुरेशअप्पा सराफ, अनिल नेनवानी, ड.राजेश गोटे, शांताबाई मोरे, सुनिल पाटील, अमोल जमदाडे, दिपक सेठी, उमेश मेटकर, माबुद बागवान, मुजीब कुरेशी, सुमित चौधरी, निरज देशमुख, विशाल इंगोले, जुबेर मामु, बंटी नागरे, अजय बांगर, डॉ.स्वप्निल गीरी, डॉ.विशाल पवार, डॉ.वर्षा पवार, डॉ.जगन्नाथ जारे, डॉ.अयोध्या जारे (मुटकुळे) निक्कु राठौर, प्रशांत बाहेती, साहिल जैस्वाल, पवन अग्रवाल यांच्याहस्ते करण्यात आले. सुत्रसंचालन प्रा.डॉ.किशोर इंगोले, नानवटे व शेख मुज्जफर यांनी केले. आभार स्पर्धेचे आयोजक मिलिंद उबाळे यांनी मानले.

# ग्राहक पंचायतच्या माध्यमातून ग्राहक हित साधावे– विष्णू धबडे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जुलै**



ग्राहक पंचायत महाराष्ट्रच्या माध्यमातून ग्राहकांनी आपले हित जोपासून ग्राहक पंचायतचा फायदा सर्व गरजूंना ही मिळवून द्यावा असे आवाहन ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे सदस्य विष्णू आर धबडे यांनी केले.

ग्राहक पंचायत महाराष्ट्र च्या जिल्हा शाखेच्या जिल्हास्तरीय समन्वय बैठक व कार्यशाळेचे चे उदघाटक म्हणून ते बोलत होते. ग्राहक संरक्षण कायदा हा सर्व सामान्यांना कळणारा, किचकट नसलेला, सोपा सरळ व गरजूंना विनाविलंब न्याय मिळवून देणारा असल्याने याचा सदुपयोग करून घ्यावा. त्यासाठी ग्राहक पंचायत आणि अन्य संघटना देखील सज्ज आहे असे ही ते म्हणाले. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष अॅड आर.एन. अग्रवाल होते. याप्रसंगी नांदेड जिल्हाअध्यक्ष डॉ. दिपक कासराळीकर, अॅड आनंद जोशी यांनी ग्राहक पंचायत महाराष्ट्र ची ध्येय धोरणे, पंचायतकडून ग्राहक हितार्थ राबवले जाणारे उपक्रम आणि देण्यात येणारे मार्गदर्शन, ग्राहक संरक्षण कायद्याची अंमलबजावणी चा फायदा करून घेण्यासाठी ग्राहकांचे कर्तव्य, विविध माध्यमातून ग्राहकाची होणारी फसवणूक, टाळणे, ऑनलाईनचा अनेकांना बसणारा फटका आदी पासून कसे वाचता येईल यासंदर्भात मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात अॅड राजेंद्र अगरवाल यांनी हिंगोली जिल्ह्याच्या ग्राहक पंचायतची कार्यप्रणाली, राबवण्यात आलेले उपक्रम व भावी काळातील संकल्प याबाबत माहिती देवून हिंगोली जिल्ह्याची शाखा राज्यस्तरावर कशी नावलौकिक होईल हा प्रयत्न केल्या जाईल असे म्हंटले. सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार डॉ.विजय निलावार ह्यांनी केलं तर आभार प्रदर्शन माधवी आसेगावकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्येष्ठ पदाधिकारी जेठानंद नैनवाणी, एम एम राउत, परसराम हेंबाडे, सूर्यकांत राजुलवार, सुभाष लदनिया, आदींनी परिश्रम घेतले.

# सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जुलै**



मागास जातीला असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय्य ठरत नाही असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दि ६ जुलै २०१७ रोजी दिला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी आंध आदिवासी कर्मचारी संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

निवेदनात ज्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचे अनुसूचीत जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहेत, अनुसूचीत जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर विशेश मागास प्रवर्गाचे अथवा अन्य कोणतेही मागास प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र दाखल केलेले अधिकारी, कर्मचारी. अनुसूचीत जमातीचा दावा सोडून दिलेले अधिकारी, कर्मचारी, तसेच जात पडताळणीसाठी विहीत मुदतीत प्रस्ताव सादर न केलेले अधिकारी, कर्मचारी या कारणाने अधिसंख्य केलेले रिक्त पदे तत्काळ भरावीत आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष दत्ता नांदे, कार्याध्यक्ष अशोक खोकले, सचिव बिरू असोले, कोषाध्यक्ष परमेश्वर वागतकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# दुचाकीसह ५६ हजारांचा गुटखा सेनगाव पोलिसांनी पकडला, आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जुलै**



सेनगाव तालुक्यातील लिंबाळा तांडा शिवारात पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहीतीवरून एका दुचाकी स्वाराकडून दुचाकीसह ५५ हजार ९३२ रूपयांचा शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा पकडला असून आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहीतीनुसार सेनगाव तालुक्यातील लिंबाळा तांडा शिवारात दुचाकीवर एकजण लोकांच्या जीवीतास हानीकारक व शरीरासाठी विष द्रव्य असलेला शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा हा चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने घेवून जात असल्याची माहीती मिळाल्यानंतर सेनगाव पोलिसांनी संबंधित दुचाकी स्वाराला अडवून त्याच्याकडील पिशव्यांची तपासणी केली असता त्यामध्ये विविध प्रकारचा गुटखा आढळून आला. पोलिसांनी गुटख्यासह दुचाकी जप्त केली असून आरोपी सय्यद तकवीन सय्यद मोसीन रा वरूड वेस ता जिंतूर यास ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी ओमनाथ राठोड यांच्या फिर्यादीवरून सेनगाव पोलिस ठाण्यात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास चाटसे करीत आहेत.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# मंदिरात चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, ३० जुलै -**

हिमायतनगर शहरातील लकडोबा चौक येथील मंदिरातून लाऊडस्पीकरचे ॲम्प्लीफायर चोरी करणार्या आरोपीला हिमायतनगर पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याच्याकडून साहित्य जप्त करण्यात आले आहे.

हिमायतनगर शहरातील लकडोबा चौक येथील हनुमान मंदिरातून दि.२८ जुलै रोजी अज्ञात चोरट्याने लाऊडस्पीकरचे ॲम्प्लीफायर चोरी केले होते. या प्रकरणी तुकाराम मेरगेवाड यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करीत असताना पोलिसाला मिळालेल्या गुप्त माहितीवरुन पोलिसांनी गणेश यादव भालेराव रा.बोरगाव रोड भोकर यास ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता हनुमान मंदिरातील लाऊडस्पीकरचे ॲम्प्लीफायर चोरी केल्याचे त्याने कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून ४० हजार रुपये किंमतीचे लाऊडस्पीकरचे ॲम्प्लीफायर जप्त केले. हि कारवाई पोलीस निरीक्षक अमोल भगत, महिला सहायक पोलीस उपनिरीक्षक कोमल कागणे, पोहेका. श्याम नागरगोजे यांनी केली.



# आ. शिंदे यांच्या प्रयत्नामुळे विष्णुपुरी प्रकल्पातील १२ पंप, उद्धरण नलिकेसाठी १६० कोटी ६४ लाखाच्या निधीस मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ३० जुलै -**

कै.शंकरराव चव्हाण विष्णुपुरी सिंचन प्रकल्पातील १२ विद्युत पंप व उद्धरण नलिकाची अत्यंत बिकट अवस्था झाल्याने लोहा व कंधार तालुक्यातील हजारो शेतकरी सिंचनापासून वंचित राहत होते, याबाबत लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. श्यामसुंदर शिंदे यांनी मार्च २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी माडुन कामाला मंजुरी मिळवून घेतली.

लोहा तालुक्यातील १५ हजार ९२७ हेक्टर व कंधार तालुक्यातील २१०० हेक्टर शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळवून देण्यासाठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी सूचनेद्वारे आवाज उठवला होता



कै. शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पाचे १२ विद्युत पंप व उद्धरण नलिका तात्काळ बदलून नवीन विद्युत पंप व उद्धरणनलिका बसविण्याची मागणी केली होती त्या दुरुस्तीसाठी १२५ कोटीचा निधी तात्काळ मंजूर केला.

जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासनाच्या २९ जुलै २०२४ च्या शासन निर्णयाद्वारे विष्णुपुरी प्रकल्पातील १२ विद्युत पंप व उद्धरण नलिकेसाठी विशेष दुरुस्ती अंतर्गत १६० कोटी ६४ लाख ५७ हजार २२३ रुपये निधी कामांना प्रशासकीय मान्यता मिळाल्याचे सांगीतले.

## संक्षिप्त वृत्त



### छ.शंभूराजे इंग्लिश स्कूलमध्ये घेण्यात आलेल्या रंग भरण

**कंधार** - दिवंगत डॉ.भाई केशवरावजी धोंडगे यांच्या१०३ व्या जयंतीनिमित्त मातोश्री मुक्ताई धोंडगे प्रतिष्ठाण कंधारचे सचिव तथा श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा.डॉ.भाई पुरुषोत्तम धोंडगे आणि मातोश्री मुक्ताई धोंडगे प्रतिष्ठाण कंधारच्या अध्यक्षा प्रा.डॉ.मनिषाताई पुरुषोत्तम धोंडगे यांच्या संकल्पनेतून ज्ञानाचा सागर क्रांतिचा जागर या सदराखाली दि.२६ जूलै रोजी घेण्यात आलेल्या लहान गटातील इयत्ता १ ली ते ४ थी रंग भरण स्पर्धा व मोठ्या गटातील इयत्ता ५ वी ते ८ वी स्पर्धेत ५००० विद्यार्थी सहभागी झाले होते.सहभागी विद्यार्थ्यांना पॅड व पाणी बॉटल देण्यात आले. २६ जूलै रोजी शहरासह तालुक्यातील पाच हजार विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. दि.२९ जूलै रोजी सकाळी ११ वाजता छत्रपती इंग्लिश स्कूल येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माधवराव पेठकर तर प्रमुख अतिथी म्हणून विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोज धर्मापुरीकर उपस्थित होते. मोठ्या गटातील प्रथम कु.प्राची वाळके छ.शंभुराजे इंग्लिश स्कूल,वर्ग ६ वी छ.शंभूराजे इंग्लिश मीडियम स्कूल कंधार व्दितीय-तेजस मधुकर राठोड ५ वी ग्रो अँड ग्रो स्कूल कंधार तृतीय-माधवेंद्र बनसोडे मनोविकास विद्यालय ८ व उत्तेजनपर ऋषीकेश देविदास, छोट्या गटातील रंग भरण स्पर्धा परक्षेत प्रथम- कु.माहिरा बाबा शेख जि.प. प्रा.शाळा फुलवळ,व्दितीय क्रमांक कु.निधी नितिन टेकाळे मनोविकास प्राथमिक शाळा कंधार वर्ग दुसरा, तृतीय- कु.मानसी राजेश्वर उमाटे ४ थी ग्रो अँड ग्लो शाळा कंधार यांनी तर उत्तेजनपर कु.मैथिली मारोती हराळे वर्ग ४ था जि.प.बाचोटी कु.श्रावणी नारायण श्रीपतवार प्रियदर्शनी प्रा.शाळा कंधार कु.अलिशान जावेद शेख, कु.श्रेया दत्ता येवते छ.शंभूराजे इंग्लिश स्कूल कंधार कु.नंदिनी श्रीकांत कागणे ग्रो अँड ग्रो स्कूल कंधार या चिमुकल्यांनी यश संपादन केले.गुणवंत विद्यार्थ्यांचा छ.शंभूराजे इंग्लिश मीडियम स्कूल कंधारच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.यावेळी प्रा.सुभाषराव मुत्तेपवार,प्रा.संर्यकांत जोंधळे इंग्लिश स्कूलचे कर्मचारी,विद्यार्थी पालक उपस्थित होते.सुत्रसंचलन चव्हाण यांनी केले. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

### उद्यापासून महसूल सप्ताहास प्रारंभ

**नांदेड** - प्रशासनाचा कणा असणाऱ्या महसूल विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्याचे नियोजन केले आहे. शासनाच्या पथदर्शी व अभिनव योजनांचा प्रचार, प्रसार व अंमलबजावणी ही या सप्ताहाची वैशिष्ट्ये असणार आहे. महसूल सप्ताहामध्ये प्रत्येक दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत तालुकास्तरावर समाजाच्या विविध घटकातील नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये एक ऑगस्टला शुभारंभ सप्ताह कार्यक्रमांमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, दोन ऑगस्टला मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, तीन ऑगस्टला मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, ४ ऑगस्टला स्वच्छ व सुंदर माझे कार्यालय, पाच ऑगस्टला सैनिक हो तुमच्यासाठी, ६ ऑगस्ट ला एक हात मदतीचा दिव्यांगाच्या कल्याणाचा, तर सात ऑगस्ट रोजी महसूल संवर्गातील कार्यरत सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी पुरस्कार वितरण व महसूल सप्ताह सांगता समारंभ घेण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त शासन व सामान्य नागरिक यांना जोडणाऱ्या अनेक कार्यक्रमांचे आयोजन या सप्ताहामध्ये करण्यात येणार आहे. यासंदर्भात नुकतीच एक बैठक निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आली. यामध्ये महसूल विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी या सप्ताहात हिरीहिरीने सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले.

### टपाल कार्यालयामध्ये राखीसाठी विशेष लिफाफ्यांची विक्री

**नांदेड** - राखी हा सण भारतीय संस्कृतीत महत्वाचा उत्सव आहे. ज्यात भावनिक आसक्ती आहे. यावर्षी रक्षाबंधन हा सण १९ ऑगस्ट २०२४ रोजी साजरा होणार आहे. यानिमित्ताने टपाल विभागातर्फे नागरिकांसाठी अनेक सेवा पुरविल्या जात आहेत. यावर्षी रक्षाबंधनासाठी टपाल विभागाने विशेष राखी लिफाफे तयार केले आहेत. या राखी लिफाफ्यांची किंमत १२ रुपये प्रति लिफाफा अशी किफायतशीर आहे. तरी नांदेड जिल्ह्यातील टपाल कार्यालयांमध्ये राखी लिफाफ्यांची विक्री आधीच सुरु झाली आहे. तरी इच्छुक नागरिकांनी रक्षाबंधनासाठी मुख्य टपाल कार्यालयातून राखी लिफाफे खरेदी करावेत, असे आवाहन अधीक्षक डाकघर यांनी केले आहे. नांदेड टपाल विभागाने उच्च दर्जाच्या राखी लिफाफ्यांच्या विक्रीसाठी नांदेड टपाल कार्यालयांमध्ये विशेष व्यवस्था केली आहे. हे लिफाफे वजनाला हलके वॉटर प्रुफ न फाटणारे मजबुत आणि उत्कृष्ट मुद्रण केलेले आहेत. या लिफाफ्यांसाठी वापरण्यात आलेला कागद वैशिष्ट्यपूर्ण असून हे लिफाफे पाण्याने खराब होणार नाहीत. तसेच ते फाटणार नाहीत हे राखी विशेष लिफाफे ११ ‌ २२ से.मी. मापाचे असून सहज सील करण्यासाठी पील ऑफ स्ट्रिप सील यंत्रणेचा वापर केलेले हे लिफाफे आकर्षक डिझाइनमध्ये उपलब्ध आहेत.

### भारत सरकार शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवर भरावेत : शिवानंद मिनगिर

**नांदेड** - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना राबविण्यात येते. व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता तसेच राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व शासनमान्य अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानीत महाविद्यालयातील सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या अनुसुचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे नवीन व नूतनीकरण अर्ज महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाइन भरणे सुरु झाले आहे.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी अंतिम दोन दिवस

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० जुलै -**

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम-२०२४ मध्ये शेतकऱ्यांना ऑनलाइन विमा अर्ज भरण्यास शेवटचे दोन दिवस उरले असून या योजनेत ज्यांनी विमा काढला नसेल त्या शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहन, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

या योजनेत सहभागी होण्याकरिता केवळ १ रुपया भरुन झचत्रङ्गध पोर्टल http://pmfby.gov.in वर स्वत: शेतकऱ्यांना तसेच बँक विमा कंपनीचे नियुक्त केलेले एजंट, क्रॉप इन्शुरन्स प व सामुहिक सेवा केंद्रांमार्फत योजनेत सहभाग नोंदविता येणार आहे.

या योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२४ करिता ऑनलाइन स्वरूपात विमा अर्ज भरण्याची सुविधा १६ जून २०२४ पासून सुरू झाली असून सहभागाची अंतिम मुदत १५ जुलै २०२४ अशी निश्चित करण्यात आली होती. योजनेत सहभागासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने खरीप हंगाम ऑनलाईन विमा भरण्यास ३१ जुलै २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. जिल्ह्यातील जनतेने पुढील दोन दिवसात विमा भरण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# लोकमान्य टिळक हे भारत स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी नेते : मिसलवाड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० जुलै -**

आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य हे सहजासहजी मिळालेले नसून, भारत देश स्वातंत्र्यासाठी अनेक शूरवीर, समाजसुधारक, क्रांतीकारक हे शेवटच्या श्वासापर्यंत योगदान दिले असून त्यातीलच एक थोर स्वातंत्र्य सेनानी म्हणजे लोकमान्य केशव बाळ गंगाधर टिळक हे भारत देशाचे अग्रणी नेते होते, असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले.

# प्रा. उत्तमकुमार कांबळे यांचा कॉँग्रेस पक्षामध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, ३० जुलै -**

प्रा. उत्तमकुमार कांबळे यांनी नांदेड येथील विश्रामगृहात खा. वसंतराव चव्हाण, जिल्हाध्यक्ष हाणमंतराव पाटील बेटबोगरेकर, आमदार मोहन हंबर्डे, काँग्रेस महानगर अध्यक्ष अब्दुल सत्तार आणि देगलूरचे माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेसचे देगलूर शहराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार यांच्या उपस्थिती भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला आहे.

देगलूर महाविद्यालय देगलूरचे उपप्राचार्य उत्तमकुमार कांबळे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय कार्यात महत्वाचे योगदान दिले आहे. विद्यार्थीदशेपासून प्रा. उत्तमकुमार कांबळे सामाजिक चळवळीत हिरेरीने सहभाग घेतला आहे. व्यापक दृष्टिकोन आणि सामाजिक जाणिव असलेले प्रा. कांबळे काल नांदेड येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या बैठकीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. प्रा. उत्तमकुमार कांबळे यांनी देगलूर - बिलोली मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढविण्यासंदर्भात इच्छुक उमेदवाराचे अर्ज काँग्रेस पक्षाकडे सादर केले आहे. त्यामुळे काँग्रेस पक्षाला एक उमेदवार म्हणून चांगला आणि विद्यार्थ्यांचा आणि जनसामान्यांचा जनाधार असलेला पर्याय मिळाला आहे. यावेळी खासदार वसंतराव चव्हाण, जिल्हाध्यक्ष हाणमंतराव पाटील बेटबोगरेकर आणि देगलूरचे माजी नगराध्यक्ष तथा काँग्रेसचे देगलूर शहराध्यक्ष



मोगलाजी शिरशेटवार यांनी पुढील कार्यासाठी प्रा. उत्तमकुमार कांबळे यांना शुभेच्छा दिल्या आहेत. प्रा. उत्तमकुमार कांबळे यांच्या काँग्रेस प्रवेशामुळे राजकीय गणिते बदलण्याची दाट शक्यता आहे.

याप्रसंगी काँग्रेस कार्याध्यक्ष महेश देशमुख, साहेब, विठ्ठल पावडे, प्रफुल्ल सावंत, कुमार कुर्तडीकर, डॉ. गंगाधर सोनकांबळे, मुन्ना अब्बास, डॉ. करुणा जमदाडे, सुभाष रायबोले, जयपाल कांबळे, दिपक रामपुरकर, सय्यद हबीब, मंगेश बेंद्रिकर, मधुकर पाटील भिसे, धम्मानंद जोंधळे, भरत पाटील मरखेलकर, रमेश शिवणीकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व पत्रकार बांधव उपस्थितीत होते. या पक्ष प्रवेशाबद्दल उपस्थित मान्यवरांकडून शुभेच्छा आणि अभिनंदन करण्यात आले आहे.

# बारड शिवारात रोही प्राण्याचा धुमाकूळ शेतकऱ्यांच्या पिकांची नासाडी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, ३० जुलै -**

बारड शिवारातील वनस्पती उद्यान परिसरातील शेत शिवारात रोही प्राण्यांने धुमाकूळ माजवला असुन शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कापूस, तुर, मुग, उडद, या पिकाला खाऊन फस्त करत असल्याने शेतकऱ्याचे अतोनात नुसकान करत असल्याचे समोर आले आहे शेतकरी पिकांचे नुकसान होत असल्याने हैराण झाला असुन वनविभागाने मात्र याकडे साफ दुर्लक्ष असल्याचे शेतकर्यांनी सांगितले या रोहीचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांन कडून करण्यात येत आहे

शिवारात चाळीस रोहीचा कळप असल्याने एका सोयाबीन शेतात थांबले की सोयाबीन सह ईतर पिके खाऊन फस्त करत आहेत रोही येत असल्याने शेतकर्यांना पावसाळ्यात शेतात जागल करावी लागत असल्याने जीव मुठीत धरून रात्री रोहीना हाकलतांना कसरत करण्याची वेळ आली असून वनविभाग मात्र याकडे हेतुपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

जंगल परिसरातील शेतकऱ्यांना रोहीचा मोठ्या प्रमाणात त्रास असून येणारी सुगी पिके फस्त होत असल्याने हजारो रुपये खर्च करून पिकांची लागवड केली जाते परंतु प्राण्यांच्या करण्यात येणाऱ्या नुसकाने पुढे शेतकऱ्यांना आर्थिक संकटांना समोरे जावे लागणार आहे.त्यामुळे परिसरातील शेतकरी पिकांच्या नुसकाने रोहीच्या कळपा मुळे त्रस्त झाला आहे.

वनविभागा मात्र याकडे दुर्लक्ष कतर असून शेतकर्याच्या मदतीला वनविभागाचे कर्मचारी येत नसल्याचे समोर आले असून फोनवरूनच शेतकऱ्यांना सल्ला देत आहेत.

# समाज कल्याण विभागाच्या सेस फंडातील योजनांसाठी गटविकास अधिकाऱ्यांकडे १० ऑगस्टपर्यंत अर्ज करा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० जुलै -**

मागास वर्गीयांना सामाजिक आर्थिक विकासासाठी असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या विविध योजनांसाठी १० ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद नांदेड उपकर २० टक्के सेस मागासवर्गीय कल्याण निधी २०२४-२५ अंतर्गत नऊ योजनांबाबतचे अर्ज १० ऑगस्टपर्यंत मागविण्यात आले आहेत. या योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्जदारांनी अटी व शर्तीच्या अनुषंगाने परिपूर्ण अर्जाचा प्रस्ताव संबंधित तालुक्याच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे विहित नमुन्यात १० ऑगस्टपर्यंत सादर करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी नांदेड यांनी केला आहे.

या योजनांमध्ये मागासवर्गीय झेरॉक्स, (प्रिंटर, स्कॅनर व झेरॉक्स मशिन) वाटप करणे, मागासवर्गीय प्रशिक्षित महिलांना शिलाई मशीन पुरविणे, मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनींना सायकल पुरविणे, मागासवर्गीय मिरची कांडप पुरविणे योजना, मागासवर्गीयांना पिठाची गिरणी पुरविणे योजना, मागासवर्गीय गुणवंत विद्यार्थ्यांना परिक्षासाठी प्रोत्साहनपर अनुदान, मागासवर्गीय व्यक्तींना दुग्ध व्यवसायासाठी गाई व म्हैस पुरविणे, निराधार, विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत एकल मागासवर्गीय महिलांना उपजिविकेसाठी सहाय्य करणे या योजनासाठी पात्र लाभार्थ्यांनी विहित नमुन्यात गट विकास अधिकाऱ्यांकडे अटी व शर्तीच्या अधिन राहून परिपूर्ण अर्ज सादर करावेत. तसेच अधिक माहितीसाठी समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद येथे संपर्क साधावा, असेही जिल्हा परिषदेचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी नांदेड यांनी कळविले आहे.

# विष्णूपुरी बंधाऱ्याच्या सखल भागातील नागरिकांनी सावध असावे : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० जुलै -**

नांदेड जिल्ह्यातील प्रमुख प्रकल्प असणाऱ्या शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प ८३ टक्के क्षमतेने भरला आहे.त्यामुळे कधीही बंधार्याच्या दाराला उघडले जाऊ शकते. नदीपात्रात त्यामुळे विसर्ग वाढेल.प्रकल्पाच्या पुढील गावांनी सतर्क असावे, असा इशारा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिला आहे.

नांदेड जिल्हयातील शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसामुळे आज दि. २५ रोजी ८३% क्षमतेने भरला आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात चालू असलेल्या सततच्या पावसामुळे प्रकल्पाच्या पाणी पातळीत सतत वाढ होत आहे. बंधाऱ्यात येणाऱ्या पाण्याची आवक लक्ष्यात घेता विष्णुपुरी बंधाऱ्याचा दरवाजा कोणत्याही क्षणी उघडण्यात येईल, अशी सूचना पूर नियंत्रण अधिकारी यांनी केली आहे.




नांदेड - भोई समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व मार्गदर्शन शिबीराचे आयोजन कुसुम सभागृह येथे आयोजित करण्यात आले या शिबीराचे दिप प्रज्वलित करुन करुन उद्याटन करताना स्वामी विवेकानंद करियर अकॅडमीचे संचालक प्रा. विठ्ठल कागणे व माजी शिक्षण संचालक गोविंद नोंदेडे आदी होते. (छाया - नरेंद्र गडप्पा, नांदेड)

# अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती शाळा व विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० जुलै -**

केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून अनु. जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन पध्दतीने महाडीबीटी प्रणालीद्वारे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये सैनिकी शाळेत शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, ९ वी १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, साफसफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, इ. ५ वी ते ७ वी आणि इ. ८ वी ते १० वी मधील अनुसूचित जातीच्या विद्यार्थिनींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती,महर्षि विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क योजना इ. योजना राबविण्यात येत आहेत.

सदरील योजनांमध्ये लातूर विभागातील, लातूर जिल्ह्यातील एकूण शाळा २८२० त्यापैकी लॉगीन केलेल्या शाळांची संख्या २४७८ तर शिल्लक शाळांची ३४२, धाराशिव जिल्ह्यातील १८६४ पैकी २३६ तर शिल्लक शाळांची संख्या १६२८, नांदेड जिल्ह्यातील ३८२७ पैकी ३३७९ तर शिल्लक शाळांची संख्या ४४८ व हिंगोली जिल्ह्यातील १३९४ शाळांपैकी ९४५तर शिल्लक शाळांची संख्या ४४९ आहे. लातूर विभागात एकूण ९९०५ शाळा आहेत. त्यापैकी ७०३८ शाळांची मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीचे शाळेच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन लॉगीन झालेले आहे.

# नांदेड जिल्ह्यात मुख्यमंत्री युवा कार्यक्रम प्रशिक्षण योजनेतून युवकांची नियुक्ती सुरू

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ३० जुलै -**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांशी मुख्यमंत्री युवा कार्यक्रम प्रशिक्षण योजनेचा शुभारंभ आज नांदेड जिल्ह्यामध्ये झाला. राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांच्या हस्ते दोन तरुणांना नियुक्तीपत्र देऊन या प्रशिक्षण योजनेची प्रतिनिधिक स्वरूपात सुरुवात जिल्ह्यात आज करण्यात आली.

कौशल्य, रोजगार, उदयोजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविली जात आहे. पात्र उमेदवारांना प्रत्यक्ष कामाच्या अनुभवातून कौशल्य व आत्मविश्वास विकसित व्हावा यादृष्टीने ही ६ महिन्यांच्या नियुक्तीची योजना आहे. याचबरोबर उद्योजकांना लागणारे कुशल मनुष्यबळ या योजनेद्वारे घडविता येणार आहे.

आज दुपारी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेचे पहिले कार्यादेश प्रदान करण्यात आले. सुप्रसाद सूर्यकांतराव दामेकर, देगलूर, अंजली राजेंद्र आवतिरक, पाथरड रेल्वे, ता. मुदखेड, विश्वजीत रंजू खानसोळे, ओमकेश्वर संतोष कुमार उपलवाड असे कार्यादेश दिलेल्या या चार उमेदवारांचे नाव आहे. यापैकी सुप्रसादला तहसील कार्यालय देगलूर तर अन्य तीन उमेदवारांना जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड या ठिकाणी कामकाज सोपविण्यात आले आहे.

या प्रतिनिधीक व छोटेखाली कार्यक्रमाला माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण माजी आमदार अमर राजूरकर, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, कौशल्य, रोजगार, उदयोजकता व नाविन्यता विभागाच्या सहाय्यक आयुक्त रेणुका तम्मलवार यांची उपस्थिती होती

ही कार्य प्रशिक्षण योजना ६ महिन्यासाठी असून रितसर नोंदणी करुन रुजू झालेल्या बारावी पास उमेदवारांना ६ हजार रुपये, आयटीआय/ पदविका उमेदवारांना ८ हजार रुपये तर पदविधर व पदव्युत्तर उमेदवारांना १० हजार रुपये प्रतिमाह विद्यावेतन देण्यात येईल. बारावी, आय. टी. आय. पदविका, पदवीधर व पदव्युत्तर झालेल्या उमेदवारांनी www.mahaswayam.gov.in या पोर्टलवर जावून आपल्या लॉगिन आयडी पासवर्ड च्या माध्यमातून पोर्टलवर उचधघझध अंतर्गत नोंदविलेल्या विविध रिक्तपदांना ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.